CMYK




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ३ डिसेंबर २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १८ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



संघटन कार्य करीत असताना कामाची ठरावीक कालावधीनंतर समीक्षा करावी. समीक्षा ४ प्रकारची असावी. कार्य समीक्षा, कार्यक्रम समीक्षा, कार्यक्षेत्र समीक्षा आणि कार्यकर्ता समीक्षा. अशी समीक्षा केल्याने आपण काय चांगले केले व आपले काय चुकले हे समजून येते व पुन्हा तसेच काम करण्याची वेळ आली म्हणजे कार्य अधिक चांगले होते.

**- श्रीकृष्ण मोतलग**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सह प्रचारक प्रमुख

## महत्त्वाचे

### कुवैत-हैदराबाद इंडिगो विमानाला बॉम्बची धमकी

**मुंबई :** कुवैतहून हैदराबादला येणाऱ्या इंडिगोच्या ६-१२३४ क्रमांकाच्या विमानाचे मंगळवारी सकाळी बॉम्बच्या धमकीनंतर मुंबई विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हैदराबाद विमानतळाला एक ई-मेल मिळाला होता. यात विमानात बॉम्ब असल्याची माहिती होती. त्यानंतर तत्काळ सर्व यंत्रणांना सतर्क करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, एअरबस ३२१-२५१ विमानाने रात्री १:५६ वाजता कुवैतहून उड्डाण केले होते आणि सकाळी ८:१० वाजता मुंबईत उतरवण्यात आले.

# नगरपरिषदा, नगर पंचायतींचे निकाल
# २१ डिसेंबरला जाहीर करा

### नागपूर खंडपीठाने दिला आदेश | २० डिसेंबरपर्यंत 'एक्झिट पोल'वर बंदी | निवडणूक आयोगाला बजावली नोटीस

**नागपूर, २ डिसेंबर**

नऊ वर्षांनंतर होणाऱ्या राज्यातील २५० पेक्षा अधिक नगरपालिका आणि नगरपंचायती निवडणुकांसाठी मंगळवारी मतदान झाले. बुधवारी होणाऱ्या त्याच्या मतमोजणीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले. त्यावर सुनावणी करताना या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरला जाहीर करा, असा आदेश न्या. अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांनी दिला आहे.

दरम्यान, उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह निवडणूक आयोगाला नोटीस बजावून १० डिसेंबरपर्यंत उत्तर सादर करण्याचा आदेश दिला. निवडणुकांवर कोणताही विपरित परिणाम होऊ नये, यासाठी २० डिसेंबरपर्यंत एक्झिट पोल जाहीर करण्यासही न्यायालयाने मनाई केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल एकाच वेळी जाहीर करण्याचा निर्देश न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिला.

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. काही ठिकाणी निवडणूक अविरोध पार पडली. कायदेशीर पेच निर्माण झाल्याने आयोगाने २४ नगरपालिका, तर १५० पेक्षा अधिक प्रभागांमधील निवडणुका स्थगित केल्या. ही याचिका शकील अहमद मंसुरी, अश्विनी नरेंद्र बुरडे, सचिन चुटे यांनी दाखल केली. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. फिरदोस मिर्झा, ॲड. आनंद देशपांडे, ॲड. एच. एस. चितळे, ॲड. वेदांत पांडे, ॲड. अभिनव सक्सेना, ॲड. ए. एम. काझी, आयोगातर्फे ॲड. अमित कुकडे, सरकारतर्फे ॲड. कल्याणी मारपकवार यांनी बाजू मांडली.



कराड येथे उत्साहात मतदान झाले. यावेळी मतदानासाठी रांगेत उभे असलेले मतदाते

### निश्चित मुदतीत नियमावली तयार करा

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील आरक्षणासंदर्भातील पेच सोडविण्यासाठी आठ आठवड्यांत कठोर नियमावली तयार करण्याचा निर्देश औरंगाबाद खंडपीठाने आयोगाला दिला. जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकीपूर्वी नियमावली तयार करा आणि यासंदर्भातील अहवाल सादर करावा. कायदेशीर अडचणींमुळे सामान्य मतदारांमध्ये संभ्रमावस्था टाळायला हवी आणि भविष्यात निवडणुका निर्विवाद व्हाव्या यासाठी तयारी करावी असेही खंडपीठाने नमूद केले.

**२४ नगरपालिकांच्या निवडणुका लांबणीवर**

न्यायालयीन निर्णयामुळे २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडीसाठी मंगळवारी होणारे मतदान राज्य निवडणूक आयोगाने पुढे ढकलले आहे. या ठिकाणी आता २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे बुधवारी होणारी मतमोजणी २१ डिसेंबरपर्यंत थांबविण्याची मागणी करीत काही उमेदवारांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर आणि छ. संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केल्या.



**निवडणूक आयोगाचे वकील कोण आहेत, ते माहिती नाही. पण, त्यांनी कायद्याचा अतिशय चुकीचा अर्थ लावलेला दिसतो. इतकी वर्षे आम्ही निवडणुका लढवत आहोत आणि त्याचे नियम बघितलेले आहेत. आयोगाने प्रक्रियेत सुधारणा करायला हवी. कायदेशीर बाजू योग्य पद्धतीने न मांडल्याबद्दल माझी नाराजी आहे.**

**- देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

**न्यायालयाचे निरीक्षण**

३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर केल्यास २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानावर परिणाम होईल. २ डिसेंबर रोजी मतदान सुरू झाल्यापासून ते २० डिसेंबर रोजी मतदान संपल्यावर अर्धा तासापर्यंत माध्यमांनी एक्झिट पोलचे निष्कर्ष जाहीर किंवा प्रसारित करू नये. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० डिसेंबर रोजी होणार असून, त्यादरम्यान राज्य निवडणूक आयोगाने याचिकांवर आपले उत्तर दाखल करावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

*(तभा वृत्तसेवा)*

# कुठे बोगस मतदारांची धरपकड; तर कुठे कार्यकर्ते एकमेकांशी भिडले

### ▸▸सोलापूर जिल्ह्यातही मतदान यंत्र बंद पडल्याने गोंधळ

**मुंबई, दि.२ डिसेंबर-**

राज्यातील २६२ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान प्रक्रिया सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालली. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या लांब रांगा होत्या.

या निवडणुकीत मतदार यादीतील चुकांपासूनच ओरड सुरु होती. मंगळवारी मतदान प्रक्रियेत कुठे बोगस मतदारांची धरपकड झाली तर कुठे कार्यकर्ते एकमेकांशी भिडल्याने काही ठिकाणी तणावाचे वातावरण झाले होते. सोलापूर जिल्ह्यात देखील काही ठिकाणी मतदान यंत्र बंद पडण्याचे प्रकार घडले. अकलूज येथे एका मतदाराने मतदान यंत्र फेकल्याचीही घटना घडली आहे. मंगळवारी पार पडलेल्या मतदानानंतर हजारो उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. आता उमेदवारांसह संपूर्ण राज्याचे लक्ष २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे आणि निकालाकडे लागले आहे. स्थानिक पातळीवर कोणाची सत्ता येणार आणि कोण बाजी मारणार? हे आता निकालाच्या दिवशीच स्पष्ट होईल. दरम्यान निवडणुका पुढे ढकलणे आणि मतमोजणी तारीख बदलण्यावरून सत्ताधारी महायुतीसह विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांनीदेखील निवडणूक आयोगाला धारेवर धरले. काही नेत्यांनी तर निवडणूक आयोगावर खालच्या पातळीवर टिका केल्याचे दिसून आले.

**सोलापूर जिल्ह्यात अंदाजे ७० टक्के मतदान**



**अनगर, मंगळवेढ्यासह राज्यात २४ ठिकाणी निवडणुका लांबणीवर**

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील एकूण २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र, छाननी प्रक्रियेतील अपीलांचे निकाल २३ नोव्हेंबरनंतर लागल्याने, तांत्रिक कारणास्तव २४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे उर्वरित २६२ ठिकाणी मतदान प्रक्रिया मंगळवार, २ डिसेंबर रोजी पार पडली. पण यंदाच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गोंधळाचे वातावरण दिसून आले.

# 'संचारसारथी ॲप बंधनकारक नाही'

**नवी दिल्ली, २ डिसेंबर**

दूरसंचार विभागाच्या संचारसाथी ॲपवरून उफाळलेल्या वादानंतर, हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये ठेवणे बंधनकारक नाही, ते काढूनही टाकता येते, असा खुलासा केंद्र सरकारने मंगळवारी केला. संचारसाथी ॲपच्या मुद्यावरून आज लोकसभेत गदारोळ झाला, या गदारोळात दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

या ॲपच्या माध्यमातून सरकार हेरगिरी करीत असल्याचा विरोधकांचा आरोप शिंदे यांनी फेटाळून लावला. भारतात वापरात असलेल्या मोबाईलमध्ये संचारसाथी अनिवार्य असल्याचा आदेश सरकारने नोव्हेंबर महिन्यात जारी केला होता. मोबाईल ग्राहकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा ॲप सरकारने आणला आहे. चोरी आणि फसवणुकीपासून मोबाईल ग्राहकांचे रक्षण करण्यासाठी हा ॲप आम्ही आणला आहे. या ॲपची माहिती अजून देशातील जनतेपर्यंत पोहोचली नाही. त्यामुळे या ॲपबाबत अपप्रचार सुरू आहे. देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत हा ॲप आम्हाला पोहोचवायचा आहे. ती आमची जबाबदारी आहे. तुम्हाला हा ॲप नको असेल तर, त्यांची नोंदणी करू नका. या ॲपची तुम्ही नोंदणीच केली नाही तर तो सुरू कसा होणार, असा प्रश्न उपस्थित करत शिंदे म्हणाले की, त्यामुळे तुम्हाला हा ॲप नको असेल तर काढून टाका.





| MODEL | 125 CF | NS 125 | N160 | NS 200 | RS200 | PLATINA 110 |
|---|---|---|---|---|---|---|
| 100% GST लाभ | ₹8 280/-* | ₹9 419/-* | ₹11 880/-* | ₹12 894/-* | ₹15 983/-* | ₹6 551/-* |
| PF + विमा बचत | ₹3 000/-* | ₹3 400/-* | ₹4 300/-* | ₹4 600/-* | ₹5 700/-* | ₹2 400/-* |
| हॅट-ट्रिक सेव्हिंग्ज | ₹11 280/-* | ₹12 819/-* | ₹16 180/-* | ₹17 494/-* | ₹21 683/-* | ₹8 951/-* |

10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. हॅट-ट्रिक बचत 25 नोव्हेंबर 2025 ते 25 डिसेंबर 2025 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही 100% जीएसटी लाभ (एक्स शोरुम किंमत आणि लागू परिणामी आरटीओ करावर), शून्य प्रोसेसिंग फी आणि 1 वर्षाचा ओन डॅमेज विमा (ओडी) यांची बेरिज आहे. शून्य पीएफ आणि ओडीवरील बचत फायनान्सर/इंशूररच्या आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

# राममंदिर झाले, आता राष्ट्रमंदिराची उभारणी

**सरसंघचालक डॉ. मोहन भागवत; आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने कृतज्ञता पुरस्कार**



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २ डिसेंबर-**

विश्वकल्याणाची पताका फडकविणारे श्रीराममंदिर उभे राहिले. आता पूर्वीपेक्षा अधिक भव्य, सामर्थ्यसंपन्न आणि सुंदर राष्ट्रमंदिर उभे करायचे आहे, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित, आदित्य प्रतिष्ठान प्रस्तुत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्त कृतज्ञता सोहळ्यात सरसंघचालक बोलत होते. यावेळी कांचीकामकोटी पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती स्वामी, आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर अभ्यंकर, अपर्णा अभ्यंकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. आपल्याच समाजाचे कार्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात उपकाराची अथवा अहंकाराची भावना नाही, असे मत कृतज्ञता पुरस्कार स्वीकारताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, संघाला संपूर्ण समाजाचे संघटन अभिप्रेत आहे. कारण समाज संघटित झाला तरच राष्ट्र वैभवसंपन्न होईल. राष्ट्र बलसंपन्न झाले तरच विश्वाला सुखशांती लाभेल. यातही देशाचे कल्याण संघच करेल, अशी आमची वल्गना नाही. तर समाज उभा राहिला तरच देश उभा राहील. कठीण काळामध्ये समाजानेच संघाला साथ दिली, म्हणून संघ मोठा झाल्याचेही सरसंघचालक म्हणाले.

शंकर अभ्यंकर म्हणाले, आक्रमणांमुळे जगातील अनेक संस्कृती नष्ट झाल्या. मात्र संपूर्ण वसुंधरेलाच कुटुंब मानणारी भारताची हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. भौतिक आक्रमणांबरोबरच आंतरिक आक्रमणही भारतावर झाले. ब्रिटिशांनी भारताचा 'स्व' मोडण्याचा प्रयत्न केला. भारताची सनातन संस्कृती ही विश्वकल्याणासाठी मानवतेला मार्गदर्शक असून, हिंदू संस्कृतीच सर्वांचा स्वीकार करते, असे मत शंकराचार्यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, अनेक भाषा, परंपरा, प्रांत असतानाही भारतात आधुनिक लोकशाही यशस्वी झाली आहे.

कारण प्रजातंत्र हा सनातन धर्माचा भावच आहे. आज लोकशाहीला सामर्थ्यशाली करण्याची गरज असून, चांगल्या लोकांना बळ दिले पाहिजे. कार्यक्रमात वैश्विक संत भारती महाविष्णू मंदिराच्या कोनशिलेचे अनावरण, 'भारतीय उपासना' या विश्वकोष खंडाच्या तिसऱ्या आवृत्तीचे आणि जितेंद्र अभ्यंकर कृत 'पंढरीश' या ध्वनिफितीचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात रामायणावर आधारित 'निरंतर' या संगीत नाटिकेने झाली. सूत्रसंचालन डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले. जितेंद्र अभ्यंकर यांनी संपूर्ण वंदे मातरम सादर केले.

**स्वयंसेवकांनी प्राण ओतून संघ उभा केला**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, रक्ताचे पाणी करत स्वतः बीज बनत, संपूर्ण आयुष्य मातीत मिसळून संघाचा वटवृक्ष उभे करणारे डॉ. हेडगेवार, राष्ट्रासाठी आपले जीवन ओवाळून टाकणारे प्रचारक, ग्रामीण व दुर्गम भागात जीव धोक्यात टाकून कार्य करणारे गृहस्थी कार्यकर्ते आणि अक्षरशः प्राण ओतून संघ उभा करणाऱ्या स्वयंसेवकांप्रती ही कृतज्ञता व्यक्त करायला हवी, असे मत सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. पराकोटीचे हाल, उपेक्षा सोसूनही स्वयंसेवक हसतमुखाने कार्य करतो. विश्वकल्याणाची भावना असलेल्या या संघशक्तीतून समाजाला कधीही उपद्रव होणार नाही, असेही सरसंघचालक म्हणाले.

## महत्त्वाचे...



## मोडनिंब बसस्थानकाच्या गैरसोयींबाबतचे उपोषण मागे

**मोडनिंब, दि. २ डिसेंबर-**

मोडनिंब बसस्थानकातील विविध गैरसोयींबाबत येथील प्रदीप गिड्डे हे उपोषणास बसले होते. दरम्यान, सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, विभागीय वाहन निरीक्षक प.रा. नकाते, कुर्डुवाडी आगारचे प्रमुख रत्नाकर लाड यांनी आंदोलनस्थळी भेट देवून लेखी आश्वासन दिले. त्यामुळे अवघ्या एक दिवसाच्या उपोषणानंतर गिड्डे यांनी उपोषण मागे घेतले. मोडनिंब बसस्थानकात सर्व प्रवासी चढ-उतार अनिवार्यपणे बसस्थानकातूनच करावेत, मोडनिंब स्थानकात न येता महामार्गावरूनच पुढे जाणाऱ्या बसेसच्या चालक-वाहकांवर थेट कारवाई करण्यात येईल, बसस्थानकावरील स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, इमारत दुरुस्ती अशा मूलभूत सेवांसाठीचा प्रस्ताव ९० दिवसांत कार्यवाही करून पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. प्रदीप गिड्डे यांच्या आंदोलनाला भाजपा मोडनिंब शहर, भगवा वादळ, शिवसेना, धर्मवीर शंभूराजे प्रतिष्ठान संस्थेने जाहीर पाठिंबा दिला होता. यावेळी कैलास तोडकरी, संतोष लोकरे, दीपक सुर्वे, बाळासाहेब वागज, अजय चोपडे, प्रथमेश शिंदे, अजित चोपडे, बालाजी माळी, अजय खडके, बोरकर आदी उपस्थित होते.



## कुसमोड येथील रेणुका देवीच्या यात्रेस प्रारंभ

**पिलीव, दि. २ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील रेणुका देवीच्या यात्रेस मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे.यामध्ये एक डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता पालखीचे वाजत गाजत मोठ्या थाटामाटात मंदिरामध्ये आगमन, मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी देवीचा गंध लिंब व नैवेद्य तर बुधवार ३ डिसेंबर रोजी सायंकाळी चार वाजता होमाचा कार्यक्रम होणार आहे. तरी कुसमोड परीसरातील नागरिकांनी यात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.


## संभाजी ब्रिगेडच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी सचिन जगताप

**टेंभुर्णी, दि. २ डिसेंबर-**

संभाजी ब्रिगेडच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी नुकतीच निवड झाल्याने. सचिन जगताप यांची निवड ही संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या निवडीच्या पार्श्वभूमीवर वांगी नं. ३ येथे जगताप यांचा जंगी सत्कार सोहळा पार पडला. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला पाहिजे तशी गर्दी केली. कार्यक्रमास जिल्हा व तालुका कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून जगताप यांच्या कार्याची दखल घेत स्तुतिसुमने अर्पण केली. यामध्ये जिल्हा सचिव शिवश्री गणेश सव्वासे, जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, तालुकाध्यक्ष अमित घोगरे, अजय गायकवाड (तालुकाध्यक्ष-कार्यवाह), तसेच संभाजी ब्रिगेड वाहतूक आघाडीचे तालुका उपाध्यक्ष शिवाजी कदम यांचा समावेश होता. वैभव कांबळे, प्रतीक कांबळे, ऋतिक कांबळे, श्रीधर चौधरी, विजय चोपडे यांसह विविध कार्यकर्त्यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. यावेळी जगताप यांनी संघटनेचा विस्तार आणि सामाजिक प्रश्नांवरील प्रभावी काम ही आपली प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले. युवकांना एकत्र आणून विकासाभिमुख उपक्रम राबवण्यात संघटना सातत्याने पुढे राहील, असे ते म्हणाले. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते जगताप यांचा सत्कार करण्यात आला.

## निधन वृत्त...

### शैलेश कोठाडिया



**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

रेल्वे लाईन्स भागातील प्रसिद्ध व्यावसायिक कै. सुकेन(शैलेश) माणिकलाल कोठाडीया (वय ६६ )यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी बुधवारी सकाळी ९.३० त्यांच्या मूळ गावी माणिक बाग, मु. पोस्ट यावली ,तालुका मोहोळ येथील शेतात होणार आहे. संगमेश्वर महाविद्यालयातील रणजी कर्णधार राहिलेले माजी क्रिकेटपटू ,सोलापुरातील ब्रिजेश पेंट्स चे ब्रिजेश कोठाडीया व अभेद कोठाडीया यांचे ते वडील होत त्यांच्या मागे पत्नी दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### रंजना अडागळे



**टेंभुर्णी, दि. २ डिसेंबर-**

रंजना गजानन अडागळे (वय ६६) यांचे मंगळवार दि.२ रोजी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले.त्यांचे पश्चात पाच मुली, एक मुलगा, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या पत्रकार संतोष वाघमारे यांचे सासुबाई होत.

# शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी पिकांची फेरपालट करण्याची गरज : भोसले

**शेटफळ येथे शिवारफेरी, केळी उत्पादकांना मार्गदर्शन**



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २ डिसेंबर-**

केळी पिकामध्ये येऊ घातलेल्या पनामा सारख्या असाध्य रोगाला टाळण्यासाठी व शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी पिकांची फेरपालट करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जळगाव येथील केळी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ अरुण भोसले यांनी केले.

शेटफळ (ता.करमाळा) येथे झालेल्या शिवारफेरी व केळी उत्पादकांना मार्गदर्शन शिबीरात ते बोलत होते. यावेळी विभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, केळी निर्यातदार किरण डोके, कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्कार विजेते सोमनाथ हलगे, किरण पाटील, अंगद पाटील, नवनाथ पोळ, उत्कर्ष देशमुख आदी उपस्थित होते.

विभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे याप्रसंगी बोलताना म्हणाले की, सध्या केळीला मिळत असलेल्या कमी दरामुळे शेतकरी अडचणीत आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध क्षेत्रांमध्ये एकच पीक न घेता इतर वेगवेगळ्या पिकांची लागवड करुन होणारे नुकसान टाळले पाहिजे.

केळी निर्यातदार किरण डोके म्हणाले की, दर्जात्मक केळी निर्यातीला कायम मागणी राहणार आहे. शेतकऱ्यांनी पिकांचा दर्जा सुधारण्यावर भर दिला पाहिजे. जैन इरिगेशनचे किरण पाटील म्हणाले, केळी पिकाचे खतपाणी याचे सुक्ष्म व योग्य नियोजन करुन मातीच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्कार विजेते सोमनाथ हुलगे म्हणाले, खोडवा केळी सुध्दा निर्यात झाली पाहिजे यादृष्टीने लागवड पूर्व मशागती पासूनच काळजी घेण्याची गरज आहे. यावेळी प्रगतशील शेतकरी अंगद पाटील नवनाथ पोळ उत्कर्ष देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. विजय लबडे, विलास लबडे, अशोक लबडे, कैलास लबडे व प्रतापसिंह लबडे यांनी स्वागत केले. गजेंद्र पोळ यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत लबडे यांनी आभार मानले. याप्रसंगी कृषी अधिकारी मधुकर मारकड, वैभव पोळ, नानासाहेब साळुंके, प्रशांत नाईकनवरे, विष्णू पोळ, रोहित लबडे, अॅड.दिगंबर साळुंके, भाऊसाहेब सरडे, नितीन तकिक, सोमनाथ गव्हाणे, सचिन गव्हाणे, राजेंद्र कोळेकर, आण्णा कदम उपस्थित होते.

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ डिसेंबर-**

पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्याच्या कृषी विभागामार्फत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य संदर्भात राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वसाधारण व आदिवासी असे दोन गटातून ही स्पर्धा घेतली जाणार आहे. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी ही स्पर्धा घेतली जाणार आहे.

शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे.

एकावेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

विहित नमुन्यातील अर्ज व प्रवेश शुल्काच्या चलनसह ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खात्याचा पासबुक व चेकबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे, असे सांगण्यात आले.



# दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध सोईसुविधा

**तभा वृतसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ अंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना (दिव्यांग) शाळेच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे, कोणताही भेदभाव न करता गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, समान संधी, समान वागणूक याकरिता समावेशित शिक्षणास प्रोत्साहन देण्यात आलेले आहे. समावेशित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता, शिकण्याची शैली तसेच त्याची शारीरिक मानसिक व भावनिक गरज लक्षात घेऊन नियमित शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांसोबत अध्ययन अध्यापन करण्यात येते. या बालकांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये तसेच अभ्यासक्रमात अनुकूलित बदल करून शिक्षण पूर्ण केले जाते. मूल हे अनुकरणाने शिकत असते करिता समावेशित शिक्षणामध्ये अशा बालकांना विविध प्रकारचे अध्ययन अनुभव देणे सोयीस्कर होते. अशा विशेष गरजाधारक बालकांसोबत शिकणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना, भावनिक विकास होण्यास मदत होते.

दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ नुसार समावेशित शिक्षणास प्रोत्साहन देण्यात आलेले असून, दिव्यांग विद्यार्थ्यांना देखील गुणवत्ता पूर्ण शिक्षण, समान संधी याचा हक्क आहे. नियमित शाळांमध्ये अशा बालकांसाठी अडथळा विरहित वातावरण, भौतिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार व गरजेप्रमाणे अनुकूलित अध्ययन अध्यापन करण्यात येते.

**- अविनाश शिंदे,**
समन्वयक, समावेशित शिक्षण
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, सोलापूर.

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सन २०२५- २६ मध्ये ० ते १८ वर्षे वयोगटातील १८७६ विशेष गरजाधारक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या प्रत्येकाच्या शैक्षणिक, शारीरिक, मानसिक व भावनिक गरजा भिन्न आहेत. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ नुसार एकूण २१ दिव्यांगत्वाचे प्रकार आहेत. समग्र शिक्षा, समावेशित शिक्षण ही केंद्रशासन पुरस्कृत योजना असून, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे शैक्षणिक व सहाय्यभूत सुविधा दिल्या जातात. दिव्यांग व्यक्तींच्या मदतनीसांना भत्ता, प्रवास भत्ता, प्रोत्साहन भत्ता, वाचक भत्ता, लेखनिक भत्ता, साहित्य साधने व उपकरणे, काळजीवाहकाची सुविधा, थेरेपी सेवा, विशेष शिक्षक, वैद्यकीय मूल्यमापन शिबिरे, यूजीआडी कार्ड व दिव्यांगत्व प्रमाणपत्र आदी सुविधा देण्यात येतात.



**जागतिक दिव्यांग दिन विशेष**

विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नजीकच्या नियमित शाळेत प्रवेश घ्यावा. शिक्षण हक्क कायद्यान्वये अशा विद्यार्थ्यांना नियमित शाळेत प्रवेश देणे बंधनकारक आहे. जर प्रवेशास कुणीही अडथळा निर्माण करत असेल तर या कार्यालयास संपर्क साधावा.

**- मल्हारी माने**
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग.

# आईच्या पोटात गुदमरलो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**



माझ्या जन्माच्या वेळी मी आईच्या पोटात गुदमरलो. सिझरला वेळ झाला. मी जन्मल्याबरोबर रडलो नाही. मला ऑक्सीजन देऊन रडवले. त्यानंतर मला कासलीवाल हॉस्पीटलमध्ये इनक्युबेटरमध्ये ठेवले. आई अजीत गांधी सरांच्या दवाखान्यात अशी अवस्था होती. त्यामुळे माझ्या शारीरीक नसांवर परिणाम झाला. माझ्या शारीरीक हालचाली कमी झाल्या. माझी आई मला अय्यर हॉस्पीटलमध्ये रोज फिजिओ थेरपीला चिलजवार सरांकडे घेऊन जात असे. तिथेच आई-बाबांना हैद्राबादच्या एनआयएमएस हॉस्पीटलची माहिती मिळाली. आम्ही हैद्राबादला जायला लागलो. तिथे डॉ. पुरोहित सरांची ट्रीटमेंट चालू केली, असे अभिषेक अवधूत वैद्य यांनी सांगितले.

जागतिक दिव्यांग दिनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना ते पुढे म्हणाले, माझे शिक्षण बालवाडी ते चौथी पर्यंतचे कमला नेहरू प्राथमिक प्रशाला, जुळे सोलापूर. या शाळेत झाले. ५ वी ते १० वी. आदर्श मार्कंडेय प्रशाला जुळे सोलापूर. १० वी मार्क्स ७२% १२ वी (त्याच शाळेला संलग्न) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील ज्यु.कॉलेज. मार्क्स् ५५% इ. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ. मार्क्स ६५% (सर्व परिक्षेला शासना तर्फे लेखनिक देण्यात आला.) Computer courses: CCC+ New ge Computer Center (थिगळे सरांचे, लष्कर) यांच्या कडे झाले. त्यांनी मला घरी येऊन शिक्षण देण्याची सुविधा दिली. Tally : Mm Computer Course ही मी केला तो अभिजीत कुलकर्णी सरांकडे केला त्यांनी पण घरी येऊन शिक्षण देण्याची सुविधा दिली. यानंतर बीबीएनला जॉईन झालो. निखील कुलकर्णी सरांच्या मदतीने विवेक सरनाईक सरांनी मला रेल्वे रिझर्वेशन तसेच सर्व प्रकारचे रिचार्जची एजन्सी घेऊन देण्यास मदत केली. २३ सप्टेंबर १९९९ ला माझे ऑपरेशनही झाले शारीरीक नसांवर, परंतु फारसा परिणाम झाला नाही, त्यानंतर आई घरीच व्यायाम घेत होती. बालवाडी ते चौथी जास्त प्रमाणात आई बाबा व घरातील सगळे मला कडेवर घेऊन शाळेत सोडत व घरी घेऊन येत. पाचवी पासून शाळा दूर असल्यामुळे सायकलवर, बाबांच्या सुट्टी दिवशी गाडीवर शाळेत सोडण्यात येई. आठवीपासून माझे वर्ग मित्र यशवंत चव्हाण व लिंबाजी जाधव मला शाळेत ने आण करु लागले. दहावीत असतांना परिक्षेला लेखनिक द्यावा लागतो त्यासाठी प्रयत्न करुन माहिती मिळवली.

आई बाबा एसएससी बोर्डात पण जाऊन माहिती घेऊन आले.(या प्रकाराची कधीच माहिती नव्हती.) लहान वर्गातील, त्याच शाळेतील विद्यार्थी चालतो. मग नववीतील आदित्य सुर्यवंशी नावाचा विद्यार्थी मिळाला. त्याने एक महिना अगोदर माझे बोलणे समजावून घेतले. परिक्षेला लेखनिक मिळण्यासाठी सिव्हील हॉस्पिटल मधील ऑर्थो पेडीक डॉक्टरांचा एक फॉर्म भरावा लागतो. त्यावर नीड राईटर लिहिलेले असावे लागते. बारावीला उज्वला राऊत नावाची मुलगी माझी लेखनिक झाली. सोलापूर विद्यापीठाचे पदवी शिक्षण घ्यावे तर सर्वांच्या परिक्षा एकदाच असतात लेखनिक मिळणे अवघड जाईल म्हणून आम्ही मुक्त विद्यापीठाचे पदवी शिक्षण घेतले. त्या परिक्षा मे, जून मध्ये असतात व तिथे दुसऱ्या गावचा पण लहान वर्गातील लेखनिक चालतो म्हणून माझ्या मामाची मुलगी लेखनिक झाली, असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# पाकिस्तानात चिनी प्रकल्पावर 'बीएलएफ'चा आत्मघाती हल्ला

**● लष्कराचे २७ सैनिक ठार, ३५ जखमी ● हल्ल्यात पहिल्यांदाच महिलेचा सहभाग**



### हजारो लोक हल्ल्यासाठी सज्ज

बीएलएफने निवेदनात म्हटले की, पाकिस्तानी लष्कराचा सूड घेण्यासाठी आणि बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देण्याकरिता हजारो लोक तयार आहेत. झरीना यांच्यासारख्या अनेक महिला आत्मघाती हल्ले करण्यासाठी सज्ज आहे. हिंमत असल्यास लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी या भागात येऊन दाखवावं. ते सुरक्षित परत जाणार नाही.

### सद्दो ऑपरेशन बटालियनचे कृत्य

बीएलएफचे प्रवक्ते ग्वाहराम बलोच म्हणाले, ही कारवाई सद्दो ऑपरेशन बटालियन अर्थात् एसओबीने केली. या आत्मघातकी युनिटचे नाव शहीद कमांडर वाजा सद्दो उर्फ सदाथ मारी यांच्या नावावर आहे. आत्मघाती हल्ल्यानंतर आमच्या सैनिकांनी चगाईला जोडणारा महामार्ग ताब्यात घेत पाकिस्तानी सैनिकांकडून शस्त्रे जप्त केली. याशिवाय ग्वादरच्या पासनी भागात पाकिस्तानी तटरक्षक दलाच्या छावणीवर ग्रेनेड लाँचर्सने हल्ला केला. त्यात पाकिस्तानी लष्कराची अनेक वाहने जळाली.

**◆ क्वेट्टा, २ डिसेंबर**

बलुचिस्तानमधील चगाई येथील चिनी कंपनीच्या प्रकल्पाच्या सुरक्षेसाठी तैनात पाकिस्तानी सुरक्षा दलाच्या तळावर बलुच लिब्रेशन फ्रंट अर्थात् बीएलएफने आत्मघाती हल्ला केला. त्यात २७ सैनिक ठार झाले, तर ३५ पेक्षा जास्त जखमी झाले. आत्मघाती हल्ल्यासाठी बीएलएफने पहिल्यांदाच महिलेचा वापर केला. संघटनेने आत्मघाती हल्ला करणाऱ्या महिलेचे छायाचित्र जारी केले आहे.




झरीना रफीक उर्फ ट्रांग महू

पाकिस्तानी लष्कराने निवेदनात म्हटले की, चगाई येथे तांबे आणि सोन्याच्या खाणी असून चिनी कंपनीला उत्खननासाठी कंत्राट देण्यात आले. त्यांच्या सुरक्षेसाठी पाकिस्तानी लष्कर तैनात आहे. खाणीच्या प्रवेशद्वारावर तैनात लष्कराच्या तळावर सोमवारी बलुच लिबरेशन फ्रंटच्या दहशतवाद्यांनी बॉम्बस्फोट घडविला. या हल्ल्यात ठार झालेल्या सैनिकांची ओळख पटलेली नाही.

एक महिला मदत मागण्यासाठी लष्करी तळावर आली होती. मात्र, काही कळण्याच्या आत तिने स्वतःला उडवून दिले. प्रकल्पाच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त जवानांची तुकडी तैनात करण्यात आली आहे. बीएलएफने समाज माध्यमावर चित्रफीत जारी करीत हल्ल्याची जबाबदारी घेतली आणि आत्मघाती स्फोट घडविणाऱ्या महिलेचे छायाचित्र जारी केले. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी महिला शहीद झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. झरीना रफीक उर्फ ट्रांग महू असे आत्मघाती बॉम्बरचे नाव आहे. (वृत्तसंस्था)

# इम्रान खान यांना भेटण्याची बहिणींना परवानगी

**निदर्शने रोखण्यासाठी लष्कराकडे जबाबदारी**

**◆ इस्लामाबाद, २ डिसेंबर**

माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या प्रकृतीसंदर्भात माहिती देण्यास तुरुंग प्रशासन टाळाटाळ करीत असून, यामुळे पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ अर्थात् पीटीआय पक्षाचे समर्थक आक्रमक झाले. मागील चार दिवसांपासून रावळपिंडीत पक्षाच्या वतीने जोरदार निदर्शने सुरू आहेत. आंदोलन दडपण्यासाठी पाकिस्तान सरकारने मंगळवारी संचारबंदी लागू केली आणि खैबर पख्तुनख्वामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, इम्रानखान यांच्या बहिणींना त्यांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे इम्रान खान यांचा मृत्यू झाल्याच्या शक्यतांना पूर्णविराम मिळाला आहे.

उपायुक्त डॉ. हसन वकार चीमा यांनी निवेदनात म्हटले की, पाकिस्तानी सरकारने रावळपिंडीत लष्कराला तैनात करण्याचा आदेश दिला. सुरक्षा दलांनी निदर्शने रोखण्यासाठी संपूर्ण रावळपिंडीमध्ये संचारबंदी लागू केली आहे. आडियाला तुरुंगाबाहेर अजून हजारोंच्या संख्येने इम्रान समर्थक जमले आहेत. त्यांना लवकरच हटवले जाईल.



पीटीआयच्या कार्यकर्त्यांना रावळपिंडीत येण्यापासून रोखण्यासाठी जती उमरा ते आडियाला तुरुंगाकडे जाणारे सर्व प्रमुख मार्ग बंद केले आणि इस्लामाबाद उच्च न्यायालयाबाहेर पोलिस बंदोबस्त तैनात आहे. दरम्यान, इम्रानच्या दोन्ही मुलांनी वडील जिवंत असल्याचा पुरावा मागितला आहे.

संचारबंदीला डावलून पीटीआय पक्षाकडून पाकिस्तान सरकारविरोधात आंदोलन सुरू आहे. काही भागांत सुरक्षा दल आणि इम्रान समर्थकांमध्ये संघर्ष झाला. (वृत्तसंस्था)

### राजकीय रॅली, मिरवणुकांवरही बंदी

रावळपिंडीमध्ये इम्रान खानच्या समर्थकांसह पाच किंवा त्याहून अधिक लोकांच्या मेळाव्यावर बंदी घालण्यात आली आहे. कोणतेही मेळावे, धरणे, राजकीय रॅली आणि मिरवणुका काढण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. सरकारने नागरिकांना शस्त्रे, खिळे, लाठी, गोफण, बॉल बेअरिंग, पेट्रोल बॉम्ब, स्फोटके किंवा इतर कोणतेही उपकरण बाळगण्यास मनाई केली आहे.

# श्रीलंकेला मदत म्हणून दिल्या मुदतबाह्य वस्तू

**बढाई मारणाऱ्या पोस्टमुळे पाकिस्तानची पोलखोल**

**◆ कोलंबो, २ डिसेंबर**

चक्रीवादळामुळे दैना झालेल्या श्रीलंकेला मदतीच्या नावाखाली मुदतबाह्य वस्तू पाठवणाऱ्या पाकिस्तानचे पितळ याच देशाच्या उच्चायुक्ताने बढाई मारलेल्या पोस्टमुळे उघडे पडले आहे. पाकिस्तानने स्वतःचे कौतुक करणारी पोस्ट केली. मात्र, या देशाचा वाईट हेतू त्यात स्पष्ट झाला.




पाकिस्तान श्रीलंकेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असे श्रीलंकेतील पाकिस्तानी उच्चायुक्ताने या मदतीचे छायाचित्र समाज माध्यमावर पोस्ट करताना म्हटले. श्रीलंकेत नुकत्याच आलेल्या पुराचा फटका बसलेल्या आमच्या बहीण-भावांच्या मदतीसाठी पाकिस्तानने मदतसामग्री पाठवली आहे. या माध्यमातून एकता दर्शविण्यात आली. पाकिस्तान आज आणि नेहमीच श्रीलंकेसोबत उभा आहे, असे या पोस्टमध्ये म्हटले आहे.

या पोस्टमध्ये पाकिस्तानी उच्चायुक्तांनी मदतसामग्रीची छायाचित्रे टाकली. मात्र, त्यामुळे पाकिस्तानची लबाडी उघडकीस आली. ही मदतसामग्री ऑगस्ट २०२२ मध्ये तयार झाली असल्याचे पाकिटांवर स्पष्टपणे दिसते. त्यावर वापर करण्याची मुदत दोन वर्षांची देण्यात आली आहे. म्हणजे ते ऑगस्ट २०२४ पर्यंत वापरणे शक्य होते. मात्र, आता मोठ्या अवधीनंतरही पाकिस्तानने ही सामग्री श्रीलंकेला दिली.

पाकिस्तानी उच्चायोगाच्या पोस्टमुळे लबाडी उघडकीस आल्यावर समाज माध्यमावर मोठी खळबळ माजल्याचे लक्षात येताच ही पोस्ट डिलिट करण्यात आली. पण, तोपर्यंत पाकिस्तानच्या विकृत मनोवृत्तीचे दर्शन जगाला झाले होते. (वृत्तसंस्था)

# 'एनडीआरएफ'ने श्रीलंकेतील गर्भवतीला दिले नवजीवन

**सुरक्षित स्थळी हलवून तत्काळ मदत**

**◆ कोलंबो, २ डिसेंबर**

दित्वाह चक्रीवादळामुळे श्रीलंकेत मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पाऊस, पूर आणि दरडी कोसळल्याने कित्येक भागांचा संपर्क तुटला आहे. अशा भीषण परिस्थितीत श्रीलंकेसाठी भारत एक मदतीत धावून जाणारा मित्र ठरला आहे. येथील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. भारताच्या एनडीआरएफ पथकाने पुत्तलम जिल्ह्यात एका नऊ महिन्यांच्या गर्भवतीला सुरक्षित स्थळी हलवून तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली.

दित्वाह वादळामुळे श्रीलंकेत कित्येक भागांचा संपर्क तुटला. येथील रस्ते वाहून गेल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली. या देशात ३९० लोकांचा मृत्यू झाला आणि ३५२ जण बेपत्ता आहेत. अशा परिस्थितीत भारताने मदतीचा हात देत 'सागर बंधू'च्या माध्यमातून बचाव मोहीम राबवली.

पुत्तलम जिल्ह्यात एनडीआरएफने नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेला सुरक्षित स्थळी हलवून तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध केली तसेच एनडीआरएफच्या पथकांनी स्थानिक प्रशासनासोबत जवळपास ८०० लोकांपर्यंत खाद्यपदार्थ तसेच आवश्यक वस्तूंचा पुरवठा केल्याची माहिती भारतीय उच्चायुक्ताने दिली.

या मोहिमेत भारतीय वायुदलाच्या हेलिकॉप्टर्सनी ५.५ टनांपेक्षा जास्त मदतसामग्री अडचणीच्या ठिकाणी पाठवली. कित्येक भागांत हेलिकॉप्टर्स जमिनीवर उतरवणे शक्य नव्हते, तिथे वरूनच मदत टाकण्यात आली. वायुदलाने गंथुना परिसरातून गंभीर जखमी झालेल्या चार जणांना हवाई रुग्णवाहिकेच्या माध्यमातून रुग्णालयात दाखल केले. (वृत्तसंस्था)



श्रीलंकेच्या बदुल्ला परिसरात शोध व बचावमोहीम राबवताना एनडीआरएफचे जवान

# रिझर्व्ह बँक व्याजदरात कपात करण्याची शक्यता

**◆ कोलकाता, २ डिसेंबर**

महागाईवर ठेवलेला अंकुश आणि वृद्धीचा वेग लक्षात घेता भारतीय रिझर्व्ह बँक डिसेंबरमध्ये होऊ घातलेल्या पतधोरण बैठकीत व्याजदरात २५ बेसिस पॉईंट कपात करू शकते, अशी शक्यता पतमानांकन संस्था केअरएजने मंगळवारी जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे.


ऑक्टोबरमध्ये महागाईचा दर ०.३ टक्क्यांच्या दशकातील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. हा दर रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या ४ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा खूप कमी आहे. त्यामुळे व्याजदर कपातीची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या रिझर्व्ह बँकेचा रेपो दर ५.५ टक्के आहे. ब्रेंट क्रूडच्या स्थिर किमती, रबी पेरणीला आधार देणारी जलपातळी आणि चीनमधील अतिरिक्त क्षमतेमुळे उद्‌भवणारा मंद किमतीचा दबाव यासारख्या घटकांमुळे महागाईत तीव्र वाढ रोखण्यास मदत होईल, असे केअरएजने अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मराठी तारे-तारकांकडे लग्नाचा धडाका

**मुंबई** : सध्या लग्नाचे बरेच मुहूर्त आहेत आणि जागोजागी समारंभही घडत आहेत. असाच लग्नाचा धूमधडाका मराठी मनोरंजन जगतातही दिसतो आहे. नुकतेच 'बिग बॉस' विजेत्या सूरजचे लग्न झाले तर, त्यापाठोपाठ 'स्वराज्य रक्षक संभाजी'फेम प्राजक्ता गायकवाड आणि सोहम बांदेकरचेही शुभमंगल पार पडले. विशेष म्हणजे, खऱ्या आयुष्यातही प्राजक्ताने शंभूराजसोबत लगीनगाठ बांधली आहे. शंभूराज खुटवड याच्यासोबत प्राजक्ताचा विवाह झाला आहे. दुसरीकडे, आदेश बांदेकरांचा मुलगा सोहमचे लग्न अभिनेत्री पूजा बिरारीसोबत झाले. याचे फोटो-व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. हे विवाह सोहळे पार पडले असताना आणखी एका अभिनेत्रीचे लग्न होऊ घातले आहे. ती म्हणजे तेजस्विनी लोणारी. तेजस्विनी राजकीय नेते सदा सरवणकरांची सून होणार असून, तिच्या घरी नुकताच मेहंदीचा कार्यक्रम पार पडला.





### आता व्ही. शांतारामांचे आयुष्य रुपेरी पडद्यावर लवकरच

**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रयोगशील, द्रष्टे दिग्दर्शक, कलावंत व्ही. शांताराम यांच्या जीवनावर आधारित बायोपिक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याचे नाव 'व्ही. शांताराम' असून, नुकतेच त्याचे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. यात सिद्धांत चतुर्वेदी व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत झळकणार आहे. या सिनेमाची आणि सिद्धांतच्या लूकची चर्चा सध्या रंगते आहे. याचे दिग्दर्शक अभिजीत देशपांडे आहेत. त्यांनीच 'आणि काशीनाथ घाणेकर' या गाजलेल्या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले होते. सिद्धांतच्या करिअरमध्ये ही भूमिका फार महत्त्वाची ठरणार आहे. त्याच्यातील कलाकाराला स्वतःचे गुण दाखविण्याची ही फार मोठी संधी मिळाल्याचे बोलले जात आहे.

### सामंथाने 'भूत शुद्धी' पद्धतीने केला विवाह



**हैदराबाद** : दाक्षिणात्य अभिनेत्री सामंथा रूथ प्रभू हिने नुकतेच चित्रपट निर्माता राज निदिमोरू याच्यासोबत कोईम्बतूर येथील लिंग भैरवी देवीसमोर लग्न केले. हा विवाह 'भूत शुद्धी' पद्धतीने पार पडला. भूत शुद्धी ही प्राचीन योगिक परंपरा आहे. या लग्नात पाच फेरे घेतले जातात. पंचमहाभूतांच्या नावाने हे पाच फेरे घेतल्यानंतर भैरवी देवीचा अलंकार आणि हळदीचे मंगळसूत्र घातले जाते. या संपूर्ण प्रक्रियेत मंत्रोच्चार सतत सुरू असतात. हे विवाह करणाऱ्यांना सुमंगला म्हणतात. या विवाहात केवळ वर-वधूच नव्हे तर उपस्थितांचेही शुद्धीकरण केले जाते. ही योगिक काळातील प्राचीन विवाह पद्धती दक्षिण भारतात ख्यात असून, आतापर्यंत भारत आणि परदेशातील एक हजारांहून अधिक जोडप्यांनी भूत शुद्धी विवाह केले आहेत.

# ७२ तासांच्या आत राज्य सोडा

**ओडिशा पोलिसांचा मुस्लिम तरुणांना इशारा**



**◆ मुर्शिदाबाद, २ डिसेंबर**

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथील अनेक मुस्लिम तरुण ओडिशातील नयागडमध्ये वर्षानुवर्षे व्यवसाय करती आहेत. ते त्यांच्या दुचाकीवरून गावोगावी आणि शहरातून प्रवास करतात आणि ब्लँकेट, मच्छरदाणी आणि लोकरीचे कपडे विकतात. ते बंगालीमध्ये संवाद साधत असत, ही गोष्ट पोलिसांना खटकत असे. त्यांनी त्यांना रोहिंग्या आणि बांगलादेशी असे टोपणनाव दिले आणि ७२ तासांच्या आत ओडिशा सोडण्याचा आदेश दिला.

मागील आठवड्यात, ओडगाव पोलिसांनी अशाच व्यवसायात सहभागी असलेल्या चार मुस्लिम तरुणांना ओडिशा सोडण्याचा आदेश दिला होता. ती अंतिम मुदत सोमवारी संपली. मुस्लिम तरुणांनी ओडगाव पोलिस ठाण्यात त्यांचे आधार आणि मतदार कार्ड दाखवले. असे असूनही, पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना तीन दिवसांच्या आत शहर सोडण्याचा अल्टिमेटम दिला.

स्टेशनवरील एका गणवेशधारी पोलिस अधिकाऱ्याने बंगालीमध्ये बोलल्याबद्दल त्यांना वारंवार रोहिंग्या आणि बांगलादेशी म्हटले. ओडिशा सोडण्याचा आदेश दिलेले चार तरुण मुर्शिदाबादच्या डोमकल उपविभागातील जलंगी ब्लॉकमधील सागरपाडा ग्रामपंचायतीचे रहिवासी आहेत. ते बंगालमधून आलेल्या आणि अनेक वर्षांपासून ओडिशामध्ये व्यवसाय करणाऱ्या शेकडो लोकांच्या गटाचा भाग आहेत. पोलिसांचा आदेश मिळाल्यानंतर, त्यांना सोमवारी संध्याकाळी बसने भुवनेश्वरला जाण्यासाठी निघायचे होते. तिथून ते हावडाला जाणारी ट्रेन पकडणार होते.

तरुणांपैकी एक असलेल्या ३२ वर्षीय साहेब शेखने सांगितले, आमच्याकडे कन्फर्म ट्रेन तिकिटे नाहीत. सर्वांत मोठी समस्या आमच्या स्टॉकची आहे. आमच्या घरमालकाला आम्हाला नोटीस बजावावी लागली. आमचा स्टॉक ठेवण्यासाठी आम्हाला सुमारे ३० किमी अंतरावर दुसरी जागा सापडली होती. आमच्याकडे दोन लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचा माल आहे. आता आम्ही त्याचे काय करावे? तो म्हणाला, आम्ही खरेदीदार शोधण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यातील काही वस्तूंची विक्री होताच आम्ही घरी परतू. या वर्षी ओडिशातील बंगालमधील मुस्लिम व्यापारी आणि स्थलांतरित कामगारांना पोलिस कारवाई आणि जमावाच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागले आहे. (वृत्तसंस्था)

## श्रीलंकेतील मृतांचा आकडा ३३४ पार

**◆ कोलंबो, २ डिसेंबर**

चक्रीवादळ दितवाहमुळे श्रीलंकेत आतापर्यंत ३३४ नागरिकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे, तर ३७० पेक्षा अधिक नागरिक बेपत्ता आहे.

अनेक शहरांना पुराचा वेढा कायम आहे, महामार्गांवरील पूल वाहून गेल्याने मदत पोहोचविणे आव्हान बनले आहे. कँडी जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले, येथे ८८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर १५० जण बेपत्ता आहे. याशिवाय बदुल्ला येथे ७१, नुवारा एलिया येथे ६८ आणि मटाले येथे २३ जणांचा मृत्यू झाला. दिलेल्या माहितीनुसार नैसर्गिक आपत्तीमुळे देशभरात ३०९,६०७ लोक प्रभावित झाले. (वृत्तसंस्था)

# पंजाबमध्ये दोन दहशतवाद्यांना अटक

**● चिनी ग्रेनेड , दोन पिस्तूल जप्त ● हल्ला करण्याची योजना उधळली**

**◆ गुरदासपूर, २ डिसेंबर**

पंजाब पोलिसांनी गुरुदासपूर येथून दोन दहशतवाद्यांनी अटक केली, त्यांच्याकडून चिनी बनावटीचे ग्रेनेड आणि दोन पिस्तूल जप्त केले. अटक केलेल्या दहशतवाद्यांनी २५ नोव्हेंबर रोजी गुरुदासपूर पोलिस ठाण्यासमोर स्फोट घडविला होता.

पोलिस महानिरीक्षक संदीप गोयल यांनी सांगितले की, सोमवारी रात्री गुरुदासपूर येथे पुराणा शालाजवळ दोन स्कूटरस्वार हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी नाकाबंदी केली आणि संशयितांना थांबण्याचा इशारा केला. पोलिस पथकाला पाहून



आरोपींनी गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात एक दहशतवादी जखमी झाला. अटक केलेल्या आरोपींध्ये शहजाद भट्टी आणि त्याचा सहकारी झिशान अख्तरचा समावेश आहे.

दोन्ही दहशतवादी बाबर खालसा संघटनेचे असल्याचे तपासात समोर आले. आरोपींकडून चिनी बनावटीचा ग्रेनेड आणि दोन पिस्तूल जप्त करण्यात आले. दहशतवाद्यांची पंजाबमध्ये हल्ला करण्याची योजना होती. मात्र, त्यापूर्वीच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. आरोपी पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या संपर्कात होते. अमेरिकेतील अमनदीपसिंग उर्फ अमन पन्नूच्या सांगण्यावरून शहजाद भट्टी पंजाबमध्ये हल्ले करण्यासाठी स्थानिक तरुणांचा एक गट तयार करीत होता. दिल्ली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन्ही दहशतवाद्यांना पकडण्यात आले. त्यांनतर त्याचे दोन साथीदार गुरुदत्तसिंग आणि होशियारपूर येथील प्रदीपलाही अटक करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# २० तृतीयपंथीयांच्या हाती सुरक्षेची कमान

### हैदराबाद मेट्रोचा ऐतिहासिक निर्णय

**◆ हैदराबाद, २ डिसेंबर**

एक अनोख्या उपक्रमात हैदराबाद मेट्रोने २० तृतीयपंथीयांना कामावर ठेवले आहे. सर्वांना सुरक्षा कर्मचारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. हैदराबाद मेट्रो रेल लिमिटेडचे (एचएमआरएल) या उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

एचएमआरएलने सर्व तृतीयपंथीयांना प्रशिक्षण दिले आणि ते पूर्ण झाल्यावर नियुक्ती केली. त्यांना मेट्रो स्टेशन आणि मेट्रो ट्रेनमध्ये सुरक्षा प्रदान करण्यासाठी



तैनात करण्यात आले आहे. यामुळे महिलांची सुरक्षितता वाढेल, अशी अपेक्षा आहे. हैदराबाद मेट्रो रेल ही देशातील सर्वांत आधुनिक शहरी वाहतूक प्रणालींपैकी एक मानली जाते. हैदराबादमध्ये तीन मेट्रो कॉरिडॉरवर ५७ स्थानके आहेत, ज्यातून दररोज अंदाजे पाच लाख प्रवासी प्रवास करतात. त्यापैकी सुमारे ३० टक्के महिला आहेत. एचएमआरएलने त्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे.

**तेलंगणा सरकारचे स्वप्न**

एचएमआरएलचे संचालक सरफराज अहमद यांच्या मते, २० तृतीयपंथीयांची नियुक्ती हैदराबाद मेट्रो कुटुंबासाठी अभिमानाची गोष्ट आहे. हे केवळ सुरक्षा कर्मचाऱ्यांपेक्षा खूप जास्त आहे. यामुळे केवळ सामाजिक सक्षमीकरणच नव्हे, तर तेलंगणा सरकारच्या समावेशक दृष्टिकोनालाही बळकटी मिळेल. तेलंगणा सरकारने मेट्रो सुरक्षा कर्मचारी म्हणून तृतीयपंथीयांची भरती करण्यातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मागील वर्षी तेलंगणा सरकारने सार्वजनिक ठिकाणी तृतीयपंथीयांना तैनात करण्यासाठी एक मोहीम सुरू केली. त्याच दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# डिजिटल दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी...

डिजिटल अरेस्टच्या वाढत्या घटनांचे आव्हान गंभीर स्वरूप धारण करीत असताना अशा प्रकरणांचा तपास सीबीआयने करावा, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने देणे हा अशा घटनांमध्ये लुबाडल्या गेलेल्या किंवा भविष्यात या गुन्हेगारांचे लक्ष्य ठरणाऱ्या नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. जागतिक पटलावर भारत एक डिजिटल महासत्ता म्हणून स्वतःला सिद्ध करीत असताना डिजिटल अरेस्टच्या घटना वाढत चाललेल्या आहेत. प्रत्यक्षात कुठलीही हिंसा घडत नसली तरी फोनच्या स्क्रीनद्वारे आपल्याला कुणी तरी आपल्या घरातच स्थानबद्ध करू शकतो, हा फार मोठा मानसिक धक्का असतो. लाखो नागरिकांनी या धक्क्याचा अनुभव घेतला आणि त्यांचे कोट्यवधी रुपये या डिजिटल दहशतवाद्यांनी लुटले. डिजिटल अरेस्ट ही नेहमीची फसवणूक किंवा सायबर गुन्हेगारी नसते. नागरिकांच्या विश्वासावर, सरकारी यंत्रणांच्या क्षमतेवर आणि देशाच्या डिजिटल प्रगतीवर प्रश्नचिन्ह उभे करणारा हा दहशतवाद आहे. याची योग्य दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली हे उत्तम झाले. पोलिसांच्या पातळीवर हे गुन्हे रोखले जाणे अशक्य असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सीबीआयसारख्या अधिक तगड्या यंत्रणेला ही जबाबदारी दिली गेली असावी. सीबीआयकडे या कामासाठी अपेक्षित असलेली मनुष्यबळाची उपलब्धता आहे काय, हा प्रश्न आहेच. पण, तो सोडविला जाऊ शकतो. मुद्दा आहे तो डिजिटल दहशतवादाचा पूर्ण बीमोड करण्याचा. ते काम सीबीआय करू शकेल, असा विश्वास न्यायालयाएवढाच जनतेलाही वाटतो आहे. तो विश्वास सार्थ ठरविण्याची जबाबदारी सीबीआयची आहे. डिजिटल अरेस्टच्या घटनांचे आव्हान तसेही स्थानिक पोलिस दलांच्या अखत्यारीतील राहिलेले नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवरील गुन्हेगारीचे धागेदोरे, कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल आणि देशभरातील नागरिकांच्या मनात निर्माण झालेले भय असे अनेक आयाम या घटनांमागे आहेत. गेल्या काही वर्षांत भारतात सायबर फसवणुकीच्या केसेस देशात वाढल्या आहेतच. डिजिटल अरेस्टच्या घटनांनी सायबर गुन्हेगारीच्या आलेखात अचानक आणि प्रचंड वाढ केली. काही महिन्यांपूर्वीपर्यंत देशात या स्वरूपाच्या काहीशे तक्रारी रोज येत होत्या. आता त्यांची संख्या हजारोंच्या घरात पोहोचली आहे. डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून प्रत्येक दिवशी कोट्यवधी रुपये हडपले जातात, असे अनेक राज्यांच्या सायबर सेलने स्पष्ट केले आहे. या गुन्ह्यांच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेतील पैसा मोठ्या प्रमाणावर परदेशात जात असल्याचा मुद्दाही लक्षात आलेला आहे. त्यामुळे नागरिकच नव्हे तर देशाच्या अर्थकारणाच्या दृष्टीने सुद्धा हा दहशतवाद घातक आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू, पुणे यांसारख्या महानगरांमध्ये या गुन्ह्यांनी कहर केला आहे. एकाच मॉड्यूलने एकाच दिवशी दीडशेहून अधिक नागरिकांना डिजिटली स्थानबद्ध केले आणि कुठली तरी अस्तित्वहीन भीती त्यांच्या गळी उतरवून त्यांना लुटले. या अशा गुन्हेगारी मॉड्यूल्सना हाताळणे कोणत्याही एका राज्य पोलिस दलाला शक्य नाही, हेच त्यातून सिद्ध होते. ही गुन्हेगारी आता राज्यांच्या सीमा ओलांडून राष्ट्रीय स्तरावर व संघटित स्वरूपात अस्तित्वात आली आहे आणि तिला आंतरराष्ट्रीय कार्टेल्सचे पाठबळही आहे. त्यामुळे तिला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारच्या यंत्रणांची ताकद आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा दोन्ही गोष्टी हव्या आहेत.

सहसा चर्चेत न येणारा एक मुद्दा या घटनांच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा आहे. तो असा की, या घटनांमध्ये ज्यांना लक्ष्य केले जाते, ते नोकरपेशा युवक, उच्चशिक्षित अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी अशा सर्वांना सरकारी यंत्रणांबद्दल भीती वाटते. त्याची कारणे अशी की, आपल्या सरकारी यंत्रणांचा इतिहास फार चांगला नाही आणि शिवाय त्यांच्या कामकाजाची माहिती नागरिकांना नाही. फोनवर समन्स किंवा नोटीस देणे किंवा ऑनलाईन दंड भरायला लावणे असे प्रकार सरकारी कामकाजात जवळजवळ नसतातच एवढी साधी माहिती शिकलेल्या नागरिकांनाही नसते. महिलांना हे गुन्हेगार भावनिक आणि सामाजिक मुद्दे वापरून ब्लॅकमेल करतात. असे सर्व लोक कायद्याची पुरेशी माहिती नसल्यामुळे आणि अटक झाली तर आपले कसे होईल, या चिंतेमुळे अशा घटनांत बळी पडतात. लुबाडले जातात. यातील सर्वांत मोठा चिंतेचा विषय म्हणजे भीती, लाज किंवा गोंधळामुळे अनेक पीडित लोक तक्रारच करीत नाहीत. या गुन्ह्यांमध्ये वापरली जाणारी साधने अत्यंत प्रगत पद्धतीने फसवणूक करणारी असतात. पोलिस, सीबीआय यासारख्या सरकारी यंत्रणांसारखे दिसणारे कॉलर आयडीज वापरणे, डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून लक्ष्य केलेल्या व्यक्तीच्या आप्ताचा आवाज किंवा व्हिडीओ वापरणे, ग्रीन स्क्रीन तंत्रज्ञान वापरून खोटी कोर्टरुम दाखविणे, बनावट दस्तावेज दाखविणे, फोन कट न करण्याची सक्ती करून लक्ष्य केलेल्या व्यक्तीला एनी डेस्क किंवा टीम व्ह्युअर्ससारखे स्क्रीन शेअरिंग टुल्स वापरण्यास भाग पाडणे, त्यांचे नेटबँकिंगचे तपशील स्क्रीनच्या माध्यमातून घेणे असे अनेक प्रकार या गुन्ह्यांमध्ये घडत असतात. अशा स्थितीत लक्ष्य केलेली व्यक्ती विचारशक्ती हरवून बसते. सुरुवातीला अशा व्यक्तींना फोन करून 'आधार कार्डचा गैरवापर' किंवा 'ड्रग्स पार्सल' यांसारख्या गंभीर गुन्ह्याची नोंद तुमच्या नावावर केली किंवा केली जात असल्याची माहिती दिली जाते. अटकेचा वॉरंट तयार असल्याचे सांगून भावनिक दडपण आणले जाते. व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून स्थानबद्ध केले जाते, इतर कुणाशी बोलू दिले जात नाही, केस बंद करण्यासाठी किंवा जामीन मिळवण्यासाठी त्वरित मोठी रक्कम ट्रान्सफर करण्याचा आदेश दिला जातो आणि मग जे व्हायचे तेच घडते. पैसे ट्रान्सफर होताच ते विशिष्ट व्यवस्थेमार्फत गुन्हेगारी सिंडिकेटच्या ताब्यात किंवा देशाबाहेर जातात. अशा घटनांचे धागेदोरे तपासले असता असेही आढळले की, हे सिंडिकेट्स भारतातील तरुणांना चांगल्या कॉल सेंटर जॉबचे आमिष दाखवून कंबोडिया, लाओस, म्यानमार किंवा दुबईसारख्या देशांमध्ये नेतात. तिथे नेल्यावर त्यांचे पासपोर्ट जप्त केले जातात आणि त्यांना सायबर स्लेव्हज् (सायबर गुन्हेगारीसाठी वापरावयाचे गुलाम) म्हणून भारतीयांनाच फसवण्यासाठी वापरले जाते. या सिंडिकेट्सकडे तंत्रज्ञानाचे पाठबळ देणारी यंत्रणा असते. मनी लॉण्ड्रिंगचे नेटवर्कही असते. हवाला नेटवर्कशीही संबंध असतात. सध्याच्या भारतीय तपास यंत्रणांची रचना आणि त्यातही पोलिसांची क्षमता डिजिटल अरेस्टच्या निमित्ताने उभ्या ठाकलेल्या आव्हानाची हाताळणी करण्यासाठी अपुरी ठरत आहे. परंतु, सीबीआयचा पुढाकार आणि पोलिसांची सक्रियता यातून हे गुन्हे रोखले जाऊ शकतात. याशिवाय, आपल्याला अमेरिका किंवा ब्रिटनच्या धर्तीवर स्वतंत्र राष्ट्रीय सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणा विकसित करावी लागेल. त्यासाठी हजारोंच्या संख्येने सायबर गुन्हेगारीचे तज्ज्ञ असलेले मनुष्यबळ तयार करावे लागेल. आंतरराष्ट्रीय समन्वयासाठीही काम करावे लागेल. तेवढेच महत्त्वाचे आहे ते नागरिकांच्या मनातील भीती व अज्ञान दूर करण्याचे काम. पोलिस किंवा सीबीआयसारख्या जेवढ्या यंत्रणा आहेत, त्यांनी व्यापक प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करून आपल्या कार्यपद्धतीची माहिती दिली पाहिजे. फोनवर अशाप्रकारची कोणतीही कारवाई होत नसते, असे निःसंदिग्धपणे नागरिकांना सांगितले पाहिजे. शेवटचा मुद्दा आहे तो नागरिकांनी सुजाण होण्याचा. प्रत्येकाने ही बाब लक्षात ठेवली पाहिजे की, कोणतीही सरकारी संस्था, पोलिस किंवा कोर्ट कधीही कोणत्याही कारणास्तव फोनवर पैशांची मागणी करीत नसते. तशी मागणी झाल्यास तो फसवणुकीचाच प्रकार आहे, असे बिनदिक्कत समजले पाहिजे आणि त्याची तक्रार दाखल केली पाहिजे. व्हिडीओ कॉलवर 'अटक' करणारा किंवा करू पाहणारा कोणताही 'अधिकारी' हा बनावटच असणार, हे ठामपणे लक्षात ठेवले पाहिजे. नागरिक सजग आणि हुशार झाले तर अर्ध्याअधिक केसेस जागेवरच संपतील. भारताला डिजिटल महासत्ता बनवायचे असेल तर नागरिकांनी डिजिटल जगात स्वतःचे संरक्षण करायला शिकणे आणि सरकारांनी डिजिटल सुरक्षा यंत्रणांना आधुनिक बनवणे अत्यावश्यक आहे. अशा गुन्ह्यांचा तपास सीबीआयकडे सोपविण्याचा निर्देश देऊन सर्वोच्च न्यायालयाने एक नवी दिशा दाखविली आहे. डिजिटल दहशतवाद संपविण्यासाठी पुढचे काम सरकारला आणि नागरिकांना करावे लागणार आहे.

## विशेष

### प्रा. सुखदेव बखळे

# पर्यटन उद्योगात पायाभूत सुविधा

केंद्र सरकार गेल्या काही वर्षांपासून अर्थसंकल्पात पर्यटनाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या घोषणा करीत आहे. त्यातून रोजगार वाढविण्यावर भर दिला जात आहे. २००९ मध्ये पर्यटन मंत्रालयाने ?'कौशल्य ते रोजगार?' नावाची योजना सुरू केली; दुर्दैवाने त्याची फारशी चर्चा होत नाही. हा उपक्रम प्रामुख्याने शाळा सोडलेल्यांना लक्ष्य करीत होता. त्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्याची ही योजना होती. ?'हुनर से रोजगार तक?' (एचएसआरटी) योजनेचे उद्दिष्ट बाजारपेठेशी संबंधित प्रशिक्षण देऊन शहरी गरिबांमध्ये स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हे होते. या माध्यमातून कुशल कामगारांच्या मागणी आणि पुरवठ्यातील दरी भरून काढण्याचा उद्देश आहे. असंघटित क्षेत्राला कौशल्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. या योजनेद्वारे तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न असूनही रोजगाराच्या नेमक्या संख्येत लक्षणीय तफावत कायम आहे. भारतातील पर्यटन क्षेत्राला बळकटी दिल्याने या योजनेची प्रभाविता वाढू शकते. त्यामुळे अधिक सहभागी आकर्षित होऊ शकतात आणि या महत्त्वाच्या उद्योगात रोजगाराच्या संधी वाढू शकतात. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक क्षेत्रांपैकी एक आहे. मार्क ट्वेन भारताबद्दल म्हणाले होते की, ही अशी भूमी आहे, जी सर्व पुरुषांना पाहण्याची इच्छा असते आणि ज्याने त्याची झलक पाहिली आहे तो जगातील इतर सर्व ठिकाणे पाहूनही ती विसरू शकत नाही. जागतिक आर्थिक मंचाच्या (डब्ल्यूईएफ) प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांक, २०२४ मध्ये भारताचे स्थान ३९ आहे. पर्यटन क्षेत्र भारताच्या जीडीपीमध्ये सात टक्के योगदान देते.

एप्रिल २००० ते डिसेंबर २०२३ या कालावधीत हॉटेल आणि पर्यटन उद्योगात एकत्रित ?'एफडीआय इक्विटी?'चा प्रवाह १७.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स होता. तो विविध क्षेत्रांमध्ये मिळालेल्या एकूण एफडीआयच्या २.५७ टक्के होता. ?'इंडिया ब्रँड इक्विटी फाऊंडेशन?' (आयबीईएफ) च्या पर्यटन आणि आतिथ्य उद्योगाच्या वाढीच्या अहवालानुसार, प्रवास आणि पर्यटन हे भारतातील दोन सर्वात मोठे उद्योग आहेत, जे देशाच्या जीडीपीमध्ये अंदाजे १७८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे योगदान देतात. प्रवास आणि पर्यटनामुळे ३२.१ दशलक्ष रोजगार निर्माण झाले, जे २०२१ मध्ये एकूण रोजगाराच्या ७.५ टक्के होते. आतिथ्य उद्योग (हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि ट्रॅव्हल एजन्सीसह) लाखो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार प्रदान करतो. देशांतर्गत पर्यटन ही या उद्योगासाठी एक प्रेरक शक्ती आहे. २०१९ मध्ये १.८ अब्जपेक्षा जास्त देशांतर्गत पर्यटकांनी प्रवास केला आणि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. पर्यटन मंत्रालयाच्या मते डिसेंबर २०२३ मध्ये परदेशी पर्यटकांच्या आगमनाची (एफटीए) संख्या १,०७०,१६३ इतकी नोंदविली गेली. जानेवारी-डिसेंबर



२०२३ या कालावधीमध्ये परदेशी पर्यटकांची संख्या ९,२३६,१०८ इतकी नोंदविली गेली. ती जानेवारी-डिसेंबर २०२२ मध्ये ६,४३७,४६७ होती. परदेशी पर्यटकांच्या दृष्टीने लोकप्रिय स्थळांमध्ये आग्रा येथील ताजमहाल, अमृतसर येथील सुवर्णमंदिर, गोव्याचे समुद्रकिनारे, केरळचे बॅकवॉटर आणि हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडची टेकडी यांचा समावेश आहे. आता त्यात उत्तर प्रदेशातील अयोध्येतील राम मंदिराची भर पडली आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये अयोध्येला जाणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहिली, तर हे देवस्थान देशात उत्पन्नाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. अयोध्येत पर्यटनाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्याचा हा परिणाम आहे. लोकांच्या धार्मिक भावनांचा विचार करूनही पर्यटन वाढवता येते आणि लोकांच्या खिशातून अलगद पैसा काढता येतो, त्यासाठी कला लागते. देशाच्या लांब किनारपट्टीवर विविध आकर्षक समुद्रकिनारे आहेत. याव्यतिरिक्त भारतातील प्रवास बाजार आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत १२५ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, तर २०२८ पर्यंत आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आगमन ३०.५ दशलक्ष पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२९ पर्यंत या क्षेत्रामध्ये अंदाजे ५३ दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या उद्योगाचे थेट योगदान २०१९ ते २०३० दरम्यान वार्षिक ७-९ टक्के वाढीचा दर नोंदविण्याची अपेक्षा आहे. विमानतळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि पासपोर्टची उपलब्धता वाढल्यामुळे आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत भारतीय विमान वाहतूक बाजार अंदाजे २० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२७ पर्यंत हे प्रमाण जवळपास दुप्पट होऊ शकते. भारतीय हॉटेल बाजारपेठ आर्थिक वर्ष २०२० मध्ये ३२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत ५२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांची वाढती मागणी आणि बाजारपेठेला चालना देण्यासाठी ट्रॅव्हल एजंट्सच्या सततच्या प्रयत्नांमुळे हे अपेक्षित आहे.

महाराष्ट्राने पर्यटन विकासावर भर दिला आहे. नाशिक येथे पुढच्या वर्षी कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी आतापासूनच पायाभूत सुविधांची निर्मिती केली जात आहे. सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्चून विविध कामे हाती घेतली जात आहेत. आणखी निधी लागल्यास त्याचीही तयारी आहे. कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डीलाही येतात. त्यामुळे नाशिकपासून १०० किलोमीटरच्या परिसरात धार्मिक पर्यटन वाढेल, असा अंदाज आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. राज्याचे पर्यटन संचालनालय विद्यमान पर्यटन धोरण चौकटीत वाढ करण्याची आशा करीत आहे. ?'महाटुरिझम?' शाश्वत विकास आणि जबाबदार पर्यटन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. महाराष्ट्रात पर्यटकांचा ओघ वाढविण्याच्या उद्देशाने टूर पॅकेजेससाठी प्रोत्साहने द्यायला सुरुवात झाली आहे. हॉटेल व्यावसायिकांना आणि पर्यटन उद्योगाला पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. मुंबई महोत्सवासारख्या उपक्रमांद्वारे शाश्वततेला प्रोत्साहन देत आहे. प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आणि शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांशी सहकार्य हे पर्यावरणपूरक पर्यटन पद्धतींबद्दलची देशाची वचनबद्धता अधोरेखित करते. अलिकडेच सुरू झालेल्या ?'एएआय?' धोरणामुळेही या उपक्रमांना बळकटी मिळाली आहे. त्याचा उद्देश हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि पर्यटनात लिंग समावेशकता वाढविणे आहे. यासाठी सुमारे ३५ इरादा पत्रे आधीच जारी करण्यात आली असून धोरणाचा सक्रियपणे प्रचार केला जात आहे. त्यात लक्षणीय रस दिसून येत आहे.

महिला प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आता सवलती दिल्या आहेत. पर्यटन मंत्रालयाचे अधिकारी दीडशे प्रस्तावांसह ५० स्थळांना अंतिम रूप देण्याची आणि विकसित करण्याची तयारी करीत आहे. भारत सरकारच्या पर्यटन महासंचालक मनीषा सक्सेना यांनी परदेशी कार्यालयांचे एकत्रीकरण, क्षमता बांधणी, स्थानिक सहभागाची भूमिका आणि मंत्रालयासाठी फायदेशीर इतर उपक्रमांबाबत तपशीलवार माहिती दिली. याव्यतिरिक्त २०२४ पर्यटन अजेंड्यामध्ये विभाग-विशिष्ट धोरणेदेखील समाविष्ट आहेत. पर्यटनातील पार्किंग समस्यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि लोकप्रिय तीर्थस्थळांव्यतिरिक्त अष्टविनायकसारख्या कमी ज्ञात धार्मिक स्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विविध पर्यटन पोर्टफोलिओचा भाग म्हणून कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि आदिवासी पर्यटनाला सक्रियपणे प्रोत्साहन दिले जात आहे. महाराष्ट्र देशांतर्गत पर्यटकांच्या आगमनात सहाव्या क्रमांकावर तर परदेशी पर्यटकांच्या आगमनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भविष्यात महाराष्ट्र पर्यटन पारंपरिक योजनांच्या पलीकडे विस्तार करण्याचा विचार करीत आहे. वाईन पर्यटन केंद्रांनी नाशिकपाठोपाठ जुन्नर आणि सोलापूरसारख्या ठिकाणी वाईन महोत्सवांसारख्या यशस्वी उपक्रमांची पुनरावृत्ती केली. हे प्रयत्न विद्यमान पर्यटन कार्यक्रमांमध्ये वैविध्य आणण्याच्या उद्देशाने दूरदर्शी ठरतात.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

### गिरीश शेरेकर

# अमरावतीत बनावट नोटांचा छापखाना!

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर बनावट भारतीय चलन तयार करून ते चलनात आणण्याचे रॅकेट सक्रिय असल्याचे समोर आले आहे. पण, असे रॅकेट जिल्हास्तरावरही सक्रिय असणे हे फारच धक्कादायक आहे. अमरावतीच्या नांदगाव पेठ पोलिसांनी नकली नोटांच्या प्रकरणाचा सखोल तपास केल्यानेच या रॅकेटचा भंडाफोड झाला आहे. राज्याच्या अन्य जिल्ह्यांतही बनावट नोटा चलनात आणल्याची अनेक प्रकरणे आतापर्यंत समोर आली आहेत. परंतु, स्थानिक पातळीवरच त्या तयार करायच्या आणि तेथेच चलनात आणायच्या असा प्रकार आतापर्यंत राज्यातले दोन-चार मोठे जिल्हे वगळता फारसा कुठे आढळून आला नाही. अमरावतीत तो उघड झाल्यामुळे असे रॅकेट इतरही जिल्ह्यांमध्ये कार्यरत असण्याची दाट शक्यता आहे. आता सर्व जिल्ह्यातल्या पोलिसांनी सतर्क राहून अशा टोळ्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. अमरावतीत ज्यांना अटक करण्यात आली आहे, त्यांची कसून चौकशी केली तर काही धागेदोरे निश्चित हातात लागू शकतात.

नांदगाव पेठ पोलिसांना रहाटगाव परिसरात बनावट नोटा चलनात आणल्या जात असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली होती. त्या आधारावर त्यांनी पहिली कारवाई १५ ऑक्टोबरला केली होती. तेव्हा तिघांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्याकडून २६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या होत्या. या तिघांची सखोल चौकशी केल्यावर प्राप्त माहितीवरून १९ ऑक्टोबरला आणखी दोघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडे ५७ हजारांच्या बनावट नोटा होत्या. अशा एकूण ५०० च्या १६७ बनावट नोटा पोलिसांना मिळाल्या. त्याचे चलनमूल्य ८३ हजार ५०० होते. या पाचही जणांची वेगवेगळी चौकशी केल्यावर हे एक रॅकेट आहे आणि त्याचा सूत्रधारही असल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे या नोटा शहरातल्या मोठ्या दुकानांमध्ये चलनात आणल्या जात नव्हत्या. कारण, तेथे पितळ उघडे पडण्याचा धोका असल्याने या टोळीने छोटी शहरे व गावातील दुकानांमध्ये त्या चलनात आणल्याचे तपासात समोर आले. त्याचवेळी या नोटा येथेच तयार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. तेव्हापासून नांदगाव पेठ पोलिस व गुन्हे शाखा पथक या रॅकेटच्या मुख्य सूत्रधाराच्या शोधात होते. त्यांचा अतिशय गोपनीय पद्धतीने तपास सुरू होता. अमरावतीच्या सुफीयाना नगरात सूत्रधार अब्दुल तौसिफ आला आहे, अशी माहिती दोन दिवसांपूर्वी पोलिसांना मिळताच त्यांनी छापा टाकला. चौकशी केल्यावर त्याने नकली नोटा स्वतःच तयार केल्या व अटकेतल्या इतर आरोपींना पुरवल्याचे कबूल केले. त्याच्या घराची झडतीत पोलिसांना बनावट चलन बनविण्याचा छोटा छापखानाच आढळून आला. तेथे हिरव्या रंगाचा प्लेटिंग थ्रेट, ट्रेसिंग पेपर, रबरी शिक्के, कटर, ग्लू, प्रिंटर, बॉण्ड पेपर व अन्य साहित्य आढळले. याशिवाय ५०० रुपयांच्या २० व २०० रुपयांच्या ५५ नोटा अशा एकूण २१ हजाराच्या बनावट नोटा आढळून आल्या. पोलिसांनी हे सर्व साहित्य व नोटा जप्त केल्या. उपरोक्त प्रकरणाचा तपास अधिक गुंतागुंतीचा होता. मुख्य सूत्रधार सतत ठिकाणे बदलत असल्याने त्याच्यावर नजर ठेवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. गोपनीय माहितीची पडताळणी, तांत्रिक तपास आणि पोलिस पथकातील सदस्यांच्या समन्वयामुळे ही कारवाई यशस्वी झाली आहे. त्यामुळेच हे तपास पथक अभिनंदनास पात्र आहे. या प्रकरणात पोलिसांनी येथेच थांबू नये. सूत्रधाराची त्यांनी आणखी सविस्तर चौकशी करायला हवी. त्याला बनावट नोटा तयार करण्याचे प्रशिक्षण कुठे मिळाले व कोणी दिले? या गोरखधंद्यात त्याच्या पाठीमागे आणखी कोणी आहेत का? याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे. बनावट चलन सर्वांगाने देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक आहे. मोठे पाठबळ असल्यावरच असे धंदे करण्याची हिंमत येते. हे लक्षात घेऊन राज्याच्या गृहमंत्रालयाने या प्रकरणात लक्ष घालायला हवे. शक्य असेल तर एखादे विशेष तपास पथक तयार करून या प्रकरणाचा तपास व्हायला हवा. आतापर्यंत अनेक ठिकाणी झालेल्या कारवाईंचा अभ्यास करून या रॅकेटची साखळी आणखी किती लांब आहे, हे समोर येऊ शकते. अमरावतीत उघड झालेले हे प्रकरण तपास यंत्रणांनी गंभीरतेने घ्यावे, इतकीच अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

### प्रा. दिलीप जोशी

# गरुडपुराण

१८ पुराणांमध्ये गरुडपुराण श्रेष्ठतम पुराण आहे.

**'यथा सुराणाम् प्रवरो जनार्दनो,**
**यथायुद्धानां प्रवरः सुदर्शनम् ।**
**तथा पुराणेशू च गारुडं च मुख्यं,**
**तदाहूर्हरीतत्त्वदर्शने ॥'**

जसा देवांमध्ये जनार्दन श्रेष्ठ, आयुधांमध्ये सुदर्शन चक्र श्रेष्ठ तसेच पुराणांमध्ये गरुडपुराण श्रेष्ठ आहे. गरुडपुराणाची अधिष्ठात्री देवता भगवान विष्णू आहेत. त्यामुळे हे वैष्णव पुराण आहे. गरुडपुराणाविषयी अनेक भ्रम आणि संभ्रम, समज-गैरसमज असल्यामुळे हे पुराण सर्वसामान्य लोक निषिद्ध मानतात. ते घरात ठेवण्यासही घाबरतात. पण हे सर्वथा चूक आहे. उलट जो मनुष्य गरुडपुराण नित्य वाचतो तो ऐहिक सुखासोबत पारलौकिक मोक्षाचाही अधिकारी बनतो. त्यामुळे गरुडपुराण घरात ठेवू नये, नित्य वाचू नये, घरात मृत्यू झाला असेल तरच वाचावे हे सर्व गैरसमज आहेत. उलटपक्षी गरुडपुराण अभ्यासाने आपल्याला जीवनमूल्यांचे महत्त्व कळते. पारमार्थिक महत्त्व कळते आणि कर्तव्य भावना निर्माण होते. आत्मकल्याणाचा मार्ग तर कळतोच; ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्गही प्रशस्त होतो. म्हणून हे पुराण घरात असावे, त्याचे नित्य पठन अथवा श्रवण असावे. गरुडपुराणाबाबत गैरसमज नसावा.

गरुडपुराणाचे साधारणतः १९ हजार श्लोक आहेत. पैकी ८००० श्लोक सर्वज्ञात आहेत. २७५ विषय असलेल्या गरुडपुराणाचे मुख्यतः तीन खंडात विभाजन केले आहे. १) पूर्वखंड २) उत्तरखंड ३) ब्रह्मखंड या तीन खंडांना कांडानुसार नावे दिली आहेत. पूर्वखंडाला आचार कांड, उत्तर खंडाला धर्मकांड तर ब्रह्मखंडाला ब्रह्मकांड म्हणतात. आचार कांडात सृष्टिनिर्माण, भक्त ध्रुवाचे चरित्र, बारा आदित्यांची कथा, सूर्य-चंद्रासहित ग्रहांची उपासना विधी, भक्ती, ज्ञान, वैराग्य, सद्आचार, सद्विचार याचा विचार आहे. सोबतच तप, दान, यज्ञ, तीर्थसेवन, सत्कर्म अनुष्ठान आणि त्यांचे फळ याचा विचार आहे. याच खंडात व्याकरण, छंद, स्वर, ज्योतिष, आयुर्वेद याचाही विचार मांडला आहे.



गरुडपुराणातील दुसरा खंड आहे उत्तरखंड. याला धर्मकांड म्हणतात. हा गरुडपुराणाचा गाभा आहे. यात प्रेतकल्पाचे विवेचन आहे. मरणासन्न व्यक्ती असेल तर त्याच्या मोक्षासाठी विविध विधी दान सांगितले आहेत. मृत्यूनंतर दाह संस्कार, पिंडदान, श्राद्ध, सापिंडी, कर्मविपाक या सोबतच आत्मज्ञान प्रतिपादित केले आहे. याच पुराणातील तिसरे ब्रह्मकांड असून यात गरुडपुराण माहात्म्य, श्रीकृष्ण कथा, भगवान श्रीकृष्णाद्वारा गरुडाला विष्णू महिमा कथन इत्यादी आहे.

**याला गरुडपुराण का म्हणतात?** : आपली आई विनताला नागांनी कैद केल्यामुळे तिच्या सुटकेसाठी पक्षिराज गरुडाने भगवान श्रीहरीची तपश्चर्या केली. भगवान प्रसन्न झाले. त्याने वर मागितल्यावर भगवान श्रीहरींनी त्याला विष्णू माहात्म्य असलेली पुराण संहिता पारायण सांगितले. गरुडांनी ती पठन केल्यामुळे त्या पुराण संहितेला 'गरुडपुराण' हे नाव पडले. पुढे हेच पुराण गरुडांनी कश्यप ऋषींना कथन केले. गरुडांनी कश्यप ऋषींना सांगितले म्हणूनही गरुडपुराण. खरं म्हणजे गरुडपुराणात केवळ अंत्यसंस्कार, पिंडदान वगैरेच आहे, असा अनेकांचा समज नसून या पुराणात ध्यानयोग आहे. सूर्य पूजन, सुदर्शन पूजन, विविध विधींवर चर्चा आहे. सर्प विषापासून इतरही विषबाधेवर मंत्र साधना आहे. शाळिग्रामपासून ते विविध रत्न परीक्षा दिल्या आहेत. विविध रोगांवरील उपाययोजना सांगितल्या आहेत; ज्यात हृदरोग, कुष्ठरोग, वात-पित्त-ज्वारादी रोग, मूत्ररोगापासून अनेक रोगांवरील उपाय तसेच वैद्यकशास्त्राची परिभाषा दिली आहे. याच पुराणात व्याकरण शास्त्र आहे. नित्य श्राद्ध, वृद्धी श्राद्ध, एकोद्दिष्ट श्राद्ध यांचाही विचार आहे. याच पुराणात मरणासन्न अवस्था, मरणोपरांत यावेळीचे विधी, स्वर्गलोक, नरकलोक यावरही प्रतिपादन आहे. अकाल मृत्यू, दानाचे महत्त्व अशा अनेक बाबींचा विचार गरुडपुराणात आहे. याशिवाय भगवान श्रीकृष्ण, श्रीहरी विष्णू, देवी महालक्ष्मीचे विविध अवतार वर्णन, भगवान शेष, भगवान रुद्र अवतार, सूर्यपुत्री कालिंदी, सोमपुत्री जांबवंती यांचेही वर्णन आहे.

थोडक्यात या पुराणात वेद, श्रुती, योग, याग, विधी आहेत. सृष्टीची उत्पत्ती, भारतवर्ष वर्णन आयुर्वेद, औषधी शास्त्र, प्रेतकल्प, प्रेतमुक्ती इत्यादी बाबी आहेत. गरुडपुराण प्रासादिक, सर्व मंगल आणि सकारात्मक ग्रंथ असून त्याचे नित्य वाचन करण्यास काहीही हरकत नाही. तो घरात ठेवावा, तो अभ्यासावा. त्याला काळ वेळेचे बंधन नाही. तो शुभ ग्रंथ असून त्याच्याविषयी कोणताही गैरसमज नसावा. इतर पुराणांप्रमाणेच गरुडपुराणही पवित्र, शुभ आणि ऐहिक सुखासोबत पारलौकिक सुख देणारे पुराण आहे.

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-६१

बुधवार, ३ डिसेंबर २०२५

### हिंदु आम्ही भीति कुणाची जगती आम्हाला

हिंदु आम्ही भीति कुणाची जगती आम्हाला
भगवा ध्वज हा प्राण आमुचा जीवनपुष्पे पुजु या त्याला ॥धृ.॥

वीर शिवाजी बंदा बाजी प्रताप तानाजी होऽ प्रताप तानाजी
प्राण अर्पुनी वैभव दिधले अपुल्या हिंदूधर्माला ॥१॥

हिंदू भाग्य आमुचे हिंदु जन्मलो हिंदुस्थानात, होऽ हिंदुस्थानात
हिंदू गर्जत गर्जत करु या पावन जगताला ॥२॥

गडी सवंगडी साथ घेउनी करु या मेळावा, होऽ करु या मेळावा
हिंदुत्वाची विजयपताका नेउनि भिडवू गगनाला ॥३॥

काळाची ना कदर अम्हाला वीर खडे राहू होऽ वीर खडे राहू
अभंग धैर्ये ठाण मांडुनी खेचुनि आणू विजयश्रीला ॥४॥

उज्ज्वलतेच्या परंपरेला जागवु हृदयात होऽ जागवु हृदयात
मातृभूमिच्या मंगल भाली लावू सुभाग्य तिलकाला ॥५॥

संघटनेचे जीवन जगुनी स्वधर्महित साधू होऽ स्वधर्महित साधू
केशव केशव नामोच्चारे गाठू वैभव शिखराला ॥६॥

## बिहार निवडणुकीचा धडा

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपसह रालोआने अपेक्षेपेक्षाही अधिक यश मिळवल्यामुळे विरोधी पक्षांचे धाबे दणाणले आहे. बिहारवासीयांनी, तेथील सर्वधर्मीय मतदारांनी रालोआच्या पारड्यात भरघोस मते देऊन 'जो देशहित की बात करेगा, वही देश पर राज करेगा' या तत्त्वाला पाठिंबा दिला आहे. निवडणूक काळात जनताजनार्दनाला उघड आणि जाहीर धमक्या देणाऱ्या तेजस्वी यादव यांना गाशा गुंडाळावा लागला. काँग्रेसची अवस्था तर अपेक्षेपेक्षाही जास्त बिकट झाली. या निकालानंतर देशभरातील इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या झोपा उडाल्या आहेत. त्यातही राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आले आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी हैराण झाल्या आहेत. एसआयआरला अपशकुन करण्यासाठी आणि घुसखोरांना वाचवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद या मार्गांचा वापर करून एसआयआरबद्दल जनतेची दिशाभूल केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही या नेत्यांचे हीन राजकारण सुरूच आहे. तरीही राष्ट्रीय निवडणूक आयोगाने आपल्या संवैधानिक कर्तव्यपूर्तीचा विडा उचलला आहे. मृत झालेले, दुबार नोंदणी असलेले, जागा बदलून गेलेले आणि भारताचे नागरिक नसलेले मतदार निवडणूक मतदारयादीत ठेवणे संविधानाच्या विरोधात आहे. अशांची नावे मतदारयादीतून


## वाचक पत्रे

वगळली गेलीच पाहिजेत. बेकायदेशीर घुसखोरांचे समर्थन करणाऱ्या, त्यांना सर्व प्रकारच्या सरकारी सुविधा पुरवणाऱ्या, त्यांना आधार कार्ड-रेशन कार्ड-मतदार ओळखपत्र आणि पॅन कार्ड देऊन मतदारयादीत घुसवणाऱ्या देशविरोधी घटकांविरोधात कडक कायदेशीर कारवाई केली पाहिजे. एसआयआर प्रक्रियेत विघ्न आणणाऱ्या घटकांनाही कायद्याचा हिसका दाखवला पाहिजे. असे केल्याशिवाय भारतीयांना न्याय मिळणार नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## चांदीच्या दत्त बालमूर्तीची प्राणप्रतिष्ठा

पारतंत्र्याच्या काळात १९३२ साली जबलपूरसारख्या हिंदी भाषी प्रांतात 'वंदे मातरम'च्या प्रेरणेतून श्री दत्त भजन मंडळाची स्थापना झाली. जबलपूर येथील श्री दत्त भजन मंडळात श्री दत्ताची सुंदर विग्रह असलेली मूर्ती दर्शनीय आहे. त्यामुळे अर्थातच इथे सृष्टीचे उत्पादक, पालक, संहारक, सत्त्व-रज-तम त्रिगुणात्मक रूपात विराजमान आहेत. धर्म, अध्यात्म आणि सांस्कृतिक मूल्यांना जपणारी ही एक अग्रणी संस्था असून, मराठी माणसाचे श्रद्धास्थान आहे. इथे कीर्तन, प्रवचन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून भक्तीचा झरा नेहमीच पाझरत असतो. अशा या मंडळाच्या ९४ वर्षांच्या समृद्ध गौरवशाली परंपरेतील मोहनमाळेत अजून अजून एक नवीन मोती गुंफला जात आहे आणि तो मोती म्हणजे बाल दत्ताच्या रौप्यमूर्तीची प्राणप्रतिष्ठा. श्रीदत्त जन्मोत्सवाच्या प्रसंगी ही बालमूर्ती पाळण्यात आपल्या रूपाची प्रभा पसरवणार आहे.



या अनुषंगाने जबलपुरात शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने मराठी माणसाने यात भाग घेतला. धार्मिक आयोजनासोबत संस्था गरीब विद्यार्थी सहायता, निःशुल्क होमिओपॅथिक औषधालय, परप्रांतातून येणाऱ्या मराठी माणसासाठी अल्प दरात उत्तम राहण्याची व्यवस्था, असे प्रकल्प राबवते.

**अभय गोरे**/९८९३७१९२७८

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ठाकरे बंधुंनी एकत्र येण्याचं नीट ठरवलं की, मग मी त्यांना शंभर प्रश्न विचारेन!

## सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

शिवसेना उबाठा गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षाचे नेते म्हणजे ठाकरे बंधू, हे मुंबईच्या कार्यक्रमांमध्ये वारंवार एकत्र येतात पण ते काय करणार आहेत हे जाहीर मात्र करत नाहीत; त्यांना नक्की कोणाची भीती वाटते? त्यांना एकत्र यायचं आहे. पण ते घोषित करत नाहीत. याचा अर्थ कुठेतरी माशी शिकते असा होतो. त्यांनी एकदा ठरवावं, एकमेकावर विश्वास आहे की नाही, दोघं एकत्र येण्याची हिंमत आहे की नाही? त्यांचे एकदा ठरले की मग मी त्यांना शंभर प्रश्न विचारायला तयार आहे, असे मत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सोलापुरात व्यक्त केले.

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी नगर परिषदेच्या प्रचार सभेकरता ते सोलापुरात आले असता आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला दिलखुलास उत्तरे दिली. नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीमध्ये सगळीकडे एकमेकांच्या विरोधात उमेदवार उभारलेत, भाजप शिवसेनेवर टीका करते, शिवसेनेच्या नेत्यांकडून भाजपवर टीका होत आहेत त्याच्यामुळे वातावरण कुठेतरी कलुषित होत आहे असं जनमानसाच मत झालेलं आहे.

त्याच्याबद्दल तुमचं काय? या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री शेलार म्हणाले की, निवडणुकीच्या प्रचाराम ध्ये आरोप प्रत्यारोप होतच असतात;



प्रत्येकाला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. यामुळे जनतेत चर्चा होते, त्याचा बॅड इफेक्ट होऊ नये याबद्दल आम चे प्रयत्न आहेत. प्रत्येक ठिकाणी आम्ही निवडणूक लढवतोय; विरोधकांना स्पेस मिळू नये याची दखलही आम्ही घेत आहोत.

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही माहितीच्या माध्यम ातून लढण्याची आमची इच्छा आहे. त्यामुळे २ डिसेंबरपर्यंत आम्ही काही बोलणार नाही, असं बोललो होतो. वास्तविक पाहता मी रसायनशास्त्राचा विद्यार्थी आहे, त्यामुळे कोणत्या घटकांमध्ये काय मिसळलं की काय निर्माण होतं; हे मला माहित आहे असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

पक्षात जरी आज इनकमिंग वाढत असलं तरी जुन्या कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही, अशी आमची भूमिका असणार आहे. पक्षात येणाऱ्याच स्वागत जरी करीत असलो तरी कार्यकर्त्यांना विचारात घेऊनच त्यांना प्रवेश दिलेला असतो. पक्ष वाढीसाठी प्रवेश देणे गरजेचे आहे पण कुणावर अन्याय होणार नाही याची दक्षता आम्ही घेत आहोत.

तिकिटासाठी जरी कोणी पक्षात येत असला तरी पक्षाच्या बैठकीमध्ये जो निर्णय होईल त्याप्रमाणे तिकिटाची वाटप होईल असेही त्यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या मताशी मी सहमत

राज्य निवडणूक आयोग जरी सतत नियम बदलत आहे. या प्रश्नावर विचारले असता नामदार शेलार म्हणाले की, त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले मत व्यक्त केले आहे. कुणाचं चुकत आहे आणि कोणाचं बरोबर आहे याबाबत त्यांनी मत व्यक्त केल्यानंतर आम्ही त्यावर बोलणार नाही त्यांच्या मताशी आम्ही सहमत असल्याचा निर्वाळाही ना. शेलार यांनी दिला.

### प्रदेशाध्यक्षांवरील टीका खपवून घेणार नाही

रवींद्र चव्हाण हे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आहेत ते आमचे नेते आहेत, रवींद्र चव्हाण यांनी केलेली पक्षासाठीची मेहनत अतुलनीय आहे. त्यामुळे त्यांच्यावर कोणताही केलेला आरोप आम्ही सहन करणार नाही. त्यामुळे राणे यांनी आरोप करताना विचार करावा, असाही सल्ला मंत्री शेलार यांनी दिला.



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका उत्तर सोलापूर भाग सोलापूर, पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मजरेवाडी येथील करली नगर मधील यासी नवीन सर्व्हे नं. ३५/१ मधील प्लॉट नं. २४० या प्लॉटचे हद्द पूर्वपश्चिम ४० फूट व दक्षिणोत्तर २५ फूट असे एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फूट अथवा ९२.९३ चौ. मीटर असून यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे पूर्वेस-प्लॉट नं. २४१, दक्षिणेस प्लॉट नं. २४२, पश्चिमेस अंतर्गत रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं. २३८ या वर्णनाची मिळकत याती तद्ंगभूत वस्तूसह व सर्व हक्कासह.

या वर्णनाची मिळकत ही श्री. नागेश दशरथ भिंगे, रा. ३७, मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर यांच्या मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलांना करुन दिल्यामुळे आमच्या अशिलांनी सदरची मिळकत खरेदी करण्याचे ठरवून, तसा जागा मालकांबरोबर लेखी करारही केलेला आहे व इसारा रक्कम स्वीकारलेली आहे. आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहारही पुर्ण करणार आहेत.

तरी सदरच्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या अस्सल कागदपत्रांसह खालील पत्यावर आणुन दाखवून ते निर्दशनास आणून द्यावे. सदर मिळकतीबाबत कोणाचाही वाद, लवाद, गहाण, जप्ती, हुकूमनामा, बोजा, टाच, मालकी, कब्जेहक्क, भाडेहक्क इत्यादी व अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क असेल तर त्यांनी ०८ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रत्यक्ष भेटून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कळवून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही वाजवी हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून पुर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता.०२/१२/२०२५.

सही/-
**ॲड दिपाली बी. मडूर**
बी.ए.,एल एल. बी.,
**'पदमाई'** निवास, प्लॉट नं.३३,
आदर्श नगर, सोलापूर ९८२३४३०२२२

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी, (राज्य उत्पादन शुल्क विभाग) सोलापूर यांचे कार्यालय,**
**१४५-अ, रेल्वे लाईन्स, सोलापूर**
**दुरध्वनी क्र. ०२१७-२३१२३७६** **ई-मेल आयडी**-solapurstateexcise@gmail.com

## जाहीर नोटीस

**सोलापूर जिल्ह्यातील ताडी दुकानाचे जाहिर**
**ई लिलाव-नि-निविदा प्रक्रिया राबवून अनुज्ञप्त्या मंजूर करणेबाबत..**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सोलापूर जिल्ह्यातील ताडी दुकाने ताडी वर्ष २०२५-२६ करिता जाहिर ई लिलाव-नि-निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ताडी दुकानांचा जाहिर ई लिलाव-नि-निविदा दि. २८/११/२०२५ ते दि. २०/१२/२०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेली आहे. तसेच ताडी दुकानाचा जाहिर ई-लिलाव दिनांक १२/१२/२०२५ रोजी होणार असून याची सर्व इच्छुक निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

ताडी दुकानांची यादी, इतर नियम ई लिलाव-नि-निविदा बाबतच्या अटी व शर्ती इत्यादी बाबतची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in व संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहिती आवश्यक असलेस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

(मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मान्यतेने)

**ठिकाण :- सोलापूर**
**दिनांक :- २८/११/२०२५**

**सही/-**
**(भाग्यश्री पं. जाधव)**
**अधीक्षक**
**राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर**
**जिल्हाधिकारी, सोलापूर करिता**

विमाका/पुणे/जाहि./२४५/२०२५-२६

## CHANGE IN NAME

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Alimuddin** HAS BEEN CHANGED TO **Aleem Basumiya Naikwadi**
Resi. - Plot No.314, Siddheshwar Nagar Bhag-4, New Jindagi Chowk, Solapur
**KINDLY NOTE**
THE SAME. (41772 Dtd.27.11.2025)

## व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव

तालुका व जिल्हा धाराशिव
**email id:- osdvmcollege@gmail.com**

जा.क्र. ई-निविदा/०२/२०२५-२६ **जाहीर ई-निविदा सुचना क्र. ०२/२०२५-२६** दिनांक ०१/१२/२०२५

**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव (जि. धाराशिव)** यांनी नोंदणीकृत व मान्यताप्राप्त ठेकेदार/पुरवठादार यांच्याकडून व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांना **प्रयोगशाळा उपकरणे पुरवठा करण्यासाठी** दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपली निविदा **०३/१२/२०२५ ते १०/१२/२०२५ रोजी सायं. १८:५५** या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सादर करावी. **निविदापूर्व बैठक दिनांक ०६/१२/२०२५ सकाळी ११:०० वाजता व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. उपरोक्त ई-निविदा फॉर्म विक्री व स्वीकृतीची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येत आहे.

तरी सर्व निविदाधारकांनी विहित वेळेत आपला तांत्रिक लिफाफा ऑनलाइन (online) पद्धतीने सादर करावा. अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या टोल-फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :**

१. कोणतीही एक किंवा सर्व निविदा **कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार** प्राचार्य, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांनी राखून ठेवलेला आहे.
२. निविदाधारकांनी निविदा रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम Net Banking द्वारे On-line सादर करावी.

स्वाक्षरित/-
**प्राचार्य,**
**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव**

## पर्यावरणीय मंजुरी मिळाल्याची सूचना

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील चिंचोली औद्योगिक क्षेत्र, चिंचोलीकाटी गावातील प्लॉट क्रमांक: C-194 येथे असलेल्या SRAJ इंडस्ट्रीजने MoEF&CC (पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय) कडून दिनांक 15 नोव्हेंबर 2025 रोजी F. क्रमांक IA-J-11011/539/2022-IA-II (I) द्वारे पर्यावरणीय मंजुरी (EC) प्राप्त केली आहे. अधिक माहितीसाठी www.parivesh.nic.in ला भेट द्या.

**एसआरएजे**
**इंडस्ट्रीजसाठी एसडी/- मालक**



# शिधापत्रिकांतील साडेबारा मयतांची नावे डिलीट

- ६०० क्विंटलने धान्य कोटा झाला कमी
- कमी होणार ई-केवायसी नसलेल्यांचे धान्य
- अन्यधान्य वितरण अधिकारी पडोळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

शहरातील स्वस्त धान्य दुकानांच्या शिधापत्रिकांमधील मयत झालेल्या नागरिकांच्या नावांची शोधमोहीम राबवून गेल्या २ महिन्यात तब्बल साडेबारा हजारापर्यंत नावे कमी केली असून, या मयतांच्या नावे येणारा जवळपास ६०० क्विंटल मालाचा कोटा कमी केल्याची माहिती शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना आज (दि. २) दिली. दरम्यान, ई-केवायसी न केलेल्या नागरिकांचे धान्यही शासन स्तरावरुन बंद होणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

शहरातील ३१४ स्वस्त धान्य दुकानांमध्ये ५ लाख ३५ हजार १०६ लाभार्थी आहेत. यातील मयत, स्थलांतरीत झालेल्या किंवा लग्न होवून सासरी गेलेल्या मुलींची नावे कमी करण्यात आली आहेत. सोलापुरात गेल्या ४ महिन्यात ४ लाख ५ हजार ६३५ जणांनी ई-केवायसी केली आहे. उर्वरित १ लाख २९ हजार ४५२ जणांनी अद्याप ई-केवायसी केली नाही. वारंवार आवाहन करून, राशन दुकानदारांनी प्रत्यक्ष भेटूनही नागरिकांना ई-केवायसी करण्याचे आवाहन केले आहे. तरीही अनेक नागरिक ई-केवायसी करीत नसल्याची खंत आहे. दरम्यान, या नागरिकांचे धान्य शासन स्तरावरून बंद झाल्यास त्यांचे मोठे नुकसान होणार आहे. यामुळे जवळच्या रास्त भाव धान्य दुकानात, महा ई-सेवा केंद्रावर जावून किंवा घरी मोबाईलवरून ई-केवायसी करून घ्यावे.

### नोव्हेंबरपासून अंत्योदय कार्डधारकांना मिळणार 'साखर'

गेल्या काही महिन्यांपासून रास्त भाव धान्य दुकानातून बंद झालेली साखर शासनाकडून पुन्हा चालू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अंत्योदय कार्डधारक असलेल्या कुटुंबांना प्रतिमाह १ किलोप्रमाणे साखर मिळणार आहे. या कार्डधारकांना साखर वाटप करण्यासाठी ६ महिन्याचा कोटा आमच्याकडे आला आहे. या महिन्यापासून ही साखर वाटप करण्यात येईल.

**-ओंकार पडोळे,**
**अन्नधान्य वितरण अधिकारी**



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विकी अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. २३/०५/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार नवकार ट्रेडर्स प्रोप्रा सोनाली संजय बलदोटा रा. १०८ बालाजी कॉलनी सोलापूर रोड, बार्शी व जामीनदार यांना पाठवून रक्कम रु ३७,८९,५२३.१९ यावर दिनांक ०१/१२/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहोत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

**कर्जदार -**
नवकार ट्रेडर्स प्रोप्रा सोनाली संजय बलदोटा
**जामीनदार -**
१. ऋषभ संजय बलदोटा रा १०८, बालाजी कॉलनी सोलापूर रोड, बार्शी

| मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत |
|---|---|---|
| सोनाली संजय बलदोटा | डी व सब डी सोलापूर पैकी ता. बार्शी नगर पालिका हद्दीतील<br>गट नं. १४१०/६/अ/१४१०/७/१३६४/३/२/९३<br>क्षेत्र २.०७.०५ आर. चौ.मी. आकार १३७.००<br>चतुसिमाः<br>पूर्वस - प्लॉट नं.९२ दक्षिणेस - प्लॉट नं.९४<br>पश्चिमेस - ९ मी रुंदीचा रस्ता उत्तरेस - ९ मी. रुंदीचा रस्ता | रु. १८,९३,६८१/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक, ली, सोलापूर<br>६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२<br>**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक** - ०२/०१/२०२६<br>वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत<br>**निविदा उघडण्याची तारीख व वेळ -** दि. ०३/०१/२०२६ सायंकाळी ५.०० वाजता | |
| ३१.१०.२०२५ अखेर येणेबाकी | रु. ६८,२९,५४८/-दि. ०१.११.२०२५ पासून पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च | |

**टिप-** लिलावात भाग घेणार यांनी राखीव किंमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.०१/०१/२०२६ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आर.टी.जी.एस अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. २. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील. ३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. ४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - ०१/१२/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

**विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ मधील नियम ८ (६) व ९ नुसार स्थावर मालमत्तेची निविदा मागवून विक्री करण्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येते कि, या ठिकाणी नमूद करण्यात आलेली स्थावर मिळकत ज्याचा प्रत्यक्ष ताबा सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ नुसार घेण्यात आलेला असून निविदा मागवून मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री पुढील अटी आणि शर्तीनुसार करण्यासाठी इच्छुक निविदादाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | कर्ज खाते क्र. थकीत कर्ज रक्कम | मागणी नोटीस दिनांक / प्रत्यक्ष ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :**<br>**१) नवनाथ बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**३) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**४) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**५) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>दोघे रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | **कर्ज खाते क्र. ००५००३२०७००००००९**<br>एकूण रक्कम रुपये **३,९७,९०,७८३/- (तीन कोटी सत्याण्णव लाख नव्वद हजार सातशे त्र्याऐंशी) अधिक** दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा पूर्वेस - रस्ता पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८ उत्तरेस - सर्वे नं. ३२३ दक्षिणेस - रस्ता |
| २ | **कर्जदार :**<br>**१) नवनाथ बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नवनाथ बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**३) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**४) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**५) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**६) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>दोघे रा : ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | कर्ज खाते क्र. **००५००३२१३००००००५**<br>एकूण रक्कम रुपये **१,४३,५६,६५८/- (एक कोटी त्रेचाळी लाख छप्पन हजार सहाशे अठ्ठावन्न)** अधिक दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगर पालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा पूर्वेस - रस्ता पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८ उत्तरेस - सर्वे नं. ३२३ दक्षिणेस - रस्ता |
| ३ | **कर्जदार :**<br>**१) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नवनाथ बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**३) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**४) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**५) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | कर्ज खाते क्र. **००५००३२१३००००००४**<br>एकूण रक्कम रुपये **१,२९,४०,६६९/- (एक कोटी एकोणतीस लाख चाळीस हजार सहाशे एकोणसत्तर)** अधिक दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा पूर्वेस - रस्ता पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८ उत्तरेस - सर्वे नं. ३२३ दक्षिणेस - रस्ता |

**राखीव किंमत :-** रु. ५,९९,५३,५४५/- (रु. पाच कोटी नव्याणव लाख त्रेप्पन हजार पाचशे पंचेचाळीस फक्त)
**बयाणा रक्कम :-** रु. ५९,९६,०००/- (रु. एकोणसाठ लाख शहाण्णव हजार फक्त)
**निविदा स्वीकृतीची तारीख आणि वेळ :** दि. ०५/०१/२०२६- दुपारी ३:०० पर्यंत
**निविदा दाखल करण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
**अ) निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ :** दि. ०७/०१/२०२६ सायंकाळी ५:०० वाजता
**ब) निविदा उघडण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**इतर अटी आणि शर्ती :**

१) स्थावर मालमत्तेची विक्री **"जेथे आहे, तशी आहे"** या तत्वावर आणि जर काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. (बँकेकडील माहितीनुसार मालमत्तेवर बोजा नाही)
२) राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीस मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.
३) मालमत्तेची पाहणी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० पर्यंत करता येईल.
४) इच्छुक प्रस्तावकाने त्याची निविदा कोऱ्या कागदावर मोहोरबंद पाकिटात त्यावर **"नवनाथ बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स यांची मौजे मजरेवाडी येथील मालमत्ता खरेदीसाठी निविदा"** असे पाकिटावर लिहून बयाणा रक्कम अनामत रक्कमेपोटी (ईएमडी) **रु. ५९,९६,०००/-** जी राखीव किंमतीच्या अंदाजे १० टक्के आहे. **श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर** यांच्या नावे काढलेली डिमांड ड्राफ्टसह दिनांक ०५/०१/२०२६ - दुपारी ३:०० पर्यंत वाजेपर्यंत सादर करावी.
५) यशस्वी प्रस्तावकाच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या बँकेच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
६) यशस्वी प्रस्तावकाने विक्रीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रक्कमेसह) विक्रीचा व्यवहार त्याचाशी झाल्यानंतर त्वरित आणि उर्वरित रक्कम १५ दिवसाच्या आत जमा करावयाची आहे. जर प्रस्तावकाने नमूद केल्यानुसार विक्रीची रक्कम जमा केली नाही तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त होईल.
७) व्यवहारासाठी लागणारा अन्य खर्च, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, इतर खर्च यशस्वी प्रस्तावकाने भरावयाचा आहे.
८) प्राधिकृत अधिकार्याने कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवला आहे.
९) अधिक तपशीलासाठी मोबाईल क्र. ७०२०८३३०६० व कोणत्याही कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

**दिनांक : ०३/१२/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

# भारताचे लक्ष्य मालिका जिंकण्यावर विराट-रोहितकडून चांगल्या खेळीची अपेक्षा

## द. आफ्रिकेविरुद्ध दुसरा एकदिवसीय सामना आज

◆ रायपूर, २ डिसेंबर

पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केल्यानंतर आता भारताचे लक्ष्य दुसरा सामना जिंकून मालिका जिंकण्यावर राहणार आहे. तसेच विराट कोहली आणि रोहित शर्माची धडाकेबाज फलंदाजी प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

कोहलीचे ५२ वे एकदिवसीय शतक आणि रोहितच्या आक्रमक ५७ धावांच्या खेळीमुळे भारताने रांची येथील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला होता. २०२७ च्या एकदिवसीय विवचषकाला अजून दोन वर्षे बाकी असताना, प्रत्येक सामना कोहली आणि रोहितसाठी त्यांची तंदुरुस्ती आणि फॉर्म सिद्ध करण्याचे एक साधन आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्याशी वाढत्या मतभेदांचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे.



गेल्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताच्या विजयाचे शिल्पकार असलेल्या रोहित आणि कोहलीने दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या विश्वचषकासाठी आपला दावा मजबूत केला आहे. रोहितच्या शानदार कामगिरीमुळे भारताला ऑक्टोबरमध्ये सिडनी वनडेमध्ये ऑस्ट्रेलियाचा नऊ गड्यांनी पराभव करण्यास मदत झाली.

निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर आणि गंभीर यांनी विश्वचषकात त्यांच्या सहभागाबद्दल कोणतीही टिप्पणी केलेली नाही. पहिला सामना जिंकूनही, भारताच्या चिंता कमी झालेल्या नाहीत. लिस्ट ए क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी करणाऱ्या ऋतुराज गायकवाडला चौथ्या क्रमांकावर बढती देण्यात आली, परंतु तो त्यासाठी तयार दिसत नव्हता. कार्यवाहक कर्णधार केएल राहुल सहाव्या क्रमांकावर आला.

वॉशिंग्टन सुंदरला फलंदाजी क्रमाने प्रयोग करण्याची सवय झाली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कोलकाता कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आल्यानंतर, त्याला पहिल्या एकदिवसीय सामन्यात पाचव्या क्रमांकावर बढती देण्यात आली, परंतु तो मोठी खेळी करू शकला नाही. त्याने फक्त तीन षटके टाकली आणि १८ धावा दिल्या.

हर्षित राणाने नवीन चेंडूने दोन गडी बाद केले परंतु नंतर त्याने खूप धावा दिल्या. त्याला त्याच्या फलंदाजीवर नियंत्रण ठेवावे लागेल. आयसीसीच्या नवीन नियमांनुसार, बॅट आणि बॉलमधील संतुलन राखण्यासाठी, ३४ व्या आणि ५० व्या षटकात उपलब्ध असलेल्या दोन चेंडूंपैकी फक्त एकच चेंडू वापरता येतो. कुलदीप यादवने ६८ धावा देऊन चार बळी घेतले. तो महागडा ठरला असला तरी, त्याच्या वैविध्यपूर्ण गोलंदाजीमुळे दक्षिण आफ्रिकेचे पुनरागमनाचे प्रयत्न हाणून पाडण्यास मदत झाली.

एका वेळी ११ धावांत तीन बळी गमावलेल्या दक्षिण आफ्रिकेने उल्लेखनीय पुनरागमन केले. मार्को जॅन्सनने २६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि ३९ चेंडूत ७० धावा केल्या. मॅथ्यू ब्रेजकेने भारताविरुद्धच्या त्याच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ७२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने कर्णधार टेम्बा बावुमा आणि फिरकी गोलंदाज केशव महाराज यांच्याशिवाय पहिला एकदिवसीय सामना खेळला, ज्यांना विश्रांती देण्यात आली होती. दोघांच्या पुनरागमनामुळे संघ बळकट होईल. भारताने डिसेंबर २०२३ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्धचा टी-२० सामना देखील २० धावांनी जिंकला होता. ◀(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**भारत विरुद्ध द. आफ्रिका**
**स्थळ** : शहीद वीर नारायण सिंग स्टेडियम, रायपूर
**वेळ** : दुपारी १.३० वाजपापासून
**थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्सवर



# आशियाई पदकप्राप्त तनिष्का ठोकळला सोलापूर विद्यापीठाचे आर्थिक सहाय्य

### व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची खेळाडू तनिष्का ठोकळ हिने सिंगापूर येथे झालेल्या ज्युनियर आशिया कप स्टेज २ स्पर्धेत खेळताना भारतीय संघाला रौप्य पदक प्राप्त करून दिले. तसेच ओव्हर ऑल स्कोअरिंगमध्ये तिने जागतिक स्तरावर नवीन विक्रम प्रस्थापित केला.

त्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने तिला एक लाख ७० हजार रुपयाचे प्रोत्साहनपर मदत देण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्यानंतर तिला हे आर्थिक सहाय्य विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी मंजूर केले. तिचे विद्यापीठाचे प्रो. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, क्रीडा संचालक व प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी अभिनंदन केले.

तनिष्काने छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात शिकताना शालेय स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर सलग दोन वर्षे यश मिळविले. तसेच खेलो इंडिया स्पर्धेतही तिने सहभाग नोंदविला. सध्या ती वालचंद महाविद्यालय येथे बीएससीचे शिक्षण घेत असून शिक्षणाबरोबर मैदानावर सातत्याने सराव करून ही कामगिरी केली.

# महाराष्ट्राच्या पहिल्या डावात ४२१ धावांच्या प्रत्युत्तरात हिमाचल प्रदेशाची पडझड

**दुसऱ्या दिवसअखेर ७ बाद २०० धावा, अद्यापी २२१ धावांनी पिछाडीवर**

**सुआशिकचे शतक, अंश धीमनचे ४ बळी**



अर्पित सिंग



अनिश जोशी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर काल पासून सुरू झालेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश सामन्यात दुसऱ्या दिवशीच्या खेळात महाराष्ट्राने पहिल्या डावात सर्व बाद ४२१ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दुसऱ्या दिवशीचा खेळ थांबला तेव्हा हिमाचल प्रदेशने ७ बाद २०० धावा केल्या असून अद्यापि २२१ धावांनी पिछाडीवर आहेत.

हिमाचलच्या आर्यन सोबत आणखी एक ठाकूर, लक्ष्य फलंदाजीला आला व दोघांनी एक दोन धावा करत शेवटच्या सत्रात तासाभरात ४० धावांची भागीदारी रचत २०० धावांचा टप्पा गाठला असून महाराष्ट्राने फॉलोऑन लादण्यासाठी उर्वरित ३ खेळाडू ७१ धावांत बाद करण्याची गरज आहे. तिसऱ्या दिवशी सकाळी लवकरात लवकर जमलेली जोडी फोडून हिमाचल संघाला सर्व बाद करण्याची संधी महाराष्ट्र संघ किती षटकात मिळवतो ते पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात नाबाद जोडीने खेळ पुढे सुरू केला पण ५व्याच षटकात शुभम कदमला (४७) अंशने यष्टिरक्षक कर्णधार आदित्य कटारियाकडे झेल देण्यास भाग पाडले आणि जोडी फोडली. दोघांनी ८व्या गड्यासाठी ९९ धावांची भागीदारी केली. त्यानंतर आलेल्या तळातील फलंदाज अनिश जोशीने देखील ताबडतोब फटकेबाजीला सुरुवात केली. संयमी फलंदाजी करत असलेल्या सुआशिकला अक्षय वशिष्ठने त्रिफळाचित बाद करत त्याचे शतक हुकवले. जगतापने १४३ चेंडूत ७ चौकार सह ८७ धावा केल्या. अंतिम खेळाडू हर्षिल सावंत सोबत अनिशने धावफलक हलता ठेवत ४२१ पर्यंत धावसंख्या नेली. पण तेंव्हाच तो पायचीत झाला आणि तासाभरात ६७ धावा करत महाराष्ट्राचा पहिला डाव १०७व्या षटकात संपुष्टात आला. हिमाचल प्रदेशकडून अंश धीमन ८४/४ बळी, नौनिहाल आर. १००/३ बळी, अक्षय वशिष्ठ ७०/२ बळी तर आर्यन ठाकूरने १ बळी मिळवला.

हिमाचल प्रदेशचा पहिल्या डावात मध्यमगती गोलंदाज अनिश जोशीने आपला जादुई स्पेलवर दुसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर अक्षय शर्माला बाद करत झटका दिला. त्यानंतर जेमतेम ३२ धावांची भागीदारी करत असताना पुन्हा अनिशने कर्णधार आदित्य कटारिया जो चेंडू गणिक धावा करताना यष्टिरक्षक साई कडे झेल देण्यास भाग पाडले आणि जोडी फोडली. जेवणासाठी खेळ थांबला तेंव्हा धावसंख्या २ बाद ३४ (९.५षटके) होती.

जेवणानंतर पुन्हा अनिशने जादुई गोलंदाजी कायम राखत १६व्या षटकात २ चेंडूच्या फरकाने अरमान विज, अक्षय वशिष्ठ यांना शून्यावर माघारी धाडले व पहिले चारही बळी मिळवले. त्याच्याच सोबत मग हर्षिल सावंतने देखील सचिन मेहता (१) याला पण यष्टिरक्षक करवी झेलबाद केले आणि दोघांनी मिळून हिमाचलचा निम्मा संघ केवळ ५४ धावांत गारद केला. आर्यन ठाकूरने मात्र सलामीवीर अर्पित सिंग सोबत संयमी फलंदाजी करत संघाची धावसंख्या चहापानपर्यंत ६ बाद १३४ केली.

चहापाननंतर पुन्हा दोघांनी ८७ धावांची भागीदारी व १६० धावा झाल्या असताना शुभम कदमने अर्पित (७४, १६५ चेंडू, ११ चौकार) याला त्रिफळा बाद करीत मोठा अडसर दूर केला.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी २३ डिसेंबरपर्यंत अर्ज करा

**जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांचे आवाहन**

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडा व खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उदेृशाने शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार दिला जातो. गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू महिला, पुरुष व एक दिव्यांग खेळाडू, असे पुरस्कार देण्यात येणार आहे.

या पुरस्कारासाठी १ जुलै ते ३० जून या कालावधीसाठी मागील खेळाडूंसाठी पाच वर्षाची कामगिरी विचारत घेतली जाईल तसेच क्रीडा मार्गदर्शकासाठी दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम रुपये १० हजार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करणा-या अर्जदा-याचे त्या जिल्हयात किमान १५ वर्ष वास्तव्य असले पाहिजे. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शकाचे कार्य कलेले असले पाहिजे व त्याने वयाची ३५ वर्ष पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूंने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व पाच वर्षापैकी दोन वर्षे त्या जिल्हयाचे मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या १० वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राष्ट्रीयस्तरा पर्यत पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील,सांघिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स ,वरिष्ठ राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य/जिल्हा अजिक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहीत नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तिक रित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

तरी जिल्ह्यातील इच्छुकांनी अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याशी संपर्क साधून विहीत नमुन्यातील अर्ज २३ डिसेंबर २०२५ पर्यत परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.



# बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाचे ६ खेळाडू विद्यापीठ संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २ डिसेंबर-**

राज्यपाल कार्यालयातर्फे ४ ते ८ डिसेंबरदरम्यान २७ व्या राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात होणार आहेत. स्पर्धेसाठी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संघात निवड झाली आहे. खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय यादव, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, प्रमोद जाधव, संतोष कवडे आदींनी अभिनंदन केले.

**निवडलेले खेळाडू :** अनिकेत सावंत, समीना मुलाणी, सृष्टी गवळी (खो-खो). वेदश्री बंडेवार व अर्पिता शिंदे ( बॅडमिंटन), अरबाज शेख (मैदानी, लांब उडी).

# किशोर-किशोरी जिल्हा खो खो स्पर्धा करमाळ्यातील वीटमध्ये १० डिसेंबरला

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

किशोर-किशोरी १४ वर्षाखालील जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा करमाळ्यातील वीटमध्ये छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर बुधवार १० डिसेंबर २०२५ रोजी होईल.

ही स्पर्धा सोलापूर सोलापूर खो खो ॲम्युचर असोसिएशन, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वीट (ता. करमाळा) आणि न्यू सोलापूर क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे. या स्पर्धेतून वडाळा मुंबई येथे २५ ते २८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या ३९वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेसाठी जिल्ह्याचे संघ निवडण्यात येणार आहेत.

या स्पर्धेसाठी किशोर-किशोरी १४ वर्षाखालील म्हणजेच ५ फेब्रुवारी २०१२ रोजी अथवा त्यानंतर जन्मलेले असावेत. तसेच किशोर-किशोरीसाठी वय (वर्ष), उंची (से.मी.) व वजन (कि. ग्रॅ.) २१५ असे मूल्यांकन असेल. खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड दाखवणे बंधनकारक आहे. संबंधित किशोर-किशोरी हे सोलापूर जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयात शिकणारे असले पाहिजे.

**श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वीट व न्यू सोलापूर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन**

प्रवेश शुल्क भरल्याशिवाय भाग्यपत्रिकेत संघाचे नाव समाविष्ट करण्यात येणार नाही याची इच्छुक संघानी नोंद घ्यावी. संलग्न जिल्हा संघानी संघटनेचे तांत्रिक समितीचे सचिव शिवशंकर राठोड ( मो. ७०२०८ ६९७२९) यांच्याकडे प्रवेश शुल्कासह विविध नमुन्यातील अर्जासह ९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव उमाकांत गायकवाड यांनी केले आहे.



# विभागीय हॉकी स्पर्धेत सहस्त्रार्जून प्रशाला तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

पुणे विभागीय शालेय हॉकी स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात सहस्त्रार्जुन प्रशालेने तृतीय स्थान संपादिले. तृतीय क्रमांकाच्या सामन्यात नारायणगाव पुणे ग्रामीण स्कूलला पेनल्टी स्ट्रोकवर ४-२ असा विजय संपादन केला.

या स्पर्धेत कल्याणी नागनसुरे हिने शानदार खेळी केली. संघास शारीरिक शिक्षक संचालक डॉ. उज्वल मलजी व राजेश वरगंटी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर, संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजानन गोयल, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने, इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सविता हातवळणे यांनी विजयी संघाचे कौतुक केले.

**तृतीय संघ :** कर्णधार शेषाद्री मोघे, कल्याणी नागणसूरे, सुकन्या माने, गोलकीपर श्रेया हौजी, वर्षाराणी गोरकल, श्रावणी घदुरे, सोम्या स्वामी, साक्षी स्वामी, प्रणाली पोपल ,तनुजा हक्के, पूर्वा हक्के, संस्कृती माकणे, , ईश्वरी खताळ, रचना हंडे, समृद्धी राठोड.

# उत्कर्ष शिलवंत अकादमीच्या आदित्य सागरचा चौकार

### जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत उत्कर्ष शिलवंत अकादमीच्या आदित्य सागरने १५ व १७ वर्षांखालील गटात एकेरीत आणि दुहेरीत याच गटात शर्व बिराजदार व ओंकार हर्लेकरच्या साथीत विजेतेपद पटकाविले.

जामश्री येथे इलेजिअम क्लब येथे झालेल्या जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत उत्कर्ष शिलवंत अकादमीने उल्लेखनीय कामगिरी केली.




**कामगिरी : विजेते :** स्वराली गायकवाड ( १० वर्षांखालील), सिद्धी झिंगाडे (१२ वर्षांखालील), आदित्य सागर (१५ व १७ वर्षांखालील), सिमरन इराबत्ती (१७ वर्षांखालील), आदित्य सागर व शर्व बिराजदार (१५ वर्षांखालील), आदित्य सागर व ओंकार हर्लेकर (१७ वर्षांखालील).

**उपविजेते :** समर्थ सागर (१२ वर्षांखालील), सिमरन इराबत्ती (१५ वर्षांखालील). सई साळुंखे, ओंकार हर्लेकर, राजवीर आयुष (१७ वर्षांखालील),

# महत्त्वाचे

## हरमनप्रीत कौर पीएनबीची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर



**नवी दिल्ली** : पंजाब नॅशनल बँकेने (पीएनबी) विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली. बँकेने येथे प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हरमनप्रीत ही त्यांची पहिली महिला ब्रॅण्ड ॲम्बेसेडर आहे. या प्रसंगी हरमनप्रीतला तिच्या नावाची पीएनबी जर्सी आणि खास कोरलेली पीएनबी बॅट भेट देण्यात आली. हरमनप्रीत म्हणाली, मी १८ वर्षांची असल्यापासून माझे पीएनबीमध्ये खाते आहे. माझे पहिले खाते पीएनबी मोगा शाखेत होते. आज बँकेची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती होणे हा सन्मान आहे. ■

## आशियाई पॅरा गेम्सच्या पथकाला मान्यता

**नवी दिल्ली** : दुबई येथे ७ ते १४ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या आशियाई युवा पॅरा गेम्ससाठी क्रीडा मंत्रालयाने १६१ सदस्यीय भारतीय पथकाला मान्यता दिली आहे, परंतु काही अधिकारी आणि खेळाडू परदेशात बेपत्ता झाल्याच्या भूतकाळातील घटनांचा हवाला देत, त्या सर्वांची पृष्ठभूमी तपासणी देखील अनिवार्य केली आहे. या यादीत ९९ खेळाडू (६१ पुरुष आणि ३८ महिला), ६२ प्रशिक्षक, सहायक कर्मचारी आणि संघ अधिकाऱ्यांची नावे आहेत. पथक परतल्यानंतर ३० दिवसांच्या आत मंत्रालयाने कृती फोटो आणि इतर दृश्यांसह तपशीलवार कामगिरी अहवाल मागितला आहे. भारतीय पॅरालिम्पिक समिती (पीसीआय) ला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, काही अधिकारी आणि खेळाडू परदेशात बेपत्ता होण्याच्या भूतकाळातील घटनांमुळे, पथकातील सदस्य आणि अधिकाऱ्यांची पृष्ठभूमी भारतीय क्रीडा प्राधिकरण किंवा राष्ट्रीय क्रीडा महासंघांनी सखोल चौकशी करावी असे मंत्रालयाचे मत आहे. पीसीआयचे सरचिटणीस जयवंत गुंडू हम्मनावर हे एकमेव अधिकारी आहेत ज्यांचा प्रवास सरकारी खर्चाने होणार नाही या कारणास्तव मंजूर करण्यात आला आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, पीसीआय हे सुनिश्चित करेल की पीसीआय कार्यकारी समिती, कोणत्याही राष्ट्रीय क्रीडा महासंघ किंवा इतर कोणत्याही क्रीडा संस्थेत ज्यांचे नाव यादीत आहे, त्यांचा खर्च सरकार उचलणार नाही. काही शीर्ष पॅरा-ॲथलिट्सनी मोठ्या स्पर्धांदरम्यान सहायक कर्मचारी आणि व्हीलचेअर सहायकांच्या बेपत्ता होण्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. खेळाडू बेपत्ता झाल्याची कोणतीही घटना नोंदवली गेली नाही, परंतु अधिकारी परदेशी स्पर्धा म्हणजे सहली असल्यासारखे वागल्याच्या तक्रारी आल्या आहेत. ऑक्टोबरमध्ये झालेल्या आशियाई पॅरा टेबल टेनिस चॅम्पियनशिप दरम्यान, व्हीलचेअरवर बसलेला एक प्रशिक्षक त्याच्या मुलाला सहायक म्हणून घेऊन गेला आणि बीजिंगमधील स्पर्धेदरम्यान दोघे गायब झाले.

## ट्रॅक ॲण्ड फील्डमध्ये चार विक्रम

**जयपूर** : मंगळवारी येथे झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये चंदीगड विद्यापीठातील दोन खेळाडूंसह चार खेळाडूंनी ट्रॅक ॲण्ड फील्डमध्ये मीट विक्रम प्रस्थापित केले, तर गुरु नानक देव युनिव्हर्सिटीने पुरुषांच्या २० किमी चालण्यात आणि दीपिकाने महिलांच्या भालाफेकीत नवा मीट रेकॉर्ड प्रस्थापित केला. स्वर्णिम गुजरात स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीच्या रुचिर मोरीने पुरुषांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत नवा मीट विक्रम प्रस्थापित केला आणि लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या पूजाने महिलांच्या उंच उडीत नवा विक्रम प्रस्थापित केला. गुरु नानक देव युनिव्हर्सिटी ३१ सुवर्णपदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे. गेल्या गेम्स चॅम्पियन चंदीगड विद्यापीठाने मंगळवारी ११ सुवर्णपदके जिंकली, ज्यामध्ये कॅनोइंग आणि कायाकिंगमध्ये सात सुवर्णपदके समाविष्ट होती, ज्यामुळे त्यांची पदकांची संख्या २२ झाली. सकाळच्या सत्रात, राहुलने सुरुवातीपासून शेवटपर्यंत २० किमी चालण्यात वर्चस्व गाजवले आणि १ तास २५ मिनिटे ४३ सेकंदांच्या वेळेसह विजेतेपद पटकावले. जननायक चंद्रशेखर विद्यापीठाच्या सूरज यादवने १:३०:६.५० सेकंदांच्या वेळेसह रौप्य पदक जिंकले.

## रोहित, विराटच्या उपस्थितीने रोचकता वाढते : टेम्बा बावुमा

**रायपूर** : दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने भारतीय दिग्गज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या उपस्थितीबद्दल महत्त्वपूर्ण विधान केले आहे. सामन्यांपूर्वी तो म्हणाला की, या अनुभवी खेळाडूंच्या उपस्थितीमुळे संपूर्ण मालिकेचा स्तर आणि उत्साह वाढतो. संभाषणादरम्यान बावुमा म्हणाला की, रोहित शर्मा २००७ च्या टी-२० विश्वचषकात खेळला तेव्हा मी शाळेत होतो. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारखे खेळाडू प्रचंड अनुभव घेऊन येतात आणि हा अनुभव मालिका आणखी रोमांचक बनवतो. बावुमाचा विश्वास आहे की असा अनुभव आणि दीर्घकाळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना मैदानात उतरवणे नेहमीच आव्हानात्मक असते. ■

सोलापूर
# तरुण भारत
आयोजित
## "मला हवंय आदर्श सोलापूर"
यादी क्रमांक ८





## या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रेरणा लोंढे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| २ | पूर्वा मोळकेरी | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ३ | दया कोळेकर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ४ | अनमोल सवडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ५ | श्रेयस पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ६ | महंमद सय्यद | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७ | पौर्णिमा पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८ | आचल भवर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ९ | ऐश्वर्या आरबेल | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १० | जानवी माने | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११ | श्रीदेवी राठोड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२ | निरंजन देडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३ | अथर्व उंबरदंद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४ | मानवी बुरटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५ | श्रेया हंचाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १६ | परिहा पांढरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १७ | प्रगती पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १८ | सानिका सपाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १९ | सर्वेश अष्टगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २० | श्लोक देशमाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २१ | विराज काशिद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २२ | पराग कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २३ | विहान कुमार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २४ | अरव लहाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २५ | चयन संकलेचा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | आरव तोडकरी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २७ | रजत वानकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २८ | अश्विका जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २९ | स्वरनिका कमटम | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३० | आरोही कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३१ | उर्वी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३२ | आदर्शिनी लिंबोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३३ | मैनवी मोगीली | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३४ | आशी शहा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३५ | आराध्या सुरेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३६ | गोविंदसिंग दोडमनी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३७ | ओम गुजराथी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३८ | आर्यन गुतल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३९ | अमान जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४० | अद्वीक लोंढे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४१ | प्रितम मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४२ | अलिया काझी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४३ | विश्वराज पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४४ | विहान दोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४५ | शौर्य थोरात | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४६ | विस्मया कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४७ | अनत शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४८ | अस्मि हुंडेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४९ | जिजा पाटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५० | झिया शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | आर्यन सलगरकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५२ | फैझ मोमिन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५३ | स्वानंद तपकिरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५४ | समर्थ जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५५ | सृष्टी अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५६ | सोनम अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५७ | शिवानी अर्जुन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५८ | अदिती बेळ्ळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५९ | प्रणवी चेंडके | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६० | पवित्रा गायकवाड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६१ | स्मिता गौर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६२ | स्वराली होटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६३ | धनश्री जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६४ | शर्वरी जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६५ | अलिझा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६६ | हुमेरा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६७ | फैजाबानो वाडिकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६८ | विराजसिंग चव्हान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६९ | तुषार धायफुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७० | रोशन फुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७१ | प्रतिक जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७२ | जय कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७३ | राजवीर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७४ | विघ्नेश्वर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७५ | प्रसाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | |
|---|---|---|
| ७६ | असद सय्यद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७७ | श्रेयश उदानशीव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७८ | मधुरा बासुतकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७९ | समृद्धी भोसले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८० | अन्वी गांगजी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८१ | ममता गरदास | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८२ | काव्या जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८३ | जान्हवी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८४ | आकांक्षा शिवशरण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८५ | अप्रिता गाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८६ | अक्षरा मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८७ | अंशिया सादिक | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८८ | शिवाजी काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८९ | आरोह जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९० | स्वरा नाईकनिंबाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९१ | आरुषी शिंगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९२ | हुमैरा बागवान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९३ | अफिफा पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९४ | माही शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९५ | प्रिन्स चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९६ | शौर्य देशमुख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९७ | सारंग देशपांडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९८ | समर्थ नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९९ | श्रावण सारसांबी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०० | ईशान सावले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १०१ | रूद्रप्रताप मोसलगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०२ | आरव जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०३ | रूद्रा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०४ | पियुष शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०५ | श्रुती अंकुशराव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०६ | रुतुजा बहालसकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०७ | प्रार्थना चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०८ | अदिती हताले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०९ | अंगारिका कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११० | अलमस पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १११ | मिहीर राजे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११२ | इब्राहिम बिजापूरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११३ | प्रज्योत तिर्थकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११४ | मंथन उपळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११५ | श्रेया केंद्रे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११६ | ईश्वरी माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११७ | वर्षा मंगलुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११८ | क्षिषा पेंटर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११९ | वैष्णवी पन्हाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२० | शिवानी सहानी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२१ | प्रतिज्ञा स्वामी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२२ | शौर्य कासे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२३ | श्रावणी क्षीरसागर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२४ | फलकनाझ मुजावर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२५ | वैष्णवी सोनार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२६ | विराज घेरडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२७ | श्रीपाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२८ | संकेत राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२९ | प्रणव रेवे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३० | रिशा बेग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३१ | वैष्णवी दण्णे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३२ | आकांक्षा काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३३ | श्रेयांशी कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३४ | स्वरा कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३५ | श्रावणी म्हमाणे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १३६ | नितीशा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३७ | अफिया पटेल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३८ | ईशिता पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३९ | रूजुता विंचुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४० | हर्षवर्धन बाबे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४१ | हर्षद बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४२ | युवराज बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४३ | ओम गुडमल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४४ | युग लोहार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४५ | भगवंत नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४६ | अप्रित राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४७ | हर्ष साखरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४८ | ओंकार तेलंग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४९ | कौस्तुभ दंतकाळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५० | मानव पटोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५१ | स्नेहा ढगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५२ | आरोही सुरवसे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५३ | सिद्धी शिलवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५४ | ओवी आयितवाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५५ | साईदुर्वा सरदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५६ | श्रावणी निंबर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५७ | अन्वी सांगले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५८ | अनन्या शिंपी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५९ | वृषभ पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६० | भार्गवी जमगोंडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६१ | रितीका राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६२ | आर्वी राका | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६३ | स्वरा बसाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६४ | आराध्या अभिवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६५ | आदित्य बोराडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६६ | उन्नती चाबुकस्वार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६७ | आरोही करंडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६८ | अनिरूद्ध नादर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६९ | राजनंदीनी पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७० | सानवी रेबन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १७१ | मधुरा जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७२ | मेधा पुजारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७३ | अनुश्री भट्टड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७४ | आरोही पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७५ | श्रावणी वाळके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७६ | राजश्री बोराळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७७ | वैभवी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७८ | शिवराज गयाळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७९ | विवेक आडके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८० | अजबदी काटे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८१ | अन्नपूर्णा हेळकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८२ | ज्ञानेश्वरी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८३ | साक्षी चिट्टे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८४ | कोमल गुडे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८५ | वैष्णवी गरड | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८६ | सानिका लामकाने | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८७ | सक्षम मैदर्गीकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८८ | रुद्र सुरवसे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८९ | अनुप थोरात | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९० | संचिती कोळी | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९१ | राजनंदिनी चटके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९२ | श्रावणी चव्हाण | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९३ | तनया सोनवणे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९४ | स्वरांजली शिंदे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९५ | रिद्धी राऊत | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९६ | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९७ | अरहम पिरजादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९८ | आलोक परसगेंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९९ | तेजस राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०० | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०१ | अरहम पिरझादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०२ | आलोक परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०३ | प्रांजल गालंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०४ | श्रेयश यैवाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०५ | आराध्या कलदिप | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २०६ | नेहा कडबे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०७ | श्रृतीका चौगुले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०८ | प्रतीक थंबाके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०९ | अवनी बागलकोट | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१० | अनन्या मोरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २११ | शौर्य माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१२ | सियोना सबाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१३ | अर्णव दहातोंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१४ | आदर्श गायकवाड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१५ | तन्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१६ | अनुजा करे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१७ | एकांश कांबळे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१८ | समर्थ बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१९ | ईशान्वी नरके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२० | यशस्विनी माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२१ | अथर्व म्हमाणे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२२ | श्रावणी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२३ | तेजस्विनी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२४ | तेजस म्हेत्रे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२५ | मिताली पांढरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२६ | रितेश पुजारी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२७ | संगमेश गुद्दड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२८ | राजवर्धिनी चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२९ | तन्मय बुदाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३० | वामन कुलकर्णी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३१ | विराज राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३२ | दिव्या परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३३ | तपस्या गोदीसेला | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३४ | हुझेता शेख | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३५ | संस्कृती चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३६ | अर्पिता शेटे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३७ | अस्मिता बनसोडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३८ | श्रावणी साबले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३९ | दिव्या शिंदे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २४० | हुरेन पठाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |



स्वछंद टूर्स अँड ट्रॅव्हलच्या संचालिका अंकिता हातगे यांचे नियोजन

# अंदमान निकोबारची १५ वी सहल यशस्वी

**मुंबई, दि. २ डिसेंबर-**

रोजच्या धकाधकिच्या जीवनातून विरंगुळा मिळावा मिळावा म्हणून आपण निसर्गाच्या सानिध्यात जातो. त्याकरिता कोणी स्वतः सहलीचे नियोजन करतो अथवा एखाद्या टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या मार्फत सहलीला जातो.स्वछंद टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या संचालिका अंकिता हातगे या

टूर्स अँड ट्रॅव्हल्स जगतात गेली चार वर्षे अथक प्रयत्न करून निसर्ग प्रेमिना दर्जेदार सुखसोयी जसे कि वाहन व्यवस्था, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था उपलब्ध करून देत आहेत. यंदा स्वछंद टूर्स च्या वतीने मंगळवार १८ नोव्हेंबर २५ ते २३ नोव्हेंबर २५ रोजी अंदमान निकोबार येथे सहलीचे आयोजन केले होते. या सहलीत समाजातील विविध स्तरातील प्रतिष्ठित जसे कि मुंबई महापालिकेचे निवृत्त सहआयुक्त, नायर रुग्णालयातील निवृत्त परिचारिका, बी. ई एस. टी. तसेच एम. टी. एन. एल. मधील निवृत्त इंजिनियर,वकील महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक अशा एकूण १७ स्त्री पुरुष, युवक यांनी सहभाग घेतला. नामांकित कंपनीच्या हवाई तिकिटासह, उत्कृष्ट वाहन, निवास, खाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्नेहा सोन्सूरकर यांच्या सह उपस्थित सर्व मंडळींनी व जेष्ठ नागरिक असलेल्या मोहन सर यांनी या वयात देखील हॉटेल च्या स्विमिंग पूल मध्ये मनसोक्त पोहण्याचा आनंद घेतला. सहलीला उपस्थित सर्वांनी पॅरासिलिंग, स्कुबा डायविंग, फिरण्याचा आनंद घेतला. क्रूझ वरील मस्त मेजवानीने सहलीत रंग भरला. या सहलीत जेष्ठ नागरिकांचा सहभाग हा तरुणांना लाजवेल असा होता. क्रूझ वर सर्वांनी गाणी ऐकण्याचा, गाणी गाण्याचा व नृत्याचा मनसोक्त आनंद घेतला. प्रियांका हातगे व स्थानिक टूर ऑपरेटर रघु सर यांनी मोलाचं सहकार्य केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात अंकिता हातगे यांनी उत्कृष्ट रित्या या सहलीचे आयोजन करून ही सहल यशस्वी केली. पुढील अंदमान निकोबार सहलीचे आयोजन हे जानेवारी महिन्यात करण्यात येणार असून दर्जेदार सहलीकरिता स्वछंद टूर्स अँड ट्रॅव्हल्स संपर्क क्रमांक अंकिता हातगे - ०७७३८२३३९१९

# जिल्ह्यातील १० नगरपालिकांत अंदाजे ७० टक्के मतदान

## ●२१ डिसेंबरला होणार मतमोजणी; पेट्या स्ट्राँगरुममध्ये रवाना





| मतदानाची अंतिम टक्केवारी | |
|---|---|
| अकलूज | ६९.२१% |
| कुर्डुवाडी | ६६.८४% |
| बार्शी | ६४.००% |
| पंढरपूर | ६५.००% |
| अक्कलकोट | ६४.२५% |
| दुधनी | ७०.९७% |
| करमाळा | ७२.७८% |
| मोहोळ | ७१.७२% |
| सांगोला | ७७.७०% |
| मैंदर्गी | ७२.८९% |

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील अनगर, मंगळवेढा वगळता इतर १० नगर परिषदेच्या अध्यक्ष पदासाठी आणि सदस्यासाठी अंदाजे ७० टक्के मतदान काही ठिकाणचे किरकोळ प्रकार वगळता शांततेत पार पडले.

दरम्यान, मतदान झालेल्या सर्व मतपेट्या कडक पोलिस बंदोबस्तात ज्या-त्या मतदारसंघातील स्ट्रॉंग रूममध्ये रात्री उशिरापर्यंत प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी रवाना केल्या आणि सीलबंदही केल्या आहेत. या झालेल्या मतदानाचा निकाल २१ डिसेंबर २०२५ रोजी लागणार असून, यानंतर ८-१० दिवसात येणाऱ्या नववर्षापासूनच नवीन नगर कारभारी आपापल्या शहराचा कारभार हाकणार आहेत.

या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरूष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार होते. तर जिल्ह्यातील ४९९ मतदान केंद्रांसाठी १३३२ बीयु, ६६१ सीयु आणि ६६१ डीएमएम अशा ईव्हीएमची सोय केली जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली होती. जिल्ह्यात या निवडणुकीसाठी ४९९ मतदान केंद्रांवर मतदान प्रकिया शांततेत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रत्येक बूथ निहाय व केंद्र निहाय तीन पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. सकाळी विविध मतदान केंद्रांवर गर्दी कमी होती मात्र दुपारनंतर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. तर पंढरपूर-सांगोला व इतर काही भागात सायंकाळी ५ नंतर गर्दी पडल्याने रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया चालली. एकंदरीत, किरकोळ घटना वगळता ही निवडणूक शांततेत पार पडल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखालीच दि. २१ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रकिया ज्या-त्या ठिकाणच्या गोडाऊन येथे पार पडणार आहे.

या निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार होता. मात्र काही नगरपरिषदांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने आता निवडणूक निकालही पुढे ढकलण्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाकडून देण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा कोर्टात अपील प्रलंबित असलेल्या किंवा नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी पुरेसा वेळ न मिळालेल्या ठिकाणी निवडणुका २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकांसाठी मतदान झाल्यानंतर २१ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या सर्व नगरपरिषद-नगरपंचायतींचे निकाल जाहीर होणार आहेत.पूर्वीच्या कार्यक्रमानुसार आज होणाऱ्या मतदानाची मतमोजणी उद्या ३ डिसेंबरला होणार होती. त्याविरोधात एक याचिका दाखल करण्यात आली होती. यावर झालेल्या सुनावणीत दोन्ही टप्प्यातील मतदान पूर्ण झाल्यानंतर २१ डिसेंबरला एकत्रित मोजणी करण्याचा आदेश कोर्टाकडून देण्यात आला.

### मतपेट्या स्ट्राँग रुममध्ये रवाना

सोलापूर जिल्ह्यातील १० नगरपालिकांच्या निवडणुका आज पार पडल्या असून, या मतदान घेतलेल्या मतपेट्या ज्या-त्या नगरपालिका कार्यक्षेत्रातील गोडावूनच्या स्ट्राँगरूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत, अशी माहिती निवडणूक अधिकारी तथा नगरपालिका जिल्हा सहआयुक्त योगेश डोके यांनी दिली.

### मतमोजणीचे ठिकाण

बार्शी: शासकीय धान्य गोदाम, उपळाई रोड बार्शी, पंढरपूर: शासकीय धान्य गोडाऊन पंढरपूर, अक्कलकोट: प्रियदर्शिनी मंगल कार्यालय, अक्कलकोट, अकलूज: विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल, अकलूज, सांगोला: राजमाता अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृह, सांगोला, करमाळा: यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मुलींचे वसतीगृह, करमाळा, कुर्डुवाडी: वखार महामंडळ शासकीय गोदाम, कुर्डुवाडी, मोहोळ: शासकीय धान्य गोडाऊन,मोहोळ, दुधनी: दुधनी नगरपरिषद सभागृह, मैंदर्गी: मैंदर्गी नगरपरिषद सभागृह.

### आयोगाच्या गाईडलाईनवर सत्ताधारी-विरोधकांचे आरोप

निवडणूक आयोगाच्या गाईडलाईन्स सुरूवातीपासूनच चुकल्या असून, उमेदवारांनी अर्ज ऑनलाईननेच दाखल करावा अशा सुचना असताना पुन्हा ऑफलाईनची सोय केली. अर्ज मागे घेताना आलेला कोर्टाचा निकाल आणि त्याच दरम्यान निवडणूक आयोगाकडून जिल्हा प्रशासनाकडे झालेल्या पत्रव्यवहाराचे स्वरूप चुकले. यानंतर राज्यातील २२ नगरपालिकांसाठी मतदानासाठी दिलेली २० डिसेंबर...इतकेच नाहीतर मतमोजणीची २१ डिसेंबर...याचबरोबर या २२ नगरपालिकांच्या उमेदवारांचा मागील काही दिवसात केलेला प्रचार, पैसा वाया गेला यामुळेही काही सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी, उमेदवारांनी निवडणूक आयोगावर आज दिवसभर टिका-टिप्पणीही केल्याचे दिसून आले.

महापालिका आरोग्य विभागातील

# एक्स-रे टेक्निशियन गुरुप्रसाद इनामदार निलंबित

### आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले कारवाईचे आदेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महापालिका आरोग्य विभागातील क्ष-किरण तंत्रज्ञ (एक्स-रे टेक्निशियन) गुरुप्रसाद इनामदार यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज कारवाईचे आदेश काढले आहेत.

महापालिकेच्या रामवाडी यु.पी.एस.सी. केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचे क्ष-किरणयंत्राद्वारे तपासणी करुन त्याचा अहवाल देण्याच्या काम काजाची जबाबदारी गुरुप्रसाद इनामदार यांच्यावर सोपविण्यात आली होती. दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी रामवाडी यु.पी. एस.सी. केंद्राकडे एक महिला रुग्ण क्ष-किरण तपासणीसाठी आली असता, क्ष-किरण तंत्रज्ञ गुरुप्रसाद इनामदार यांनी गैरवर्तन केले. तशी लेखी तक्रार केलेली असून, आरोग्य अधिकारी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने नियंत्रण अधिकारी यांच्या निर्दशनास आणले आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची व कार्यालयोन शिस्तीस बाधा पोहोचविणारी असून यामुळे जनमाणसांत मनपाची प्रतिमा मलिन झालेली आहे. गैरवर्तना मुळे कार्यालयीन शिस्तीचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ नियम ३ (१) मधील (एक ते दोन) च्या तरतुदीचा भंग झालेला आहे. त्यास सर्वस्वी गुरुप्रसाद इनामदार हेच जबाबदार आहे. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित असून, शिस्तभंगाची कारवाईस बाधा येऊ नये म्हणून, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ४ (१) (अ) नुसार त्यांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन क्ष-किरण तंत्रज्ञ गुरुप्रसाद इनामदार यांना दि.२ डिसेंबर २०२५ च्या कार्यालयीन वेळेनंतर सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. हा आदेश अंमलात असेपर्यंत गुरुप्रसाद इनामदार यांचे मुख्यालय सोलापूर शहर हे राहील व त्यांनी मनपा उपायुक्त तथा आरोग्य विभाग नियंत्रण अधिकारी यांच्या पूर्व संमतीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेशात म्हटले आहे.



भाजपाचे मोहोळ तालुका सरचिटणीस अरविंद माने आणि त्यांच्या पत्नी वैशाली यांनी मतदान केले.

# रोषणाईने उजळले श्रीदत्त मंदिर

## श्री गुरुदेव दत्त यांच्या नामस्मरणाने मन होतेय प्रसन्न

### शहरातील दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर**

अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त... निनादात दररोज शहरातील विविध दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होत आहे.

गुरुचरित्र पारायण तसेच श्री गुरुदेव दत्तात्रेय नवरात्र धार्मिक विधी संपन्न होत असताना, श्री दत्त जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरातील प्रमुख दत्त चौकातील श्री दत्त मंदिरास आकर्षक रोषणाई केल्याने सारे मंदिर परिसर आणि श्रींचा गाभारा प्रकाशमान झालेला दिसत आहे.

दरम्यान, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त महाराजांची भक्ती करण्यात अनेक भाविक गेल्या आठ दिवसापासून तल्लीन आहेत. पारायण तसेच नवरात्र उत्सव भक्तांच्या घरोघरी संपन्न होत असताना सर्वत्र धार्मिक वातावरण पसरले आहे. शहरातील दत्त चौकातील श्री दत्त मंदिर, रेल्वे लाईन श्री दत्त मंदिर, लष्कर परिसरातील श्री माणिक प्रभू दत्त मंदिर यांसह कल्याण नगर, अशोक चौक, मड्डी वस्ती, सुंदरम नगर येथील स्वामी समर्थ मंदिर या विविध धार्मिक स्थळांमध्ये धार्मिक विधी आणि कार्यक्रम संपन्न होत आहेत.

श्री दत्त जयंतीच्या पार्श्वभूमीवर सर्वच मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने सारा परिसर उजळून निघाला आहे. सारे वातावरण नव चैतन्याने न्हाऊन गेलेले पहावयास मिळत आहे.



दत्त चौकातील मंदिरास करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई

### श्री गुरुदेव दत्त यांच्या नामस्मरणाने मन प्रसन्न

गेल्या आठ दिवसांपासून श्री दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असताना, गुरुचरित्र पारायण आणि नवरात्र उत्सवामुळे मनामध्ये आत्मिक शांतता आणि ऊर्जा प्राप्त होत आहे. श्री गुरुदेव दत्त यांच्या नामस्मरणाने मन प्रसन्न व तल्लीन होत आहे. दत्त जयंतीचा सोहळा अनुपम्य असा आहे.

**- सुयोग दिवाण,**
**श्री गुरुदेव दत्त भक्त**

# मोहोळ @७१.७२ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २ डिसेंबर-**

मोहोळ नगर परिषदेच्या अत्यंत चुरशीने अटीतटीने पार पडलेल्या निवडणुकीत ७१.७२ टक्के मतदान झाले. मोहोळ नगर परिषदेची निवडणूक मंगळवारी दि. २डिसेंबर २०२५ रोजी पार पडली. या निवडणुकीत नगराध्यक्ष पद हे पहिल्यांदाच जनतेतून असल्याने या पदासाठी भाजपा शिवसेना (शिंदे)आणि शिवसेना (उबाठा) काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या प्रमुख पक्षांसह एकूण११ महिला रिंगणात उतरल्या होत्या.

या नगराध्यक्ष पदाच्या एका जागेसाठी ११ महिला व १० प्रभागा मध्ये नगरसेवक पदाच्या २० जागांसाठी ९७ उमेदवार रिंगणात उतरले होते. यापैकी प्रभाग क्र ३ मधील नागरिकाचा मागास प्रवर्ग या एका जागी व प्रभाग क्रमांक ५ येथील सर्वसाधारण पुरुष जागेसाठी असणारे एका जागेचे मतदान कोर्टाच्या आदेशाने पुढे ढकलण्यात आल्यामुळे एकूण १८ जागांसाठी मतदान झाले. पुढे ढकलण्यात आलेल्या या दोन जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. काही किरकोळ प्रकार वगळता शांततेमध्ये पार पडले

मोहोळ नगर परिषदेसाठी सकाळी ७ वाजता मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीत सकाळी ११ पर्यंत ९.३२% टक्के मतदान झाले. एकूण मतदानापैकी २२७६ मतदारांनी मतदान केले. दुपारी १.३० पर्यंत २४४१३ मतदारा पैकी १०१०२ जणांनी केले.ही टक्केवारी ४१.३८ झाली. दुपारी ३.३० पर्यंत एकूण २४४१३ मतदारापैकी १४०१० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

## सांगोला येथे ७७.७० टक्के मतदान

**सांगोला, दि.२ डिसेंबर -**

सांगोला नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व २१ नगरसेवक पदासाठी मंगळवार दि.२ डिसेंबर रोजी शांततेत मतदान पार पडले. सकाळपासून शहरातील ४० मतदान केंद्रावर ७७.७० टक्के मतदान झाले.

सकाळी साडेनऊ वाजता ५.७९ टक्के, साडेअकरा वाजता १७.४६ टक्के, दुपारी दीड वाजता ३१.६१ टक्के, साडेतीन वाजता ४८.८७ टक्के तर एकूण ७७.७० टक्के मतदान झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली. एकूण ३३ हजार ६९८ मतदारांपैकी १३ हजार १९९ पुरुष व १२ हजार ९८३ महिला अशा एकूण २६ हजार १८२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# मतदार यादीवरील हरकतींच्या निराकरणासाठी आयुक्तांची विविध भागात थेट पाहणी

### मतदारांशी साधला संवाद




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादीवरील हरकतींच्या निराकरणासाठी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज विविध भागात थेट पाहणी केली. विविध ठिकाणी मतदारांशी संवाद साधला.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रारूप मतदार यादीवर नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांची पडताळणी करण्यासाठी महानगरपालिकेने प्रभागनिहाय पथके नियुक्त केली आहेत. या पथकांकडून सविस्तर सर्व्हेक्षण व छाननीचे कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. आज दि. २ डिसेंबर २०२५ रोजी आयुक्त सचिन ओम्बासे यांनी प्रारूप मतदार यादीवर प्राप्त हरकतींची प्रत्यक्ष मतदार याद्यांची सत्यता तपासण्यासाठी प्रभाग क्र. ८, ९, ११ व १२ मधील विविध भागांमध्ये स्वतः भेट देऊन सर्वेक्षण कार्याची माहिती घेतली. यामध्ये प्रभाग क्र. ८ व ९ मधील जोडबसवण्णा चौक, रविवार पेठ तसेच प्रभाग क्र. ९, ११, १२ मधील कर्णीक नगर, एकतानगर, अक्कलकोट रोड, मल्लिकार्जुन नगर या भागांचा समावेश होता. यावेळी सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सह अभियंता रामचंद्र पेंटर, प्रदीप निकते, संदीप भोसले,पथक समन्वक दीपाली मेटकरी, योगीराज याटकर, उपतुकडी प्रमुख जे. के स्वामी, अरविंद दोमल यांच्यासह कर्मचारी उपस्थिती होते. प्राप्त हरकती व निष्कर्ष असा - प्रभाग क्र. ८ व ९, रविवार पेठ हरकतदार इंजापुरे व येमुल यांच्या हरकतीवर पथकाने केलेल्या सर्वेक्षणानुसार त्यांची हरकत योग्य असल्याचे निर्दशनास आले. प्रभाग क्र. १२ ते प्रभाग क्र. ९ मतदार वर्गीकरण हरकत - हरकतदार बजरंग कुलकर्णी यांनी प्रभाग १२ मधील ३६८ मतदारांचे प्रभाग ९ मध्ये वर्गीकरण करण्याबाबत हरकत दिली होती. पथकाच्या सर्व्हेक्षणात ३६८ पैकी फक्त ३१ मतदारच प्रभाग ९ मध्ये येतात असे स्पष्ट झाले. त्यानुसार ही हरकत भागशः योग्य ठरली असून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रभाग क्र. १२ ते प्रभाग क्र. ११ मतदार समावेशन अक्कलकोट रोड, मल्लिकार्जुन नगर येथील हरकतदार श्री कळमंडे यांनी प्रभाग १२ मधील २० मतदारांचे प्रभाग ११ मध्ये समावेश करण्याबाबत हरकत नोंदवली होती. पथकाच्या सर्व्हेक्षणात ही हरकत योग्य आढळल्याने संबंधित दुरुस्ती प्रक्रिया करण्यात येत आहे.प्रारूप मतदार यादीतील आपली नोंद तपासून आवश्यक असल्यास निर्धारित मुदतीत हरकत/सूचना सादर कराव्यात. महानगरपालिका प्रशासन पारदर्शक व अचूक मतदार यादी तयार करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**१० डिसेंबर रोजी प्रसिध्द करण्यात येणार**

प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवर दि. ३ डिसेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. प्राप्त सर्व हरकतींचे प्रभाग पथकांकडून सखोल सर्व्हेक्षण करण्यात येणार असून त्यानुसार आवश्यक दुरुस्त्या करण्यात येतील. या प्रक्रियेअंती अंतिम मतदार यादी दि. १० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तिल्हेहाळ येथील महादेव मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात



दक्षिण सोलापूर, दि. २ डिसेंबर-

तिल्हेहाळ येथील जागृत महादेव मंदिरच्या वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये मंगळवारी २ डिसेंबर रोजी पहाटे विविध धार्मिक कार्यक्रम व सकाळी ७:१५ वाजता अभिषेक व महाआरती झाली. यावेळी पुष्पवृष्टी व फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली. सुरजसिंग सुनीलसिंग चव्हाण नांदेड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रसंगी तिल्हेहाळसह औज (आ.), होटगी स्टेशन, बोरुळ, आलेगाव येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नागरिकांनी ठेवले कोंडून

● प्रत्येक कामासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारायला लावत असल्याचा आरोप







तभा वृत्तसेवा

मंगळवेढा दि.२ डिसेंबर-

नोंद असलेल्या दस्तऐवजमध्ये वारस नोंद करणे, बँक कर्जाचा बोजा चढवणे, नवीन नोंदी प्रमाणित करणे, अज्ञान पालन नाव लावणे, सज्ञान झाल्यावर नाव कमी करणे, हक्कसोडपत्र, बक्षीसपात्रासाठी आवश्यक दस्त उपलब्ध करणे यांसह अन्य कामासाठी हेलपाटे घालावे लागतात.

याच्या निषेधार्थ मंगळवेढा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आत कोंडून ठेवत प्रवेशद्वाराला चक्क कुलुप ठोकले. येथील भूमी अधीक्षक या पदावर म हिला अधिकारी कार्यरत आहेत. परंतु त्यांचे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसल्याने विविध कामांचा जणू डोंगर उभा राहत आहे. आपल्या प्रलंबित कामाविषयी विचारले असता, येथील अधिकारी-कर्मचारी समाधानकारक उत्तर न देता नागरिकांना अक्षरशः पिटाळून लावण्यात येते, असे सांगण्यात आले. या कार्यालयात यापुर्वी असे प्रकार होत नव्हते. नागरिकांची कामे वेळेत व्हायची. मात्र आता गफूर तांबोळी व संजय कोंडावडे या परिक्षण भूमापकांच्या कुचराईमुळे नागरिकांना सतत हेलपाटे मारावे लागत आहे. त्यामुळे या दोघांची उचलबांगडी करुन तेथे सक्षम कर्मचारी नेमून शहरवासीयांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे. यावेळी सिदराया माळी, युवराज टेकाळे, समाधान हेंबाडे, रोहिदास कांबळे, बापुसो घोडके, राम मेटकरी, सचिन सरवदे उपस्थित होते. दरम्यान, यासंदर्भात भूमी अभिलेख कार्यालयाच्या प्रमुखाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल बंद असल्यामुळे अधिकचा तपशील मिळू शकला नाही.

# सार्वजनिक नळांचे फेर सर्व्हेक्षण करुन अचूक यादी सादर करा

महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांचे निर्देश; स्वच्छता, सार्वजनिक सुविधा सुधारण्याच्या सूचना

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि.२ डिसेंबर-

विभागीय कार्यालयाकडून झालेल्या शहरातील सार्वजनिक नळांच्या फेर सर्व्हेक्षणमध्ये काही नळांचा समावेश नसल्याचे आढळल्याने पुन्हा एकदा सर्व्हे क्षण करून अचूक यादी सादर करावी, असे निर्दे शमहापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी दिले. याशिवाय स्वच्छता, सार्वजनिक सुविधा सुधारण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

महापालिका आयुक्तांनी शहराच्या अनेक भागांना भेट देऊन स्वच्छता, सार्वजनिक सुविधांची पाहणी केली शहरातील स्वच्छता, सार्वजनिक सुविधा व पायाभूत सेवांची गुणवत्ता तपासण्यासाठी हा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासम वेत सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी श्री. विजयकुमार लोखंडे, जावेद पानगल, राघवेंद्र गायकनकर, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार तसेच अधिकारी उपस्थित होते.

पाहणी दरम्यान शहरातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. काही महत्त्वाच्या अनियमितता व आवश्यक सुधारणा आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. याबाबत आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी तात्काळ कार्यवाहीचे निर्देश संबंधित विभागांना दिले. बुद्ध नगर फॉरेस्ट एरिया येथ ड्रेनेज समस्या व साफसफाई सार्वजनिक शौचालयाच्या ड्रेनेज लाईनबाबत उपलब्ध जोडण्यांची पुनर्तपासणी करून तुंबण्याची समस्या दूर करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच परिसरातील वाढलेली झुडपे तातडीने काढून स्वच्छता करण्यास सांगितले.

सार्वजनिक नळांच्या फेर सर्व्हेक्षणमध्ये काही नळांचा समावेश नसल्याचे आढळल्याने पुन्हा एकदा सर्व्हेक्षण करून अचूक यादी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. अनधिकृत सार्वजनिक नळ जोड बंद करणे व रहिवाशांना वैध स्वतंत्र नळजोड देण्याची प्रक्रिया गतीने राबवण्यात यावी, अशी सूचनाही आयुक्तांनी केली. रामवाडी, गुलाबनगर, मोलाली चौक, लोधी गल्ली परिसरातील शौचालयांची पाहणी करून काही ठिकाणी भूमिगत पाण्याच्या पातळीमुळे




नवीन इलेक्ट्रिक बोअर घेण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. यासाठी सर्वे क्षण करून एकत्रित यादी पुढील ७ दिवसात सादर करण्याच्या सूचना दिल्या. पडीक व वापरात नसलेली सार्वजनिक शौचालये पाडून टाकावीत, यासंदर्भात महापालिकेला कोणताही आर्थिक खर्च येऊ न येता, पाडकामातून मिळणाऱ्या स्क्रॅपचा मोबदला महसूल म्हणून मिळेल असा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही दिल्या. लोधी गल्ली, नवीन सार्वजनिक शौचालय पाण्याच्या टाकीजवळील कंपाऊंड वॉललगत पुरुषांसाठी नवीन सार्वजनिक शौचालय उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. अरुंद बोळीत कचरा व्यवस्थापन घंटा गाडी न पोहोचणाऱ्या अरुंद बोळ्यांमध्ये अतिरिक्त महिला कर्मचारी नेमून कचरा उचलण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व शहर स्वच्छतेसाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

# कंटेनरच्या धडकेत मोटरसायकलचालक ठार

धोकादायक चौकात अपघाताची मालिका सुरू

तभा वृत्तसेवा,

माळशिरस, दि. २ डिसेंबर-



कंटेनरच्या धडकेत मोटर सायकल चालक जागीच ठार झाल्याची घटना मंगळवारी दुपारी माळशिरस बायपासला यादव पेट्रोल पंपासमोर घडली असून माऊली संभाजी गायकवाड, (वय २९ वर्षे, उंबरे वेळापूर)असे त्याचे नाव आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की उंबरे वेळापूर येथील माऊली गायकवाड हे मोटर सायकल नं. एम एच ४५ बी २०३८ या दुचाकीवरुन माळशिरसकडून सदाशिवनगरकडे चालले असता यादव पेट्रोल पंपासमोर सर्विस रोड वरून महामार्ग रस्त्यावर वळल्या नंतर बाय पासने सदाशिवनगर कडे चाललेल्या कंटेनर न केए.५१ एके. ८१३२ ने जोरात धडक दिली.

यामध्ये मोटर सायकल चालक माऊली गायकवाड जागीच ठार झाले. याबाबत माळशिरस पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पो कॉ. आर एम वाघ तपास करीत आहे. माळशिरस नजिकच्या ६१ फाटा, यादव पंप, या ठिकाणी सातत्याने अपघात होऊन अनेकाना जिव गमवावा लागत आहे. वास्तविक पाहता या ठिकाणी ओव्हर ब्रीज किंवा अंडर पास मार्ग होणे आवश्यक आहे.

# गुटखा विक्री बंद करा अन्यथा...

तभा वृत्तसेवा,

पिलीव, दि. २ डिसेंबर-

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या गुटखा विक्री केली जाते. महाराष्ट्र शासनाने गुटखा विक्रीकर पूर्ण पणे बंदी घातली आहे. यानुसार गुटखा विक्रेत्यांवर मोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

यामुळेच पिलीव परिसरातील टपरीधारक तसेच इतर दुकानदारांनी अजिबात गुटखा विक्री करु नये. जर का गुटखा विक्री करण आढळल्यास कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पिलीव पोलीस ठाण्याचे हवालदार स्वरूप शिंदे यांनी.सांगूनही गुटखा विक्री करताना जर आढळला तर कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

खरेतर पिलीव परिसरातील तरूणाई मोठ्या प्रमाणावर गुटखा खाण्याच्या आहारी जाऊन व्यसनाधीन झाली आहे. जर याची कडक अंमलबजावणी झाली तर तरूणाई व्यसनाच्या विळख्यातून बाहेर पडेल. फक्त याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

# ‘एसआयटी’कडून माध्यमिकच्या वैयक्तिक मान्यतेची तपासणी

चुकीच्या वैयक्तिक मान्यता घेतलेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. २ डिसेंबर-

तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, मारुती फडके, स्मिता पाटील यांच्यासह अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी चुकीच्या मान्यता दिल्याचा आरोप विविध संघटनासह शिक्षकांनी केल्या होत्या. त्यानुसार विशेष तपासणी पथकांकडून सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आलेल्या वैयक्तिक मान्यतेची तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या अडचणी वाढणार आहेत.

विशेष तपासणी पथकाकडून मंगळवारी २ डिसेंबर रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात तक्रारी असलेल्या वैयक्तिक मान्यतेची तपासणी एसआयटी प्रमुख कैलास दातकोळ यांच्याकडून करण्यात येत आहे. त्यामुळे चुकीच्या वैयक्तिक मान्यता घेतलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. याविषयी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना विचारले असता, तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन तक्रारी निपटारा लावण्यासाठी विशेष तपणणी पथक आल्याची माहिती दिली . त्यामुळे एसआयटी पथक नेमके कशासाठी आले होते, असा सवाल शिक्षकांमधून विचारला जात आहे.

### माध्यमिकला कुलूप लावल्याची चर्चा

माध्यमिक विभागातील कर्मचाऱ्यांकडून शिक्षक, कर्मचारी व नागरिकांच्या कामे व तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने तक्रारदार महिलेने संताप व्यक्त करण्यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयास कुलूप लावले. त्यानंतर ती महिला बाहेर गेल्यानंतर लगेच कुलूप तोडण्यात आले आहे. मात्र, त्या महिलेंनी कोणत्या कारणासाठी माध्यमिक शिक्षण विभागाला कुलूप लावले, याची माहिती मिळाली नाही. याविषयी शिक्षण विभागाला विचारले असता, अशी घटनाच घडली नसल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांचे बोर्डाकडील हेलपाटे थांबणार; दहावी-बारावी प्रमाणपत्र मिळणार ऑनलाईन

ऑनलाईन प्रमाणपत्रासाठी आधार आवश्यक

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. २ डिसेंबर-



राज्य बोर्डाच्या दहावी-बारावीच्या गुणपत्रिका, प्रमाणपत्र, डुप्लिकेट प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र आणि स्थलांतर प्रमाणपत्रासाठी विद्यार्थी आणि पालकांना मंडळाच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागायचे. पण विद्यार्थी आणि पालकांची ही गैरसोय आता संपणार आहे. राज्य मंडळाने ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करून विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

सर्वप्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी एकसमान ५०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले असून 'आधार'वर आधारित ओटीपीद्वारे थेट ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. विशेष म्हणजे सन १९९० पासूनचा सर्व डेटा डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामुळे जुन्या विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र सहज मिळू शकणार आहेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर प्रमाणपत्राची मूळ प्रत पोस्टाद्वारेही घरपोच मिळणार असल्याने बोर्डाकडे जाण्याची गरज पूर्णपणे टळणार आहे. निकालानंतर प्रवेश प्रक्रियेदरम्यान किंवा नोकरीसाठी तातडीने कागदपत्रे लागणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे विलंब सहन करावा लागणार नाही. घरबसल्या दस्तऐवज मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्डात चकरा मारायची गरज नाही. सही, शिक्के, शाळेची शिफारसपत्र, ओळख पडताळणी, कर्मचाऱ्यांशी संपर्क असा संपूर्ण त्रास टळणार आहे.

स्वयंपूर्ण डिजिटल प्रक्रियेने मंडळाच्या भेटी पूर्णपणे बंद होतील. यापुढे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शाळेचे ओळखपत्र, शिफारसपत्र, हजर राहण्याच्या नोंदी अशा कोणत्याही कागदपत्रांची गरज राहणार नाही. संपूर्ण प्रक्रिया स्वयंचलित आणि डिजिटल आहे. बोर्डाने मागील ३५ वर्षांचा डेटा डिजिटल करून प्रणालीमध्ये उपलब्ध केला आहे. १९९० नंतर बोर्डाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रमाणपत्रे मिळण्याची खात्री आहे.

### डुप्लिकेट गुणपत्रिकाची प्रक्रिया ऑनलाइन

दहावी-बारावीची गुणपत्रिका किंवा प्रमाणपत्र हरविले, खराब झाले किंवा दुरुस्तीची गरज असल्यास यामुळे मंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अर्ज करण्याची गरज राहणार नाही. सर्व अर्ज व पडताळणीची प्रक्रिया मंडळाच्या अधिकृत पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### 'आधार'वर आधारित ओटीपीने ऑनलाइन अर्ज

अर्जदाराचे प्रमाणिकरण 'आधार क्रमांक टाकल्यावर मिळणाऱ्या ओटीपीद्वारे केले जाणार आहे. त्यामुळे कागदपत्रांची प्रत घेऊन जाण्याची आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रासाठी आधाराला महत्व देण्यात आला आहे. त्यामुळे आधार क्रमांकावरच प्रमाणपत्राचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

### विद्यार्थ्यांचा ताण कमी होणार

दहावी-बारावी परीक्षा संपल्यानंतर प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांना बोर्डाकडे चकरा माराव्या लागत होत्या. त्यामुळे वेळ आणि पैसे वाया जायचा. मात्र, परीक्षा मंडळाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रमाणपत्र ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाय ५०० रुपयांमध्ये प्रमाणपत्र घरपोच मिळणार असल्याने विद्यार्थ्यांचा ताण कमी होणार आहे. विद्यार्थ्यांनी याचा फायदा घ्यावे.

**- बसवराज म्हेत्रे,** मुख्याध्यापक, श्री पंचाक्षरी प्रशाला कन्नड माध्यम, टाकळी ब्रिज (दक्षिण सोलापूर)

# आगामी महापालिका निवडणुकीचे वाहू लागले वारे

● शरद पवारांच्या राष्ट्रवादीने इच्छुकांचे मागविले अर्ज, अजित पवारांच्या राष्ट्रवादीची प्रक्रिया लवकरच सुरू

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि.२ डिसेंबर-

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणाऱ्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने इच्छुकांचे अर्ज मागवण्यास प्रारंभ केला आहे. शहर पार्टीच्या कार्यालयात अर्ज घेण्यास प्रारंभ झाला असून, प्रभाग क्रमांक १ ते २६ यामधील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अर्ज घेण्यास सुरुवात केली आहे.

आजी-माजी तसेच नवखे उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावणार आहेत. त्या अनुषंगाने पार्टीच्या वतीने छापील अर्ज फॉरमॅट तयार करण्यात आला आहे. इच्छुकांनी अर्ज घेऊन १० डिसेंबर पर्यंत पार्टी कार्यालयात अर्ज आणून जमा करावयाचा आहे. त्यानुसार अर्जांची छाननी होऊन मुलाखती घेतल्या जातील, अशी माहिती शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी दिली आहे. अर्ज देण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आत्तापर्यंत १० हून अधिक इच्छुकांनी अर्ज घेऊन गेल्याचे सांगण्यात आले. तर दुसरीकडे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने देखील अशाच पद्धतीची प्रक्रिया लवकरच राबवली जाणार आहे. इच्छुकांची यादी वरिष्ठ पातळीवर पाठवली जाणार आहे.

त्यानंतर मुलाखती घेतल्या जातील, असे देखील यावेळी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या वतीने जरी अर्ज मागवण्यास सुरुवात केली असती तरी, निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत नेत्यांचा दलबदल कायम असतो. शेवटच्या क्षणी पार्टी बदलण्याचा टप्प्यातच कळणार आहे. सध्या तरी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षीय संघटनेच्या वतीने रीतसर अर्ज भरून उमेदवारांची चाचपणी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे. नेतेमंडळी आणि इच्छुक प्रयत्नशील असतात. त्यामुळे निवडणूक रिंगणात कोण असेल, अंतिम

### अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू



आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १ ते २६ मधील इच्छुकांची यादी तयार आहे. कोणत्या प्रभागात कोणता उमेदवार निश्चित करावयाचा आहे. त्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदरचा अर्ज दि.१० डिसेंबर पर्यंत कार्यालयात जमा करायचा आहे. त्यानंतर मुलाखत होईल. अंतिम इलेक्टिव्ह मेरिट लक्षात घेऊन उमेदवार देण्यात येईल.

**- महेश गादेकर,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट

### उमेदवार निश्चितीसाठी प्रक्रिया लवकरच



महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुकांची यादी बनवली जाणार आहे. तत्पूर्वी प्रभाग पद्धतीनुसार इच्छुकांच्या अर्जांची मागणी करून मुलाखत आणि चाचणीनंतर उमेदवार निश्चिती करण्यात येणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल.

**- संतोष पवार,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी अजित पवार गट

# मतदार यादीचा घोळ होणार दुरुस्त

▸ बी.एल.ओ. मार्फत मतदार यादीची दुरुस्ती

▸ प्रभागात यादीची तपासणी सुरू

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि.२ डिसेंबर-


आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादीतील मतदारांचा झालेला घोळ उघडकीस आल्यानंतर निवडणूक प्राधिकरण कार्यालय तथा महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे.

विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदार यादीत झालेला घोळ पुराव्यानिशी उघडकीस आणून त्यासंबंधीची रीतसर तक्रार निवडणूक कार्यालयात दाखल केल्यानंतर निवडणूक प्राधिकरण कार्यालयाच्या वतीने बी.एल.ओ. मार्फत मतदार यादीतील मतदारांची घरोघरी जाऊन तपासणी मोहीम सुरू केली आहे.

दरम्यान, एका विशिष्ट मतदारांच्या यादीत दुसऱ्याच प्रभागातील मतदारांची नावे समाविष्ट

एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट झाल्यानंतर तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी बीएलओ यांची नियुक्ती केली. प्रभागातील एकूण मतदार आणि इतर मतदार यादीतील आलेले मतदारांची पडताळणी झाल्यानंतर मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

करण्यात आल्याने हा सावळा गोंधळ उडाला होता. विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी



मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदार यादीतील मतदारांची ऑन द स्पॉट प्रत्यक्षात पाहणी केली. जेव्हा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर बोगस मतदानाचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्यानंतर काही प्रमुख विरोधी पक्षाचे नेत्यांनी यासंबंधी निवेदन आणि तक्रारी अर्ज सादर केला. त्यानंतर मतदार यादीतील चुकीच्या दुरुस्तीसाठी वाढीव मुदत मिळाली होती. मतदार यादीतील चुका आढळून आल्यानंतर बी.एल.ओ. प्रत्येक मतदारांच्या घरी दाखल होत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२८५

**अर्जुना हें जाण । मुळबंधाचे लक्षण ।**
**वज्रासन गौण । नाम यासी ॥**

योगाभ्यासासाठी स्थळ कसे असावे, स्थळ निवडल्या नंतर बसण्याची जागा कशी असावी, त्या जागेवर आसन कसे घालावे याबद्दल भगवंतानी अर्जुनाला सविस्तर सांगीतले. सदगुरु स्मरण करुन, त्याच ऐक्य बोधाने त्या आसनावर बसल्यानंतर शरीर आपोआप सावरते, प्राणवायू एकवट होत आहे अशी अनुभवाची स्पष्ट जाणीव होऊ लागते. अशा अवस्थेत प्रवृत्ती पराङ्‌मुख होते, चित्ताची एकाग्रता अलीकडे येते आणि योगाभ्यासाचे साधन घडते. आसनमुद्रा कशी असावी हे श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत आहेत. दोन्ही मांडया पोट-यांना चिकटून घालाव्यात. याला पदमासन म्हणतात. दोन्ही तळपाय वाकडे करुन, आधार चक्राच्या तळाशी गुदस्थानावर दोन्ही पावले नीट घट्ट बसवावीत. हे भद्रासन होय. उजव्या पायाची टांच तळाशी ठेवून तिने गुदद्वाराची शिवण मध्यभागी दाबावी, मग डावा तळपाय सहज वर बसतो, म्हणजे उजव्या तळपायावर येतो. गुद आणि वृषण यामधील बरोबर जी चार बोटे जागा आहे, त्यापैकी दीड बोट खाली व दिड बोट वरची जागा सोडून मध्यभागी जी एकबोट जागा उरते त्या स्थानाला खालून डाव्या पायाच्या टांचेच्या वरच्या भागाने शरीर तोलून धरले जाईल अशा रितीने नेटाने रेटावे. अंग उचलले आहे की नाही हयाची कळत नकळत जाणीव होईल अशा बेताने पाठीचा कणा किंचित उचलावा आणि तेवढाच प्रमाणात पायाचे बोटे उचलून धरावित. मग टाचेच्या माथ्यावर संपुर्ण शरीरीचा डोलारा स्वयंभु होतो. याला वज्रासन म्हणतात. मूळबंध आसनाचे हे लक्षण सांगतांना भगवंत म्हणाले, **अर्जुना हें जाण । मुळबंधाचें लक्षण । वज्रासन गौण । नाम यासी ॥**



अशा बसण्याने आधारचक्रावर वज्रासनाची मुद्रा पडते, त्यामुळे गुदद्वारातून बाहेर पडण्याचा खालचा मार्ग बंद पडतो. तेव्हा आतडयात संचार करणारा अपानवायू आतल्या बाजुला मागे सरकु लागतो असे झाल्यावर द्रोणाकार होऊन हाताचे तळवे डाव्या पायावर सहजच टेकतात आणि खांदे उंचावलेले दिसु लागतात. अशा उंचावलेल्या खांदयात मस्तक रुतून बसते, मग डोळयाच्या पापण्या आपोआप मिटू लागतात. वरची पापणी ढळत नाही. खालच्या पापण्या खालीच राहातात. त्यामुळे अर्धे उघडे, अर्धे बंद अशी डोळयाची स्थिती होते. डोळयांची दृष्टी बाहेर पडलीच तर ती नाकाच्या शेंडयावर स्थिर होते. मान आंकुचित होते, आणि हनुवटी गळया खालच्या खळगीत रुतुन बसते व ती बळकट होऊन छातीवर दाब देते. कंठमणी लोप पावतो. अशा प्रकारे जो बंध पडतो, त्याला जालंधर बंध म्हणतात. बेंबी वर फुगते, पोट खपाटीला जाते आणि हदयकमल आतमध्ये विकसीत होते. लिंगमुळाच्या वरच्या काठावर, बेंबीच्या खालच्या भागावर जो बंध निर्माण होतो, त्याला ओढियाणबंध म्हणतात. योगाभ्यासाच्या क्षेत्रातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याचे सविस्तर वर्णन चालू असल्याने आपण वाचकांनी काळजीपुर्वक हे भाग लक्षात घेतले पाहिजेत. पदमासन, भद्रासन, वज्रासन, मुळबंध, जालंधरबंध, ओढियाणबंध इत्यादी आसन व बंध कठिण असले तरी जाणकाराच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासाअंती ते साध्य होण्यासारखे आहेत. ही विविध आसने व बंध आत्मसुखाचा हा भाग असल्याने आत्मीक भावनेतुन या भागांशी एकरुप होणे गरजेचे आहे. जय जय राम कृष्ण हरी. जय जय राम कृष्ण हरी.

ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

# बोगस खते-बियाणे; जिल्ह्यातील १०२ परवाने निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

यंदा अतिवृष्टी, महापुराने त्रस्त झालेला शेतकरी नुकसानीचे सर्व दुःख विसरून पुन्हा शेती व्यवसायात गुंतला आहे. सध्या रब्बीची पेरणीची लगबग सुरू झाली आहे. कोण नवीन उसाची लागवड करीत आहेत, कोण उसाला खते टाकण्यासाठी गडबड करीत आहेत तर कोणाचा ऊस साखर कारखान्याला जात आहे. जिल्ह्यातील सर्वच शेतकरी अत्यंत काबाडकष्ट करून शेती पिकवितात आणि सर्वांना चांगल्या दर्जाचे धनधान्य, भाजपाला, फळभाज्या देतात मात्र या शेतकऱ्यांना बोगस बियाणे, खते, औषधे विक्री करून त्यांची फसगत करणाऱ्यांचे मोठे पेय फुटले असून, का बरं आम्हाला या कृषीकेंद्र चालकांनी फसवावं? असा भावनिक सवाल जाणकार शेतकऱ्यांनी उपस्थित केला. त्याचे कारणही तसेच आहे...यंदा जिल्ह्यातील १०२ दुकानदारांनी त्यांना बोगस खते, बियाणे आणि औषधे विकून फसविले असल्याने त्यांचे परवाने कृषी विभागाने निलंबित केले आहेत.

प्रतिवर्षी जिल्ह्यात खरीप आणि रब्बी हंगाम ासाठी मोठ्या प्रमाणात बियाणांची विक्री होत असते परंतु शेतकऱ्यांना मुदतबाह्य खते-औषधे विकणे, बियाणांची विक्री, लिंकिंगचा आग्रह, खते असूनही नाही म्हणून सांगण्याचे प्रकार समोर येतात आणि आता तर बोगस खते-बियाणे-औषधे विकणाऱ्यांची संख्या वाढू लागल्याने जाणकार बळीराजा चिंतेत आहे. सोलापूर जिल्ह्यात कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून झालेल्या कारवाईत १ एप्रिल ते आजअखेर १०२ जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

### जाणकार शेतकऱ्यांचा दै. तरुण भारतकडे भावनिक सवाल



#### बळीराजाला ना फसविल तो आळसी!

शेतकरी बांधवांना प्रतिवर्षी नवीन हंगामासाठी शेतात मशागत करणाऱ्या ट्रॅक्टरवाल्याचे दर वाढतात, खते-बियाणे, औषधे प्रतिवर्षी महाग होतात...आंतरमशागतीसाठी येणाऱ्या महिला मजूरही आपली मजुरी वाढवून मागतात...शेतातून माल काढताना गड्यांची मजुरी वाढलेली असते...धान्य भरडून देणाऱ्यांची मजुरी वाढते...शेतातून घरात माल आणणाऱ्या आणि बाजारात घेवून जाणाऱ्या वाहन धारकांचीही प्रतिपोते मजुरी वाढते...व्यापारीही बळीराजाची आर्थिक अडचण पाहून भाव पाडून फसवितो...आता तर बोगस खते, बियाणे आणि औषधेच बोगस येत असल्याने शेतकरी बांधवाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे. एकंदरीत, 'चालू' जमान्यात 'गरीब' बळीराजाला ना फसविल तोच आळसी म्हणण्याची वेळ आली आहे.
**- रामदास गायकवाड, संतोष जगताप, शेतकरी**

यामध्ये बियाणे विक्रेते ५, रासायनिक खते विक्रेते ९२ आणि किटकनाशके विक्रेते ५ आहेत. तर जिल्ह्यातील ३ दुकाने कायमस्वरूपी रद्द केली आहेत, १३ जणांना ताकीद दिली आहे तर पोलिस केसेस ५ जणांवर केल्या आहेत.

जिल्ह्यात ३११० कृषी सेवा केंद्र आहेत. दरवर्षी बियाणे, खते या निविष्ठांचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी कृषी सहायकांच्या निगराणीखाली कृषी सेवा केंद्रांवर त्यांची नियुक्ती करून बियाणे व खतांची विक्री केली जाते. बियाणे, खते, कीटकनाशकांच्या गुणवत्ता व पुरवठ्यासंदर्भात येणाऱ्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर, जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना तक्रारी करण्यासाठी १८००-२३३-४००० व ९८२२४४६६५५ असे दोन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याठिकाणी आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. त्याअनुषंगाने भरारी पथकांकडून संबंधित दुकानांची तपासणी केली जात आहे. . जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनीही पंढरपूरमधील काही कृषी सेवा केंद्रांना भेटी देऊन त्याठिकाणचा खतांचा साठा पडताळल्याची माहिती कृषी विभागाने दिली होती. तरीही प्रतिवर्षी बळीराजाला फसविल्याचे प्रकार उजेडात येत आहेत; अशी खंत शेतकरी बांधवांची आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मद्यपीचा गोंधळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

माझ्या सासू-सासऱ्यांना जोपर्यंत पकडून आणत नाही तोपर्यंत आपण या ठिकाणाहून हलणार नाही, असे ओरडत मद्यपी अनिल कानडे या व्यक्तीने जिल्हाधिकारी कार्यालय आवारात गोंधळ घातला. कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न करत असतानाच कर्मचाऱ्यांनी त्याला रोखले.

सोमवारी सायंकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात हा प्रकार घडला. जिल्हाधिकारी कार्यालयात येण्यापूर्वी त्याने डाव्या हातावर ब्लेडने वार करून स्वतः ला गंभीर जखमी केले होते. हातातून रक्त येत असल्याने कार्यालयाच्या पायऱ्यांवर रक्त पडले. त्यामुळे कर्मचाऱ्यांची धांदल उडाली. महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शंतनू गायकवाड यांनी त्याला तंबी दिल्यानंतर तो शांत झाला.

जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या उपस्थितांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वीही या व्यक्तीने स्वतःला जखमी करून कार्यालयात गोंधळ घातला होता. मागील दहा वर्षांपासून त्याचा सासरच्या लोकांशी वाद असून तो भवानी पेठ भागातील रहिवासी आहे. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तो पहिल्या मजल्यावर येऊन जोरजोरात ओरडू लागला. हातातून रक्त येत असल्याने पोलिसांनी विचारले असता, गाडीवरून पडलो, असे त्याने सुरुवातीला सांगितले.

पोलिसांनी रागावल्यानंतर ब्लेडने वार करून घेतल्याचे सांगितले. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. नंतर शंतनू गायकवाड यांनी त्याला समज दिल्यानंतर तो खाली गेला. रात्री उशिराने त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## सिंहगड आणि कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावसोलापूर आणि कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांच्यात नुकताच शैक्षणिक, संशोधनात्मक आणि तांत्रिक देवाणघेवाण मजबूत करण्यासाठी सामंजस्य करार स्वाक्षरीत झाला.

या कराराचा उद्देश दोन्ही संस्थांमधील विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक यांच्या सहकार्यातून नवीन संशोधन प्रकल्प, तांत्रिक कौशल्यवृद्धी, औद्योगिक भेटी, संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान विकास यांना चालना देणे हा आहे.

स्वाक्षरी समारंभात सिंहगड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. शंकर नवले, सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. डॉ. एस. एच. पवार, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे आणि केबीपी महाविद्यालय, पंढरपूरचे प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत व प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. बी. कांबळे, डॉ. अमोल मामलय्या उपस्थित होते.

दोन्ही शैक्षणिक संस्थांदरम्यान विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवउद्योजकता क्षेत्रात संयुक्त संशोधन, विद्यार्थीप्राध्यापक देवाणघेवाण, सेमिनार, कार्यशाळा आणि प्रकल्प प्रदर्शनांचे आयोजन केले जाणार आहे. विशेषतः तुती (मलबेरी) पान व फळांपासून मूल्यवर्धित उत्पादने, सिल्क फायब्रोइन बायो नॅनो-कॉम्पोझिट्स, पुढील पिढीचे शाश्वत पाणी शुद्धीकरण तंत्रज्ञान आणि रेशीमाधारित नवीकरणीय ऊर्जा या अभिनव विषयांवर दोन्ही महाविद्यालये मिळून प्रगत संशोधन करतील. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळांचे अवकाश, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा उद्देश या द्वारे साध्य होणार असून, हा उपक्रम सोलापूर आणि पंढरपूर परिसरातील शैक्षणिक नकाशावर एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत नोंदवले आहे. तसेच दोन्ही संस्थांतील विद्यार्थ्यांना इंटरनेट, लायब्ररी, संगणक प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, तांत्रिक सेमिनार, प्रोजेक्ट मार्गदर्शन यांचा परस्पर लाभ मिळणार आहे. या करारामुळे ग्रामीण व शैक्षणिक दृष्ट्या प्रगतिशील क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नवीन संशोधन संधी, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि करिअरवृद्धीचे मार्ग खुल्या होतील, असा विश्वास दोन्ही संस्थांनी व्यक्त केला.



**या तांत्रिक क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन राबविणार**


- तुती (मलबेरी) पानांवर आधारित प्रक्रिया उत्पादने
- तुती फळांवरील मूल्यवर्धित उत्पादने
- सिल्क फायब्रोइन आधारित बायोनॅनोकंपोझिट्स
- शाश्वत जलशुद्धीकरण तंत्रज्ञान
- रेशीम (सिल्क फायब्रोइन) आधारित नवीकरणीय ऊर्जा तंत्रज्ञान

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. ३ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - कार्तिक
शु. त्रयोदशी (१२.२६)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- भरणी (१८.००)
योग - परिघ (१६.५७)
करण - गर (२२.३३)
....राहू काल....
बुधवार : दु. १२ ते १.३०

दिनविशेष -
१९५१: कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे निधन. १९७१: पाकिस्तानने भारतावर हल्ला केला.
१९७९: भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचे निधन.
१९८४: भोपाळ वायू दुर्घटना
१९९४: जपानमध्ये प्लेस्टेशन रिलीझ करण्यात आले.
१९९२: जागतिक अपंग दिन.
२०१५: सुगम्य भारत अभियान.



## 'ईरा अर्बन'च्या चेअरमनपदी सुरेश नारायणकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सोलापुरातील विविध क्षेत्रातील तरुणांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या ईरा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेश नारायणकर यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील सहकार विभागाचे अधिकारी राजू ढोणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड घोषित करण्यात आली. आर्थिक प्रगतीपासून वंचित राहिलेल्या सर्वसामान्य नागरिक व व्यवसायिकांना बचतीची सवय लावून आर्थिक सक्षम करण्यासाठी ईरा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून कार्य करणार असल्याचे चेअरमन सुरेश नारायणकर यांनी यावेळी सांगितले. यावेळी चेअरमन सुरेश नारायणकर यांनी इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी घोषित केल्या. उपाध्यक्षपदी बांधकाम व्यवसायातील तज्ञ अजयकुमार परांडेकर यांची तर सचिवपदी स्मार्ट सोलापूरकर डिजिटल मीडियाचे संपादक, इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक परशुराम कोकणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याप्रसंगी ईरा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळातील जनसंपर्क संचालक, जागृती प्रकाशनचे प्रमुख विजय गायकवाड, बँकिंग क्षेत्रातील सॉफ्टवेअर डेव्हलपर सागर नारायणे, तज्ञ संचालक सुधीर सुटनकर, संचालिका रेणुका मोटे, अंबिका तोरणे, धनश्री कदम, मीनाक्षी कटके यांचा निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ईरा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या डमिन एक्झिक्युटिव्ह स्नेहा साळुंखे, मार्केटिंग एक्झिक्यूटिव्ह श्रीशैल लवंगे, ऑफिस स्टाफ हफिजा मुलाणी, आरती लवंगे उपस्थित होते.

## दिव्यांग दिनानिमित्त आज फिजिओथेरपी शिबीर

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त महापालिकेच्यावतीने बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी विशेष फिजिओथेरपी सेवा व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महापालिका भौतिकोपचार केंद्र, जोडबसवण्णा चौक, मनपा शाळा क्रं ६, सुधीर गॅस एजन्सीमागे, सोलापूर या ठिकाणी सकाळी१० ते सायंकाळी ५ या कालावधीत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये अपंग/दिव्यांग व्यक्तींना फिजिओथेरपी तज्ञांकडून संपूर्ण वैद्यकीय तपासणी, शारीरिक स्थितीचे मूल्यमापन, आवश्यक त्या थेरपीचे मार्गदर्शन, तसेच वेदनानियंत्रण, व्यायाम पद्धती, पुनर्वसन आणि हालचाल सुधारण्यासाठी उपाय योजना याबाबत सविस्तर सल्ला दिला जाणार आहे. शिबिरासाठी अनुभवी फिजिओथेरपिस्ट, वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असणार आहेत.

## ज्ञानेश्वर महाराज प्रगट दिनानिमित्त शुक्रवारपासून पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

ज्ञानसम्राट श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या प्रगट दिनानिमित्त ५ ते १२ डिसेंबर या कालावधीध्ये भव्य ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन विमानतळासमोरील गांगजी पार्क येथे करण्यात आले आहे, अशी माहिती अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष हभप संजय पवार महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज राष्ट्रीय अध्यक्ष भाविक वारकरी मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व हभप संजय पवार महाराज यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम होणार आहे. होटगी रोड, जुळे सोलापूर, कुमठे परिसरातील सर्व भजनी मंडळ व भाविक यांच्यावतीने व अखिल भाविक वारकरी मंडळ शहर जिल्हा यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये ह.भ.प. मन्मत महाराज बहिरमल, हभप पुरषोत्तम महाराज सुतार, ह.भ.प. निळोबा महाराज शिरसट, हभप माऊली बचुटे महाराज, ह.भ.प. लक्ष्मन महाराज चव्हाण, हभप गोपाळ लोंढे यांची सायंकाळी ५ ते ६ यावेळेत प्रवचने होणार आहेत.

महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार हभप सुधाकर इंगळे महाराज, हभप कृष्णा चवरे महाराज (पंढरपूर), हभप प्रकाश साठे महाराज (बीड), हभप उमेश दसरथे महाराज (देवाची आळंदी, हभप अनिल पाटील महाराज बाभळगावंकर, हभप रामराव ढोक महाराज (नागपूर), ह.भ.प. गुरुवर्य प्रभाकरदादा बोधले महाराज (पंढरपूर) यांची हरिकिर्तने होणार आहेत. हभप. नामदेव पवार महाराज (श्रीगोंदा) हे ज्ञानेश्वर महाराज व्यासपीठाचे प्रमुख म्हणून उपस्थित राहणार आहेत. दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता भव्य दिंडीची नगर प्रदक्षिणा होऊन दुपारी १० ते १२

या वेळेत हभप. गुरुवर्य बापूसाहेब देहूकर महाराज (पंढरपूर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सर्वांसाठी महाप्रसाद होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहाचे वैशिष्ट्ये म्हणजे ७५० ज्ञानेश्वरी वाचक पारायणसाठी बसणार आहेत. रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी रेस्पायर क्लिनिक, रामलाल चौक यांच्या वतीने महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, तसेच या शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस पांडुरंग माने, दीपक हरवाळकर, काशिनाथ सुरवसे, प्रकाश माने, मनोज कासार, अप्पा माने, मधुकर जाधव, बसवराज पनशेट्टी आदी उपस्थित होते.

## 'डीसीसी'च्या भरतीत स्थानिकांना मिळणार संधी

**सहकार क्षेत्रातून...**



यशवंत गुरव
मो. ८८८८६५०७५५

राज्यातील डीसीसी अर्थात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भरती प्रक्रियेत आता स्थानिक भूमिपुत्रांना त्यांच्या हक्काचा वाटा मिळणार आहे. नोकर भरतीमध्ये ७० टक्के जागा स्थानिक रहिवाशांसाठी राखीव ठेवाव्या लागणार असल्याने ग्रामीण भागातील युवकांना शहर तसेच ग्रामीण स्तरावर बँकिंग क्षेत्रात इच्छुकांना नोकरीची मोठी संधी मिळणार आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, भरती प्रक्रियेतील ७० टक्के जागा स्थानिक रहिवाशांसाठी राखीव असतील. त्यांच्या हक्कांच्या जागांना धक्का लावू नये. असे स्पष्टपणे आदेश दिल्याने हा निर्णय सध्या सुरू असलेल्या भरती प्रक्रियेलाही लागू होणार आहे. यामुळे स्थानिक उमेदवारांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होण्यास सहाय्य मिळणार आहे.

दरम्यान, राज्याच्या सहकार विभागाने हा निर्णय ३१ ऑक्टोबरला घेतला आहे. मात्र या भरती प्रक्रियेत कोणत्याही स्वरूपाचा गोंधळ होणार नाही,याची खबरदारी घेतली पाहिजे हे तितकेच खरे आहे. राज्यातील विविध ३१ जिल्हा बँकांमध्ये होणारी भरतीची लेखी परीक्षा नियुक्त संस्थांद्वारे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. लेखी परीक्षेनंतर पात्र उमेदवारांची तोंडी परीक्षा संबंधित बँकेच्या व्यवस्थापन मंडळातर्फे करण्यात येणार आहे. या नव्या निर्णयामुळे नेतेमंडळी, संचालकांच्या हस्तक्षेपाला आळा बसणार आहे. सहकार विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे संबंधित जिल्ह्यातील नेतेमंडळी आणि बँकेच्या संचालकांच्या हस्तक्षेपाला आळा बसेल, असे म्हटले जात असले, तरीही दुसरीकडे लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा ही बँकेचे व्यवस्थापन मंडळच घेणार आहे. त्यामुळे नेतेमंडळी, संचालकांच्या हस्तक्षेपाला आपसूकच बळ मिळणार आहे. सहकार आयुक्तांनी ३१ ऑक्टोबर रोजी घेतलेला निर्णय भरतीची जाहिरात काढलेल्या बँकांनाही निर्णय लागू होणार आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया पारदर्शक होईल असा का ? असा प्रश्नचिन्ह ही निर्माण केला जात आहे. त्यासाठी शासन स्तरावर देखील नियंत्रण असणे गरजेचे आहे. ज्या जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रशासक नियुक्त आहेत. किंवा ज्या बँकेवर अध्यक्षांची नेमणूक आहे. ती व्यक्ती तटस्थ भूमिकेची असावी. जेणेकरून ग्रामीण भागातील गरजू युवकांना नोकरीचे नवे दारे उघडली जाणार आहेत. ना की, एका चिठ्ठीवर वशिलाबाजी करणाऱ्यांकडे जास्त लक्ष द्यावे. सहकार आयुक्तांनी जिल्हा बँकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिकांसाठी ७० टक्के, तर जिल्ह्याच्या बाहेरील रहिवासी उमेदवारांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचा प्रस्ताव सरकारला सादर केला. तो सरकारने मंजूर केला. त्यात ७० टक्के जागा स्थानिक भूमिपुत्रांसाठी राखीव राहील. त्यामुळे जिल्ह्यातील बेरोजगारांना दिलासा मिळेल. शासनाचा हा धोरणात्मक निर्णय असला तरीही याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. जिल्हा सहकारी बँकांतील भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी. यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे आणि त्याची अंमलबजावणी होणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. राज्य सरकारने सहकारी विभागाचा नवा प्रस्ताव मंजूर करून जिल्हा बँकांच्या भरती प्रक्रियेत ७०-३० चे प्रमाण मान्य केलेली आहे. हे प्रमाण सध्या भरती प्रक्रिया सुरू केलेल्या जिल्हा बँकांसाठीही लागू राहील. त्यामुळे जिल्हा सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

नोकर भरतीसाठी राज्य सरकारने तीन संस्था नियुक्त केल्या आहेत. त्यामध्ये 'आयबीपीएस', 'टीसीएस', 'एमकेसीएल' या तीन संस्थां उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेणार आहे. तोंडी परीक्षा घेण्याचा अधिकार मात्र बँकेच्या व्यवस्थापनाकडेच ठेवण्यात आला आहे. मात्र याप्रश्नी लेखी आणि तोंडी परीक्षा नियुक्त संस्थेनेच घ्याव्यात, जेणेकरून परीक्षेतील पारदर्शकता कायम राहणार आहे. राज्य सरकारने नेमलेल्या संस्थांनीच लेखीसह तोंडी परीक्षा घेऊन थेट पात्र उमेदवारांची यादी बँकांना सोपवावी. नव्या निर्णयानुसार पात्र संस्था केवळ लेखी परीक्षाच घेणार आहे. तोंडी परीक्षा घेण्याचे अधिकार सध्या बँकेकडेच आहे. प्रक्रिया आणखी पारदर्शक करायची असेल तर तोंडी परीक्षा घेण्याचेही अधिकार बँकांना नसावेत. राज्य सरकारी बँकेत भरतीची लेखी व तोंडी परीक्षा 'आयबीपीएस' राबवीत आहे. राज्य सरकारच्या सहकार विभागाने लागू केलेल्या नव्या नियमानुसार भरती प्रक्रिया ऑनलाईन केली खरी, परंतु तोंडी परीक्षा संचालक आणि नेते मंडळांच्या हवाली केल्याने भरती प्रक्रियेत पुन्हा किंतु परंतु उपस्थित होत आहे. जिल्हा बँकेतील नोकर भरतीमध्ये वशिलेबाजी थांबवण्यासाठी नवे पाऊल सहकार विभागांनी उचलले आहे. परंतु यामध्ये तोंडी परीक्षा संचालक मंडळाच्या ताब्यात दिल्याने, नोकर भरतीमध्ये राज्यकर्त्यांसह इतर नेत्यांचा हस्तक्षेप कायम राहणार आहे. त्यासाठी नोकर भरतीच्या प्रारूप आराखड्यात बदल होणे अपेक्षित आहे. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फतच सर्व प्रक्रिया पार पाडून केवळ यादी बँकांकडे सुपूर्द करणे गरजेचे आहे. त्यामुळेच नोकर भरतीची पारदर्शकता टिकून राहणार आहे. अन पर्यायाने ग्रामीण भागातील गरजू युवकांना नोकरीचे खरी संधी उपभोगता येणार आहे.

# सीएनजी पंप बंद; वाहनधारकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

एमआयडीसी चिंचोली परिसरात आयएनसी लिमिटेडतर्फे चालवला जाणारा सोलापुरातील प्रमुख सीएनजी पंप मंगळवारपासून अचानक बंद करण्यात आला आहे. कंपनीने सोमवारीच नोटीस फलक लावून २ डिसेंबरपासून पंप बंद राहणार असल्याची माहिती दिली होती. मात्र, सकाळपासूनच पंप बंद असल्याचे दिसताच शहर-जिल्ह्यातील वाहनधारकांची मोठी तारांबळ उडाली.



पंप बंद असल्यामुळे सीएनजी वाहनधारकांना इंधनासाठी भटकंती करावी लागत असून, शहरात अन्य पर्यायी सुविधा नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पंपावर सीएनजी भरण्यासाठी सतत वाढणारी गर्दी, रांगेत होणारी अरेरावी आणि परिसरातील रहिवाशांच्या तक्रारींमुळे पंप बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंपावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पंप सुरू ठेवणे कठीण झाल्याचे समजते. याबाबत कंपनीच्या प्लांट मॅनेजर यांनी सीएनजी पंप आजपासून बंद आहे. अधिक माहिती लवकरच देण्यात येईल, असे सांगितले. यामुळे पंप पुन्हा कधी सुरू होणार याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने सोलापुरातील सीएनजी वाहनधारकांची चिंता वाढली आहे.

**आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक**

एमआयडीसी अधिकारी, सीएनजी कंपनी अधिकारी आणि सीएनजी पंपधारक यांची बुधवार, दि.३ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक होणार असून, यावेळी सीएनजी कंपनीधारकांना योग्य सुचना देवून सीएनजी पंप पुर्ववत करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करणार आहे. या बैठकीत पंपधारक, कंपनीवाले आणि एमआयडीसी अधिकारी यांच्या अडचणींचा निपटाराही करण्यात येणार आहे.

**- संतोष सरडे,** जिल्हा पुरवठा अधिकारी.

## महत्वाचे...



### मेहता शाळेचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

भारतीय राष्ट्रीय कला व सांस्कृतिक वारसान्यास इंन्टॅक यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत कै. वि. मो मेहता प्रशालेतील इयत्ता दहावीमधील चि. सुयश मोहन हजारे व अनुष्का अमोल गायकवाड यांच्या गटाने शहरस्तरीय फेरीत प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय फेरीत स्थान मिळवले. पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय फेरीत एकूण आठ जिल्ह्यांमधून आलेल्या गटांमधून प्रशालेने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. रु. २५००/- रोख रक्कम सामान्य ज्ञानाची पुस्तके व प्रमाणपत्र असे त्यांना मिळालेल्या बक्षिसाचे स्वरूप आहे. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या सहशिक्षिका सीमा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.



### महाराष्ट्र राज्य गांधी फोरमच्या अध्यक्षपदी सातलिंग शटगार

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य गांधी फोरमच्या अध्यक्षपदी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार यांची निवड करण्यात आली आहे. निवडीचे पत्र राष्ट्रीय गांधी फोरमचे प्रभारी अध्यक्ष पुरुषोत्तम बलदवा यांच्या उपस्थितीत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते जनवात्सल्य येथील निवासस्थानी देण्यात आले. यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, गांधी फोरमचे सचिव नंदकुमार यल्ला,डॉ. मंगेश शहा, हॉकीपट्टू जहांगीर शेख, माजी रणजी क्रिकेटपटू बाळ दळवी, उद्योगपती राजकुमार राठी,चंद्रकांत कोंडगुळे, उपेंद्र ठाक्कर, कृष्णदेव वाघमोडे, प्रा.बोळकोटे उपस्थित होते. यावेळी शटगार म्हणाले की, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण, महात्मा गांधीच्या जयंती निमित्त व्याख्यानमाला, महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रेरित झालेल्या व्यक्तीला गुजरात व वर्धा व साबरमती आश्रमाला भेटी देणे व महात्मा गांधी यांच्या कार्याची माहिती अनुभवणे पंचवीस वर्षांच्या कार्याचा अनुभव देणारी स्मरणिका काढणे आणि या स्पर्धेचे प्रकाशन देशाचे सन्माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ,माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम यावर्षी राबविण्यात येणार असल्याचे शटगार सांगितले.



### शेतकरी संघटनेच्या सोशल मिडीया जिल्हा प्रमुखपदी गिरमला गुरव

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

शेतकऱ्यांचा आवाज सोशल मीडियावर प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज येथील गिरमला गुरव यांची शेतकरी संघटना सोशल मीडिया सोलापूर जिल्हा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. शेतकरी संघटनेच्या १ डिसेंबर रोजीच्या बैठकीत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव नांदखिले व शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय नेते रघुनाथ पाटील यांच्या उपस्थितीत गुरव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव नांदखिले आणि शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय नेते रघुनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, शेतीमालाला रास्त भाव या एककलमी ध्येयासाठी सोशल मीडियावरून प्रभावी जनजागरण करण्याची जबाबदारी गुरव यांच्यावर देण्यात आली आहे. संघटनेने पुकारलेल्या विविध न्यायिक, राजकीय व सनदशीर आंदोलनांना योग्य प्रसिद्धी देण्याचे आवाहनही नियुक्तीपत्रात करण्यात आले आहे.



### कर्मचारी पतसंस्था निवडणूकीत सत्ताधारी पॅनलचा एकतर्फी विजय

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था क्रमांक २ या संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी पॅनेलने एकतर्फी विजय मिळवित विरोधी गटाच्या सर्व उमेदवारांचे अनामत रक्कम जप्त झाले आहे. विजयी उमेदवार सर्वसाधारण मतदारसंघ गिरीश जाधव, सुधाकर माने देशमुख, श्रीकांत धोत्रे, श्रीकृष्ण घंटे, शशिकांत साळुंखे, यादव मोहन, अंकुश कोळेकर, दिनेश बनसोडे, समीर शेख, भीमाशंकर वाले, भटक्या विमुक्त मतदार संघातून रणजीत घोडके, ओबीसी मतदारसंघातून शिवाजी कांबळे, महिला मतदारसंघातून राणी सुतार, संगीता हंडे बिनविरोध प्रदीप सकट असे एकूण १५ उमेदवारांनी एकतर्फी विजय मिळविला. पॅनलचे महेश जाधव, राजेंद्र माशाळ, रामस्वामी मनलोर, सिद्धाराम बोरुटी, अविनाश गोडसे, रवी कोरे, रणजीत घोडके, गिरीश जाधव, शिवाजी कांबळे उपस्थित होते.



## संगनबसवेश्वर प्रशालेचा वर्धापन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २ डिसेंबर-**

मोडनिंब (ता माढा) येथील संगनबसवेश्वर शिवयोगी कन्या प्रशालेचा ३४ वा वर्धापनदिन पार पडला. उपस्थितांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा बक्षीस देवून सन्मान करण्यात आले. तसेच पांडूरंग आण्णा पाटील फाउंडेशनच्या वतीने घेतलेल्या स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव करण्यात आला. या निमित्त फनी गेम्स, विविध स्पर्धा व आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.प्रशालेच्या विद्यार्थिनींनी मोडनिंब शहरातून मिरवणुकीच्या वेळी लेझीम व झांज पथकाच्या सुंदर सादरीकणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागनाथ ओहोळ होते.

या समारंभास पुण्याच्या प्रथम महिला महापौर कमल व्यवहारे, संस्थापक ज्ञानराज व्यवहारे, माजी सभापती नंदा सुर्वे, पांडुरंग पाटील फाउंडेशनच्या पल्लवी पाटील, सरपंच लक्ष्मी पाटील, अॅड. प्रियंका तळेकर, बाबूराव सुर्वे, एकनाथ सुर्वे, उपसरपंच अमित कोळी, कैलास तोडकरी, वैभव मोरे, दत्तात्रय सुर्वे, सदाशिव पाटोळे, प्रकाश गिड्डे, अशोक साळवी,पोपट दोभाडा, सौदागर जाधव,विशाल मेहता, शर्मिला कोळी, प्रथमेश शिंदे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका संगीता सुर्वे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अर्जून बनसोडे, देविदास परबत, शेखर सुर्वे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे शिक्षक दत्तात्रय गवळी,अन्वरहुसेन मुलाणी,धनाजी चोपडे, संतोष माने, संजय कोठावळे, चंद्रकांत घाडगे, अर्चना चव्हाण, शोभा रोकडे, रूपाली व्यवहारे यांनी परिश्रम घेतले.

## स्वामी समर्थांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**तोडकरी आणि पुरवत परिवार यजमान; भाविकांची गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२ डिसेंबर-**

मोडनिंब (ता. माढा) येथील शिवाजीनगर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरात मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा विधिवत पार पडला.यानिमित्त मोडनिंब शहरात पहिल्याच श्री स्वामी समर्थ मंदिराची स्थापना होत आहे.



विद्यानगरी सोसायटीमध्ये हे स्वामी मंदिर उभारले आहे. या सोहळ्याचे यजमानपद वैशाली व कैलास तोडकरी आणि कस्तुरी व मंगेश पुरवत या दाम्पत्यांकडे होते. तर पौरोहित्य पंढरपूर येथील संजय ताठे गुरुजी यांनी केले. बालयोगी सुखदेव महाराज बार्डीकर यांच्या हस्ते कलशारोहण करण्यात आले. मोडनिंब शहर व परिसरातील स्वामी भक्तांच्या पुढाकाराने व देणगीतून या मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास आले. सुमारे १७ लाख रुपये देणगी जमा झाली. माजी सरपंच कैलास तोडकरी यांनी जयपूर येथून आणलेली सुमारे एक टन वजनाची संगमरवरी मूर्ती बसविण्यात आली. यावेळी प्रमुख देणगीदार कैलास तोडकरी, मंगेश पुरवत व डॉ. अनिल गोळवलकर यासह अन्य देणगीदारांचा सन्मान करण्यात आला. सुमारे तीन वर्षांपासून संकल्पित असलेल्या या मंदिरासाठी विद्यानगरी सोसायटीचे अध्यक्ष प्रा. अशोक गोवे, सचिव जयवंत समुद्र, अनिल शिंदे, शहाजी चव्हाण, मोहन शिंदे, गंगाधर कोळी, राजेंद्र तोडकरी राजाभाऊ भोसले व इतर सहकाऱ्यांनी मेहनत घेतली. रविवारी शहरातून निघालेली शोभायात्रा व आजच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास हजारो भाविकांनी गर्दी केली होती.

पंचायत समितीचे माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, माजी सभापती शिवाजी कांबळे, रमेश महाराज वसेकर, बाबुराव सुर्वे, कुरण गिड्डे, बालाजी पाटील, अॅड. गणेश सुर्वे, दत्तात्रय सुर्वे, राहुल गांधी, वैभव मोरे,निलेश गिड्डे, विजयकुमार नामदे, दत्तात्रय शिंदे, सत्यनारायण गिड्डे, आर. बी. पाटील, डॉ. संजय लोखंडे, राजेश निंबाळकर, राहुल गडेकर आदी मान्यवरांनी यावेळी उपस्थिती दर्शवून स्वामी चरणी नतमस्तक झाले.

## जन्मठेप झालेल्या आरोपीस उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

मरवडे, (ता. मंगळवेढा) येथे दिलीप साहेबलाल नदाफ याचा लोखंडी टॉमी डोकीत मारून खून केल्या प्रकरणी मयताचा चुलत भाऊ सैफन बंडू नदाफ (रा. बनतांडा, ता. मंगळवेढा) याला पंढरपूर सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर शिक्षेविरुद्ध आरोपी सैफन बंडू नदाफ याने मुंबई उच्च न्यायालयात अपील व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच चे न्यायमूर्ती श्री एम. एस. कर्णिक व न्यायमूर्ती श्री अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर होऊन न्यायमूर्तींनी आरोपीची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. मयत दिलीप नदाफ व त्यांचा चुलत भाऊ सैफन नदाफ यांच्यामध्ये शेत जमिनीच्या हद्दीच्या कारणावरून भांडणे होत होती. घटनेच्या आदल्या दिवशी पुन्हा त्याच कारणावरून भांडणे झाली होती. घटने दिवशी आरोपीच्या वडिलांनी सदरचा हद्दीचा दगड हलवला, त्यामुळे झालेल्या भांडणात आरोपीने मयत दिलीप यांच्या डोक्यात टॉमी मारून खून केल्याच्या आरोपावरून मंगळवेढा पोलिसांनी आरोपी विरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. या प्रकरणी उच्च न्यायालयात आरोपीतर्फे अॅड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे अॅड. पंकज देवकर यांनी काम पाहिले.

## ‘लोकमंगल’कडून गरीब रुग्णांना मोफत औषध वाटप

**१२ डिसेंबर रोजी योजनेचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

मोफत अन्नपूर्णा योजना आणि मोफत सामुदायिक विवाह सोहळा यासारख्या सामाजिक उपक्रमांनंतर लोकमंगल फाउंडेशनकडून आणखी एक महत्त्वाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. शहर आणि जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल व गरीब रुग्णांना मोफत औषधे व गोळ्या वाटप करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या उपक्रमाची सुरुवात १२ डिसेंबरपासून होणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. दरम्यान, या योजनेचा प्राथमिक शुभारंभ १२ डिसेंबर रोजी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

एका भावनिक प्रसंगाचा उल्लेख करताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले, माझा एक मित्र औषधे व गोळ्या न मिळाल्याने जग सोडून गेला. अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या आणि सरकारी रुग्णालयातून औषधे उपलब्ध न झालेल्या रुग्णांना, तसेच गरीब, ज्येष्ठ नागरिक आणि उपचारासाठी असमर्थ रुग्णांना मोफत औषधे व गोळ्या दिल्या जाणार आहेत. या योजनेचा प्राथमिक शुभारंभ १२ डिसेंबर रोजी होणार असून, पुढील काळात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले. या उपक्रमात शहर व जिल्ह्यातील संस्था, संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

## पिलीव आरोग्य केंद्रात आज मोफत कॅन्सर तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ३ डिसेंबर रोजी सोलापूरहून कॅन्सर व्हॅन येणार आहे. यामध्ये पिलीव कार्यक्षेत्रातील सर्व गावातील नागरिकांची कॅन्सर तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये १८ वर्षापुढील सर्व पुरूष व महिलांमधील पोटाचा, तोंडाचा, आतडयाचा, स्तनांचा, गर्भाशयाचा कॅन्सर यांची मोफत तपासणी होणार आहे. तरी पिलीव परिसरातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी केले.

## आर्या महाविद्यालयात जर्मन तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**विद्यार्थ्यांनी साधला संवाद**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २ डिसेंबर-**

आर्या कृषी महाविद्यालयात बेलीन, जर्मनी येथील सुप्रसिद्ध डेअरी उद्योगपती पीट रीटसेमा आणि त्यांची पत्नी श्रीमती हेलन वर्मीज यांनी आर्या महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.




सदर उपक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे मार्गदर्शक रणजितसिंह शिंदे तसेच महाविद्यालयीन व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयात स्थापन केलेल्या ग्लोबल लर्निंग व इंटरॅक्शन फोरमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची अनोखी संधी उपलब्ध होत आहे. या उपक्रमाचा हेतू विद्यार्थ्यांना जागतिक ज्ञानाशी जोडणे, विविध देशांतील प्रगत कृषी पद्धतींची ओळख करून देणे आणि आधुनिक तंत्रज्ञानविषयक दृष्टी विस्तार करणे हा आहे. महाविद्यालयीन परिसरात आगमन होताच पाहुण्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम, प्रयोगशाळा सुविधा, विद्यार्थी सादर करीत असलेले प्रात्यक्षिक प्रकल्प आणि परिसरातील स्थानिक शेतीपद्धतींचा बारकाईने आढावा घेतला. भारतीय कृषी शिक्षणातील सकारात्मक बदल आणि विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष चर्चासत्रात रीटसेमा यांनी आपल्या उद्योगाच्या प्रवासाची गोष्ट सांगत दोन हजार गाईंच्या क्षमतेच्या अत्याधुनिक डेअरी फार्मचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर आणि जागतिक डेअरी उद्योगातील नवे कल याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी दिलेली संयमी व सखोल उत्तरे लक्षवेधी ठरली. श्रीमती हेलन वर्मीज यांनीही उद्योजकता, उच्च शिक्षणातील जागतिक संधी आणि परदेशातील प्रशिक्षणाचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पाहुण्यांनी आर्या कृषी महाविद्यालयाच्या मानेगाव येथील विद्यार्थी आदित्य साळुंखे यांच्या शेताला भेट देऊन द्राक्ष, पेरू, डाळिंब व कांदा पिकांची माहिती घेतली. साळुंखे कुटुंबीयांसोबत त्यांनी संवाद साधत त्यांचे कौतुक केले. तसेच बबनरावजी शिंदे साखर कारखाना, तुर्क पिंपरी येथेही त्यांनी भेट देऊन उत्पादन प्रक्रियेचा आढावा घेतला. या दरम्यान कारखान्याचे जी.एम. कैलास मते, गणेश चव्हाण, शंकर तहसीलदार राहुल पाटील व शशिकांत घाडगे उपस्थित होते.

भारतीय तरुणांमध्ये अपार ऊर्जा व क्षमता आहे- त्यांना जागतिक अनुभवाची जोड मिळाल्यास ते मोठी झेप घेऊ शकतात, असे त्या म्हणाल्या. या भेटीचे आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी ग्लोबल ॲग्रीनेक्ससचे रोहित चकोर आणि सचिन दळवे यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना जागतिक बाजारपेठ व तांत्रिक प्रगतीची ओळख करून देण्यास अशा उपक्रमांचे मोलाचे योगदान असते. विद्यार्थ्यांच्या जागतिक दृष्टिकोनात भर घालणारी ही भेट त्यांच्या करिअर विकासासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरल्याचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी समन्वयक म्हणून डॉ. तृप्ती राठोड आणि प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी काम पाहिले. यावेळी प्रा. संदीप मुरुमकर, प्रा. खंडेराव वाघे, प्रा. तुषार नामदे, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, प्रा. अमोल माळी, डॉ. संदीप मखमले, प्रा. अक्षय शेळके, रोहित घळके, कुमार शिंदे आदी उपस्थित होते.

## अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजना ठरतेय लाभदायक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**




सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात अनुसुचित जातीच्या ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लाभदायक ठरत आहे.

या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मुक्काम, भोजन आणि शैक्षणिक साहित्यासाठी अनुदान दिले जाते. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासासाठी या योजनेंतर्गत ऑनलाईन प्रणालीद्वारे भरती प्रक्रिया राबवली आहे.

नवबौध्द, मातंग, चर्मकार, होलार, बुरुड यांसह अन्य जातीतील इयत्ता १० वीच्या पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना एकूण ४२ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांपेक्षा जास्त नसणाऱ्या पालकांच्या पाल्यांना सदर अनुदान दिले जाते. लाभार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. संबंधित जातीचा दाखला असणे बंधनकारक आहे.

**ऑनलाईन अर्ज**

अनुसुचित जाती प्रवर्गातील विविध शैक्षणिक संस्थेत वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू आहे. स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरुन त्याची प्रत सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयात सादर करावी, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



बार्शी येथील एका केंद्रावर मतदान करण्यासाठी महिलांनी अशी गर्दी केली होती.



## आम्ही केले मतदान



आमदार दिलीप सोपल



ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांनी सहपत्नीक मतदान केले.



बार्शी नगरपरिषदेच्या प्रभाग १२ मध्ये ८७ वर्षांच्या लताबाई घोलप यांना मतदान केंद्रात व्हील चेअरवर घेऊन जाताना नगरपरिषदेचा कर्मचारी.



एका वृध्दाला मतदानासाठी केंद्रावर घेवून जाताना कार्यकर्ते दिसत आहेत.



मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रांगेत उभारलेले मतदार.




अक्कलकोट : आदर्श महिला मतदान केंद्राचे छायाचित्र.

# रात्री उशिरापर्यंत सुरु होती मतदानाची प्रक्रिया

- पंढरपूर नगरपरिषदेसाठी ६० ते ६५ टक्के मतदान
- अंतिम आकडेवारी किंवा टक्केवारीची घोषणा नाही
- २ ऐवजी २१ डिसेंबरला लागणार निकाल
- तबबल अठरा दिवसांची करावी लागणार प्रतिक्षा



**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२ डिसेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी मतदान संपण्याअगोदर काही वेळ मतदानासाठी मतदारांची गर्दी झाल्यामुळे रात्री उशिरा पर्यंत काही मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया सुरु होती. त्यामुळे झालेल्या एकूण मतदानाची अंतिम आकडेवारी किंवा मतदानाची एकूण टक्केवारी रात्री उशिरापर्यंत प्रशासनाकडून प्रसिध्द करण्यात आली नाही.

दुपारी ३.३० पर्यंतची मतदानाची प्रसिध्द झालेली आकडेवारी आणि मतदान संपण्याच्या काही वेळ अगोदर केंद्रावर झालेली मतदारांची गर्दी यावरुन ६५ ते ७० टक्के मतदान होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.थंडीचा कडाका जास्त असल्यामुळे मतदार मतदानासाठी लवकर सकाळी घराबाहेर पडले नाहीत. मात्र, दुपारी ४ नंतर त्या-त्या मतदान केंद्रावर मतदारांची संख्या वाढत असल्याचे दिसले. मतदान संपण्यापूर्वी अर्धा ते पाऊणतास अगोदर बऱ्याच मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी झाल्याचे दिसून आले. वेळेत आलेल्या शेवटच्या माणसाला मतदानाचा हक्क बजाविता येण्यासाठी म तदान केंद्रावरील अधिकाऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. नागपूर मठ, मुलांची शाळा नंबर ४, अनिलनगर, उपजिल्हा रुग्णालय एआरटी सेंटर, उपजिल्हा रुग्णालय संशोधन रुग्णालय, न्यु सातारा कॉलेज, रिलायन्स पेट्रोलपंपासमोरील केंद्र याठिकाणच्या मतदान केंद्रांवर रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया सुरु होती. सर्वत्र मतदानाचा माहोल होता.

पंढरपूर नगराध्यक्षपदासाठी शामल शिरसाट, प्रणिता भालके, कांचन बंदपट्टे, जैतुनबी मुलाणी, भारती शिंदे ह्या रिंगणात होत्या. मात्र, भाजपाच्या शामल शिरसट व तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या प्रणिता भालके यांच्यात खरी लढत झाल्याचे दिसून आले. नगराध्यक्षपदी कोण बाजी मारणार हे २१ डिसेंबरला स्पष्ट होणार आहे. १८ प्रभागातून नगरसेवकपदासाठी विक्रमी संख्येने उमेदवार रिंगणात होते. भाजपा, पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीची भिस्त माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या खांद्यावर होती. तर तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेतृत्व विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्याकडे होते. माढ्याचे आमदार तथा विठ्ठल कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीच्या माध्यमातून नगरसेवकपदासाठी आपले काही शिलेदार निवडणूकीच्या रिंगणात उतरविले होते. मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहचविण्यासाठी सर्वच पक्ष आणि स्थानिक आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सकाळपासूनच कामाला लागलेले दिसत होते. मतमोजणी २ डिसेंबरऐवजी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याने निकालासाठी तब्बल अठरा दिवसांची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

### कॉरिडॉरचा परिणाम काय होणार?

पंढरपूर येथे कॉरिडॉर करण्यावर प्रशासन ठाम आहे. त्यामुळे कॉरिडॉरमध्ये बाधित होणारी मंदिर परिसरातील मंडळी प्रशासन, शासन, सत्ताधारी मंडळींवर नाराज असल्याचे दिसून आले. संभाव्य बाधित मंडळींनी नेमकी काय भूमिका घेतली, त्यांचे मतदान कोणाला झाले? सत्ताधारी मंडळींवर हे संभाव्य बाधित खरंच नाराज होते का? याबाबत निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

### भालकेंनी घेतला आक्षेप

शहरातील उर्दु शाळेत मतदानाच्या मशिनवरील विशिष्ट चिन्हा पुढील बटणावर पेनाने खुण करुन ते बटण दाबण्याचे मतदारांना आवाहन केले जात असल्याचा आरोप तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके यांनी करीत मतदान प्रक्रियेवर आक्षेप घेतला होता. मतदान केंद्रावरील अधिकारी, पोलिस यांच्याबरोबर तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेते भगिरथ भालके व त्यांच्या पत्नी तथा नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके यांची शाब्दिक चकमक उडाली होती.

### मतदानाची टक्केवारी

एकूण १८ प्रभागात मिळून ९५ हजार ५५९ मतदार मतदानाचा हक्क बजाविणार होते. मात्र सकाळी ९.३० वाजे पर्यंत केवळी ४ हजार ९६५ ऐवढ्याच म तदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. त्यामुळे केवळ ५.२५ टक्के ऐवढीच मतदानाची टक्केवारी नोंदली गेली. साडेअकरा वाजे पर्यंत १५.०६ टक्के एवढा मतदानाचा आकडा नोंदविला गेला. त्यावेळी १४ हजार २३७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला होता. दुपारी दीड वाजेपर्यंत २६ हजार २३९ मतदारांनी मतदान केले होते. त्यामुळे मतदानाचा टक्का २७.७५ वर पोहचला होता. दुपारी साडेतीन वाजता ४१ हजार ३६५ मतदारांनी मतदान केले होते. त्यामुळे मतांची टक्केवारी ४३.७५ पर्यंत पोहचली होती.



## माजी आमदार जयवंतराव जगतापांसह कुटुंबियांनी बजावला मतदानाचा हक्क


**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२ डिसेंबर-**

करमाळा नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज सकाळपासून मतदानास सुरुवात झाली आहे. कै.साधनाबाई जगताप प्राथमिक प्रशालेतील मतदान केंद्रावर करमाळ्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी आपल्या कुटुंबासह उपस्थित राहून मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रांवर मतदारांची लक्षणीय गर्दी दिसत असून दुपारी ३:३० वाजेपर्यंत शहरातील १२४०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यावेळी शिवसेनेच्या (शिंदे गट) नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. नंदिनीदेवी जगताप, तसेच जगताप कुटुंबीय उपस्थित होते. मतदानानंतर जयवंतराव जगताप यांनी नागरिकांना लोकशाहीच्या सणात उत्साहाने सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन केले. करमाळ्यात सुरळीत व शांततेत मतदान प्रक्रिया पार पडत असून सकाळपासून विविध मतदान केंद्रांवर मतदारांची चांगली उपस्थिती दिसून येत आहे.

## पालिका प्रारूप मतदारयादीवर मंगळवारी १०४ हरकती

- निवडणूक कार्यालयाकडे आतापर्यंत एकूण ४४१ तक्रारी प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**



सोलापूर महापालिका प्रारूप मतदार यादीवर आज मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी दिवसभरात एकूण १०४ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. २० नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ४४१ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

मतदार यादीमध्ये काही लेखनिकाच्या चुका असल्यास त्याबाबतचे प्राप्त अर्ज - १, दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागतून वगळण्यात यावी व संबंधित प्रभागत समाविष्ट करण्याबाबतचे प्राप्त अर्ज - ९१ , मनपा संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मनपाच्या मतदार यादी मध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत प्राप्त अर्ज - ३, इतर अर्ज - ९ असे अशा एकूण १०४ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत.

दि. २० नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ४४१ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

## मतदानाची क्षणचित्रे...



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-प्रभाग क्र.३ मधील नितीन नागनाथ बुंजकर यांनी विवाह होताच उत्कर्ष विद्यालय येथील केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-बूथ लेवल ऑफिसर यांच्याकडून मतदान केंद्र शोधताना मतदार.



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-प्रभाग क्र.९, मतदान केंद्र क्र.१ येथे दुपारी ३ ते ३.३० यावेळेत मतदान प्रक्रिया थांबली होती. यावेळी बॅलेट युनिट बदलत मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यात आली. त्यामुळे संध्याकाळी ५.३० वाजता झालेली गर्दी.



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-प्रभाग क्र.२, मतदान केंद्र क्र.३ येथे सकाळच्या सत्रात मतदान करण्यासाठी झालेली महिला मतदारांची गर्दी.

# बोगस मतदान प्रकरणी महिलांना अटकाव

### कार्यकर्त्यांमध्ये झाली बाचाबाची, धक्काबुक्की

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ डिसेंबर-**

बार्शी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी एका केंद्रावर बनावट आधार कार्डद्वारे बोगस मतदान करण्यास आलेल्या महिलांना अटकाव करण्यात आला. येथील एका मतदान केंद्रावर कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची, धक्काबुक्की झाल्याची घटना घडली. दरम्यान, पोलिसांनी लागलीच तिकडे धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

शहरात एकूण ११२ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली. नगरपरिषदेसाठी तब्बल ९ वर्षानंतर मतदान होत असल्याने मतदारांचा मोठा उत्साह पहावयास मिळाला, असे निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले व सहाय्यक निवडणूक अधिकारी तैमूर मुलाणी यांनी सांगितले.



बार्शी येथील मतदान केंद्रावर लागलेली मतदारांची रांग.

सायंकाळी ५.३० वाजता मतदान संपतेवेळी सुमारे ६२ टक्के मतदान झाले होते. काही केंद्रावर रात्री उशिरापर्यंत मतदान सुरु होते. प्रभाग क्रमांक ४ मधील शाळा क्रमांक १४, प्रभाग ६ मध्ये कुंकूलोळ प्रशालेतील मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची गर्दी होती. प्रभाग १२, १५, १७, १८, १९, २० आणि २१ मध्येदेखील मोठी चुरस दिसून आली. प्रभाग ६ मधील महाविकास आघाडीचे उमेदवार नागेश अक्कलकोटे यांनी बुथ क्रमांक ३ मध्ये बनावट आधार कार्ड बनवून बोगस मतदान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलांना अटकाव करत ही बाब केंद्राध्यक्ष यांच्या निर्दशनास आणून दिली. प्रभाग ४ मध्येही असा प्रकार झाल्याचे महाआघाडीचे उमेदवार बाबासाहेब वाघमारे, अपक्ष उमेदवार ओंकार गायकवाड यांनी सांगितले. मात्र याबाबत कोणताही गुन्हा नसल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

सकाळी ९.३० पर्यंत ११२ मतदान केंद्रावर ७.३४ टक्के तर साडेअकरा वाजेपर्यंत १९.५८ टक्के म्हणजेच २१ हजार ८४३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ५१ हजार ३२२ मतदारांनी ४७.०८ टक्के मतदानाचा हक्क बजावल्याचे निवडणूक प्रशासनाने सांगितले. प्रभाग ७ मधील सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या मतदान केंद्रावर किरकोळ काही कार्यकर्त्यांत बाचाबाची व धक्काबुक्की झाल्याचे समजताच पोलिस उप अधिक्षक अशोक सायकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. त्याठिकाणी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, संतोष ठोंगे उपस्थित होते. दरम्यान, निकाल २१ डिसेंबर रोजी लागणार असल्याने सर्व उमेदवारांना चिंतेत राहण्याची वेळ आली आहे.